# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार २८ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे १०








## सुरक्षा दलांची मोठी कारवाई

# १७ लाख रुपयांचे बक्षीस असलेले ४ नक्षलवादी ठार

**नवी दिल्ली /वृत्तसंस्था-** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद/मावोवादाला मुळापासून नष्ट करण्याची शपथ घेतली आहे. या पार्श्वभूमीवर नक्षलप्रभावित राज्यांमध्ये तीव्र कारवाया सुरू आहेत. अशाच एका कारवाईत छत्तीसगडच्या बिजापूरमध्ये सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. चकमकीत १७ लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या दोन महिलांसह चार नक्षलवादी ठार झाले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, बिजापूर जिल्ह्याच्या नैऋत्य भागातील बासगुडा आणि गंगलुर पोलिस ठाण्याच्या सीमावर्ती जंगलात माओवादी लपल्याची माहिती मिळाली होती. या आधारे, सुरक्षा दलांनी शोध मोहीम सुरू केली. काल (शनिवार) संध्याकाळपासून सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू होती. ही चकमक रविवारी दुपारी संपली. या चकमकीत दक्षिण उपक्षेत्रीय ब्युरोचे चार माओवादी ठार झाले.

चकमकीच्या ठिकाणाहून एक एसएलआर, एक इन्सास, एक ३०३ रायफल, एक १२ बोर बंदूक, बीजीएल लॉंचर, सिंगल शॉट शस्त्र, मोठ्या प्रमाणात स्फोटके आणि नक्षल संबंधित इतर वस्तू जप्त करण्यात आल्या. विजापूरचे पोलिस अधीक्षक जितेंद्र यादव यांनी ही माहिती दिली.

**ठार झालेल्या नक्षलवाद्यांची नावे-** हुंगा, एसीएम, प्लाटून क्रमांक १०, दक्षिण उपक्षेत्रीय ब्युरो - ५ लाख रुपयांचे बक्षीस. लखे, एसीएम, प्लाटून क्रमांक ३०, दक्षिण उपक्षेत्रीय ब्युरो -५ लाख रुपयांचे बक्षीस. भीम, एसीएम, साउथ सब झोनल ब्युरो - ५ लाख रुपयांचे बक्षीस. निहाल उर्फ राहुल, सदस्य - सरकारने २ लाख रुपयांचे बक्षीस☞(पान २ वर)

# इंग्लंडचे गर्वहरण करत भारताने गड राखला पराभवाची नामुष्की दूर करत सामना केला ड्रॉ

**मँचेस्टर /वृत्तसंस्था-:** भारतीय संघ चौथा सामना हरणार, अशी जोरदार चर्चा होती. इंग्लंडचा संघ यावेळी विजयाचे सेलिब्रेशन करण्यात गुंग होता. पण त्याचवेळी भारतीय संघाने इंग्लंडचे गर्वहरण केले आणि मँचेस्टरचा गड राखला. भारतावर यावेळी पराभवाची नामुष्की ओढवली होती. पण भारताने पाचव्या दिवशीही दिमाखदार खेळ केला आणि हा सामना ड्रॉ राखण्यात त्यांना यश आले. या सामन्यात गिलनंतर (१०३) रवींद्र जडेजा (नाबाद १०७) आणि वॉशिंग्टन सुंदर (नाबाद १००) यांनीही शतक झळकावत इंग्लंडला हतबल करून सोडले. भारताने ४ बाद ४२४ अशी धावसंख्या करत आपला डाव घोषित केला. इंग्लंडनेही यावेळी हार मानली.

इंग्लंडने या सामन्यात ६०० धावांचा पल्ला ओलांडला. भारतावरर ३११ धावांची आघाडीही घेतली होती. त्यानंतर इंग्लडने भारताने दोन फलंदाज शून्यावर बाद केले. त्यामुळे भारताचा चौथ्याच दिवशी पराभव होईल, असे म्हटले जात होते. पण त्यानंतर मैदानात शुभमन गिल आणि केएल राहुल समर्थपणे उभे राहीले. या दोघांनी चौथा दिवस खेळून काढला. पण त्यानंतरही पाचव्या दिवशी





भारतीय संघावर पराभवाची टांगती तलवार होती. पण पाचव्या दिवशी भारतीय संघ फलंदाजीला उतरला आणि त्यावेळी एक वेगळीच गोष्ट पाहायला मिळाली.

पाचव्या दिवशी जेव्हा भारतीय संघ मैदानात उतरला. तेव्हा भारतीय खेळाडूंचाा आत्मविश्वास चांगलाच दुणावला होता. राहुल आणि गिल यांनी दमदार फलंदाजी केली. राहुल शतकासमीप आला होता. पण राहुलला यावेळी शतक झळकावता आले नाही. राहुलने यावेळी ८ चौकारांच्या जोरावर ९० धावांची खेळी साकारली. राहुलला शतक झळकावता आले नसले तरी गिलने ही कसर भरून काढली. कारण गिलने यावेळी शतक झळकावत इतिहास रचला. गेल्या ३५ वर्षांत भारताचे या मैदानातील पहिले शतक ठरले. शतकानंतर गिलला जास्त फलंदाजी करता आली नाही. लंचला १० मिनिटे असताना तो बाद झाला. भारताला हा मोठा धक्का बसला होता, पण भारताला या गोष्टीची झळ जाणवली नाही. ☞(पान २ वर)

# बस दरीत कोसळून ९ ठार, ३० जखमी

**चकवाल/वृत्तसंस्था-** पाकिस्तानमध्ये रविवारी बस दरीत पडल्याने नऊ जणांचा मृत्यू झाला, तर ३० हून अधिक जण जखमी झाले. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींपैकी काही लोकांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. मृतांमध्ये चार मुलांचाही समावेश आहे. जखमींमध्ये फिलीपिन्समधील एका महिलेचा समावेश आहे. चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बस खड्ड्यात पडली आणि उलटली, असे सांगण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी



सकाळी हा अपघात झाला. इस्लामाबादहून लाहोरला जाणारी बस पंजाब प्रांतातील चकवाल जिल्ह्यातील बालकासरजवळ दरीत पडली. यावेळी बसमध्ये ४० प्रवासी होते. बसचा टायर फुटल्यानंतर चालकाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे हा अपघात झाला.

चकवाल जिल्हा आरोग्य प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सईद अख्तर यांच्या मते, या अपघातात ८ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला, तर एकाचा रुग्णालयात मृत्यू झाला. मृतांमध्ये बस चालकाचाही समावेश आहे. अपघातात जखमी झालेल्या सर्व लोकांना चकवाल येथील सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. चकवालच्या उपायुक्त सारा हयात आणि सहाय्यक आयुक्त झीशान शरीफ यांनी जिल्हा आरोग्य मुख्यालय रुग्णालयात पोहोचून जखमींची भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी अ्ग हयात यांनी जखमींना सर्व शक्य वैद्यकीय सुविधा देण्याचे निर्देश दिले.☞(पान २ वर)

# उद्धव ठाकरेंचा वाढदिवस, राज ठाकरे शुभेच्छा देण्यासाठी पोहोचले मातोश्रीवर!

**मुंबई/प्रतिनिधी** :उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस. त्यानिमित्त राज्यभरातून त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत. दरम्यान मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे उद्धव ठाकरेंना शुभेच्छा देण्यासाठी मातोश्रीवर दाखल झाले आहेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यातील राजकीय जवळीकीची चर्चा २०२५ मध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात एक महत्त्वाचा विषय ठरली आहे.

दोघेही ठाकरे कुटुंबातील प्रमुख नेते असून, शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) या त्यांच्या पक्षांनी मराठी अस्मिता आणि महाराष्ट्राच्या हितासाठी नेहमीच आग्रही भूमिका घेतली आहे. २००६



मध्ये राज ठाकरे यांनी शिवसेना सोडून मनसे स्थापन केल्यानंतर दोघांमधील राजकीय आणि वैयक्तिक मतभेद सर्वश्रुत होते. मात्र गेल्या काही दिवसांमध्ये घडलेल्या राजकीय घडामोडींमुळे त्यांच्यातील दुरावा कमी होताना दिसला.

केंद्र सरकारच्या शैक्षणिक धोरणात हिंदी सक्तीचा प्रस्ताव आल्यानंतर महाराष्ट्रात मोठा विरोध उभा राहिला. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी मराठी भाषेच्या संरक्षणासाठी एकत्रितपणे आवाज उठवला. या मुद्द्यावर त्यांनी संयुक्तपणे मोर्चा काढण्याची योजना आखली होती, परंतु सरकारने हा निर्णय मागे घेतल्यानंतर ५ जुलै २०२५ रोजी वरळी येथील डोम येथे विजयी मेळावा आयोजित केला. या मेळाव्यात दोघेही एकाच व्यासपीठावर आले, ज्याने त्यांच्या जवळीकीला नवे वळण मिळाले.

# शिंदेंच्या मंत्र्यांनाच बदनाम करण्याचं कट कारस्थान

**रामदास कदम यांचं मोठं विधान**

**मुंबई/प्रतिनिधी** : गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडी घडत असल्याचं पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वीच विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन पार पडलं. या अधिवेशनादरम्यान शिवसेना (शिंदे) पक्षाच्या काही मंत्र्यांवर गंभीर आरोप करण्यात आले होते. त्यामुळे चांगलंच राजकारण तापलं होतं. मंत्री योगेश कदम यांच्यावर सावली बारच्या मुद्द्यावरून ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी आरोप केले होते. एवढंच नाही तर मंत्री योगेश कदम यांच्या राजीनाम्याची मागणीही परब यांनी केली होती. तसेच अधिवेशनाच्या दरम्यान मंत्री संजय शिरसाट यांचा पैशांनी भरलेली बॅगेसह एक व्हिडीओ समोर आला होता. त्यावरूनही विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका केली होती.



तसेच अधिवेशनाच्या दरम्यान आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण केल्याचं प्रकरणही चांगलंच चर्चेत आलं होतं. दरम्यान, या सर्व घडामोडींच्या अनुषंगाने बोलताना आता शिवसेनेचे नेते ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी एक मोठं विधान केलं आहे. 'शिंदेंच्याच मंत्र्यांना बदनाम करण्याचं कट कारस्थान रचलं जातय का?'असा संशय असल्याचं रामदास कदम आज एका कार्यक्रमात बोलताना म्हटलं आहे.

# TCS कंपनीत १२ हजार कर्मचाऱ्यांना नारळ

**नवी दिल्ली /वृत्तसंस्था-**टाटा समूहाची आघाडीची आयटी कंपनी टाटा कन्सल्टन्सी




सर्व्हिसेस) ने एक मोठा निर्णय घेतला आहे. ज्याचा परिणाम येत्या काही महिन्यात हजारो कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांवर होऊ शकतो. कंपनीने स्पष्ट केले आहे की ती २०२६ या आर्थिक वर्षात (एप्रिल २०२५ ते मार्च २०२६) त्यांच्या जागतिक कर्मचाऱ्यांपैकी सुमारे २ टक्के कपात करणार आहे. याचा थेट परिणाम १२००० हून अधिक कर्मचाऱ्यांवर होईल. सध्या कंपनीत सुमारे ६.१३ लाख कर्मचारी काम करत आहेत. त्यानुसार, सुमारे १२ हजार २०० लोकांना कपातीचा फटका बसू शकतो☞(पान २ वर)

### नवीन धोरणामुळे चिंता वाढली

टीसीएसने अलीकडेच लागू केलेल्या नवीन बेंच धोरणामुळे कर्मचाऱ्यांसाठी तणाव निर्माण झाला आहे. १२ जून २०२५ पासून लागू होणाऱ्या या धोरणानुसार, कोणत्याही कर्मचाऱ्याला एका वर्षात २२५ बिल करण्यायोग्य दिवस पूर्ण करावे लागतील. म्हणजेच, कंपनीला थेट महसूल देणाऱ्या प्रकल्पावर त्यांना एका वर्षात किमान इतके दिवस काम करावे लागेल. याशिवाय, बेंचवर राहण्याचा (म्हणजे प्रकल्पाबाहेर राहण्याचा) कालावधी आता फक्त ३५ दिवसांपर्यंत मर्यादित करण्यात आला आहे. पूर्वी हा कालावधी खूप जास्त होता. या धोरणामुळे हजारो कर्मचाऱ्यांनाही त्रास होण्याची शक्यता आहे, विशेषतः जे नवीन प्रकल्प मिळेपर्यंत बेंचवर राहतात.

### सर्वात कठीण निर्णय : टीसीएसचे सीईओ के. कृतिवासन

टीसीएसचे सीईओ के. कृतिवासन यांनी एका मुलाखतीत सांगितले की, आपण नवीन तंत्रज्ञानाकडे, विशेषतः एआय आणि ऑपरेटिंग मॉडेलमध्ये बदलांकडे वाटचाल करत आहोत. यामुळे काम करण्याची पद्धत बदलत आहे आणि आपल्याला स्वतःला अधिक चपळ आणि भविष्यासाठी तयार बनवावे लागेल. त्यांनी हे देखील मान्य केले की कंपनीने कर्मचाऱ्यांचे कौशल्य वाढवण्याचा आणि त्यांना पुन्हा नियुक्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु, काही भूमिका अशा होत्या जिथे हे शक्य नव्हते. म्हणून, ही टाळेबंदी आवश्यक झाली. त्यांच्या मते, हा निर्णय प्रामुख्याने मध्यम आणि वरिष्ठ स्तरावरील कर्मचाऱ्यांवर परिणाम करेल. सीईओंनी याला 'माझ्या कारकिर्दीतील आतापर्यंतचा सर्वात कठीण निर्णय' म्हटले आहे.

## पालन पोषणाचा खर्च परवडेना

# पोटच्या तिन्ही मुलींना पाजलं विष, आईला अटक!

**अस्नोली /वृत्तसंस्था-** मुलींचा पालन पोषणाचा खर्च करणे परवडत नसल्याने एका महिलेने पोटच्या तीन मुलींच्या जेवणात फवारणीचे औषध मिळसून त्यांना ठार करण्याचा धक्कादायक घटना उघडकीस आली. याप्रकरणी पोलिसांनी संबंधित महिलेविरोधात गुन्हा दाखल करून तिला अटक केली.ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात ही घटना घडली. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.संध्या संदीप बेरे (वय, २७) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव असून ती शहापूर परिसरातील अस्नोली गावातील तळेपाडा भागातील रहिवासी आहे. पोटच्या तिन्ही मुलींना वरण भातातून फवारणीचे औषध देऊन मारल्याच्या आरोपाखाली तिला अटक करण्यात आली.




ठाणे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पाच, आठ आणि १० वर्षांच्या मुलींना जेवल्यानंतर अचानक उलट्या आणि डोकेदुखीचा त्रास होऊ लागल्याने त्यांना ताबडतोब जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. परंतु, त्यांची तब्येत बिघडल्याने त्यापैकी दोघींना मुंबईतील एका रुग्णालयात हलवले, ज्यांचा २४ जुलै आणि २५ जुलै उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर, सऱ्या मुलाला नाशिकच्या रुग्णालयात नेण्यात आले, जिथे तिचा २४ जुलै रोजी मृत्यू झाला, अशी माहिती एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली.याप्रकरणी खिनावली पोलिस ठाण्यात☞(पान २ वर)

# रेल्वे रुळ ओलांडताना एक्स्प्रेसनं उडवलं, तिघांचा मृत्यू

**माढा प्रतिनिधी** :सोलापुरातील माढा रेल्वे स्टेशनपासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर रेल्वे रूळ ओलांडताना एक्स्प्रेसच्या धडकेत तिघांचा मृत्यू झाला. गोलघुमट एक्स्प्रेस पंढरपूरहून सोलापूरकडे येत असताना ही दुर्घटना घडली. या अपघातात विजय कैय्यावाले आणि राहुल अशोक बेंजरपे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर, तिसऱ्या व्यक्तीची अद्याप ओळख पटली नाही. या अपघातामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

# प्रांजल खेवलकरांसह सातही आरोपींना २ दिवसांची पोलीस कोठडी

**पुणे/प्रतिनिधी** :शहरातील उच्चभ्रू वर्तुळात मोठ्या थाटात सुरू असलेल्या रेव्ह पार्टीवर पुणे पोलिसांनी मध्यरात्री धडक कारवाई केली आहे. खराडी येथील एका आलिशान फ्लॅटमध्ये सुरू असलेल्या या पार्टीवर गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकत माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर आणि प्रसिद्ध बुकी निखील पोपटासह एकूण सात जणांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून, पोलिसांना ही माहिती नेमकी कशी मिळाली, याबाबत अनेक चर्चा सुरू होत्या. यासंदर्भात आज पुणे पोलिसांनी पत्रकार परिषद घेऊन या संपूर्ण कारवाईची माहिती दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्यातील अमली पदार्थविरोधी मोहिमेअंतर्गत गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीनंतर ही कारवाई करण्यात आली. पार्टीमध्ये कोकेन, दारू, बिअर बॉटल्स, हुक्का व त्याचे साहित्य सापडले. एकूण २.७ ग्रॅम कोकेन, १० मोबाईल फोन्स, तसेच इतर प्रतिबंधित वस्तू जप्त करण्यात आल्या. ही कारवाई मध्यरात्री साडेतीनच्या सुमारास करण्यात आली. आरोपींमध्ये ५ पुरुष आणि २ महिला सहभागी असल्याचे उघड झाले. सर्व आरोपींना ताब्यात घेऊन वैद्यकीय तपासणीसाठी☞(पान २ वर)



# धर्मांतर न करता केलेला आंतरधर्मीय विवाह बेकायदेशीर

## अलाहाबाद उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

**लखनऊ /वृत्तसंस्था-** धर्मांतर न करता करण्यात आलेले आंतरधर्मीय विवाह हे बेकायदेशीर असतील असा मोठा निर्णय अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला आहे. एका व्यक्तीने अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्याशी आर्य समाज मंदिरात विवाह केला होता. तो विवाह न्यायालयाने बेकायदेशीर ठरवला आहे. तसेच अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्या व्यक्तीच्या विरोधातील फौजदारी खटला रद्द करण्यास न्यायालयाने नकार दिला.

याचिकाकर्ता सोनू सहानूर याने त्याच्याविरोधातील फौजदारी खटला रद्द करण्याची मागणी करत याचिका दाखल केली होती. आपण ज्या मुलीशी लग्न केलं होतं ती मुलगी आता प्रौढ झाली आहे, आर्य समाज मंदिरात हा विवाह केला होता असा दावा त्याने याचिकेतून केला होता. न्यायालयाने ही याचिका फेटाळली.

न्यायमूर्ती प्रशांत कुमार यांनी दिलेल्या निर्णयात असं नमूद केलं की अल्पवयीन व्यक्तीचा विवाह करून दिलेला आर्य समाजाचा विवाहप्रमाणपत्र कायदेशीर निकषांचे उल्लंघन करणारा आहे. आर्य समाज संस्था विवाहित जोडप्यांना, विशेषतः अल्पवयीन किंवा धर्मभिन्न व्यक्तींना, ठराविक शुल्कामध्ये विवाहप्रमाणपत्र देत आहेत, ही गंभीर बाब असून अशा प्रकारांचा तपास होणे गरजेचे आहे, असं न्यायालयाने स्पष्ट केलं.

न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला निर्देश दिले की IPS दर्जाच्या



अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली अशा संस्थांची चौकशी सुरू करण्यात यावी. या चौकशीचा अहवाल २९ ऑगस्टपर्यंत सादर करण्याचा आदेश देण्यात आला आहे. या चौकशीमुळे उत्तर प्रदेशातील अशा संस्थांवर कारवाई होण्याची शक्यता असून, सामाजिकदृष्ट्या या निर्णयाचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, संबंधित आरोपीविरुद्ध महाराजगंज जिल्ह्यातील निचलौल पोलिस ठाण्यात POCSO कायदा, अपहरण आणि बलात्काराचे आरोप ठेवण्यात आले आहेत. त्याच्यावर आरोपपत्र दाखल करण्यात आलं असून समन्सही बजावण्यात आले आहेत.

आर्य समाज ही सुधारवादी हिंदू चळवळीचे ☞(पान २ वर)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# 'महा स्माईल्स' मोहिमेमुळे विदर्भातील निष्पाप चेहऱ्यांवर पुन्हा फुलणार हास्य

## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील पुढाकाराने शक्य

**मुंबई/प्रतिनिधीः-** बालकांच्या चेहऱ्यावरील दुभंगलेले ओठ (क्लेफ्ट) व फाटलेले टाळू (पॅलेट) या जन्मजात विकारावर उपचार आणि जनजागृती करून या बालकांच्या निरागस चेहऱ्यावर हसू फुलविणे, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ध्येय आहे. यासाठी त्यांनी विदर्भातील अशा बालकांवर उपचार आणि जनजागृतीची गरज ओळखत त्यांनी स्वयंसेवी संस्थांना आवाहन केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आवाहनाला 'स्माईल ट्रेन इंडिया' ही स्वयंसेवी संस्था आणि बजाज फिनसर्वच्या शेफाली बजाज यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचे हे स्वप्न आता मिशनमोडवर साकार होतांना दिसत आहे.

'स्माईल ट्रेन इंडिया' ही आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था आणि बजाज फिनसर्व यांच्या सामाजिक उत्तरदायित्वातून आता ही मोहीम पूर्णपणे मोफत राबविली जाणार आहे. 'महा स्माईल्स क्लेफ्ट जनजागृती आणि उपचार मोहीम' ही केवळ वैद्यकीय मोहीम नसून, हजारो बालकांना नवजीवन देणारी एक आशावादी चळवळ ठरणार आहे.



या आगळ्यावेगळ्या मोहिमेचा नागपूर येथे ३१ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन हॉस्पिटल, खापरी, येथून शुभारंभ होणार आहे.

या पहिल्यावहिल्या उपक्रमाअंतर्गत पुढील ९० दिवसांत तीन विशेष मोबाईल व्हॅन विदर्भातील संपूर्ण ११ जिल्ह्यात फिरून लोकांमध्ये क्लेफ्ट विकाराविषयी माहिती देणार आहेत. यामध्ये लवकर निदान, उपचाराची शिफारस आणि गरजू बालकांसाठी मोफत शस्त्रक्रियांची नोंदणी असे विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. या बालकांवर नागपूर, गोंदिया, अकोला, वर्धा येथील रूग्णालयात शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत.

क्लेफ्ट विकार हा जन्मजात असून यात ओठ आणि टाळू हे दुभंगलेले असतात. जवळपास ७०० मुलांपैकी एका मुलांमध्ये हा विकार दिसून येतो. यावर शस्त्रक्रिया करूनच हा विकास दूर करता येते. वेळीच उपचार केले नाहीत तर कान बधिर होणे, बोलण्यात अडथळा येणे अशा वेगवेगळ्या व्यंगासोबत सामाजिक एकटेपणा येऊ शकतो. तथापि या विकारावर उपचार असून ६-७ शस्त्रक्रियेनंतर यावर पूर्णपणे मात करता येते. या सर्व शस्त्रक्रिया खर्चिक असल्याने आर्थिक दुर्बल कुटुंबातील व्यक्तींना ते परवडणारे नाही. म्हणूनच संवेदशील नेतृत्व असलेल्या मुख्यमंत्र्यांनी क्लेफ्ट वरील उपचार संपूर्ण मोफत व्हावे, यासाठी या विशेष मोहिमेचे आयोजन केले आहे.

क्लेफ्ट विकार असलेल्या बालकांना वेळेवर उपचार मिळाल्यास त्यांचे जीवन पूर्णतः सामान्य होऊ शकते. यासाठी केवळ उपचारच नव्हे, तर जागरूकता ही देखील तितकीच गरजेची आहे. त्यामुळे 'महा स्माईल्स' ही मोहीम विदर्भातील बालकांसाठी आरोग्यदूत ठरणारी आहे. या मोहिमेमुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील हजारो कुटुंबांना एक नवीन आशेचा किरण दिसणार आहे. अपूर्ण माहितीमुळे दुर्लक्षित राहिलेल्या समस्येवर आता तज्ज्ञांच्या मदतीने प्रभावी उपचार मिळणार आहे.

स्माईल ट्रेन आणि बजाज फिनसर्व यांच्या सहकार्याने महाराष्ट्राच्या ११ जिल्ह्यातील मुलांमध्ये जन्मजात आलेले दुभंगलेले होठ आणि टाळू विकार दूर होऊन त्यांच्या जीवनात आशेचा किरण नक्कीच जागणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

# तिरूपती बालाजीच्या भाविकांची मोठी सोय

## -अमरावती-तिरूपती रेल्वेगाडी आठवड्यातून दोन दिवस धावणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** तिरूपती बालाजी हे देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून भक्त या ठिकाणी दर्शनासाठी येत असतात. विविध सणांनिमित्त भाविकांची गर्दी वाढते. राज्यातील अनेक शहरांमधून तिरूपती येथे जाण्यासाठी रेल्वेसेवा उपलब्ध असली, तरी भारतीय रेल्वेतर्फे विशेष एक्सप्रेस गाड्या देखील चालवण्यात येत आहेत.




विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रवाशांसाठी आता दररोज तिरूपतीसाठी रेल्वेगाडी उपलब्ध आहे. गाडी क्रमांक १२७६६ अमरावती-तिरूपती ही आठवड्यातून दोन दिवस धावणारी एक्सप्रेस भाविकांसाठी उपलब्ध आहे. ही गाडी अमरावतीहून दर सोमवार, गुरूवारी धावते, तर परतीसाठी १२७६५ ही गाडी मंगळवार, शनिवारी धावते.

गाडी क्रमांक ०७६०६ अकोला-तिरूपती या गाडीला २ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ही गाडी दर रविवारी सकाळी ८.१० वाजता अकोला रेल्वे स्थानकावरून सुटते. दुसऱ्या दिवशी सकाळी ६.२५ वाजता ती तिरूपतीला पोहचते. परतीसाठी दर शनिवारी तिरूपतीहून दुपारी १२.३० वाजता सुटते आणि अकोल्याला दुसऱ्या दिवशी दुपारी १.१५ वाजता पोहचते.

गाडी क्रमांक ०७०१५ नांदेड-तिरूपती ३१ ऑगस्टपर्यंत धावणार असून दर शनिवारी दुपारी ४.५० वाजता नांदेडहून सुटते आणि दुसऱ्या दिवशी सकाळी १०.१० वाजता तिरूपतीला पोहचते. गाडी क्रमांक ०७०१६ तिरूपती नांदेड ही गाडी १ सप्टेंबरपर्यंत धावणार असून दर रविवारी दुपारी ४.४० वाजता तिरूपतीहून सुटते आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १.१५ वाजता नांदेड येथे पोहचते.

गाडी क्रमांक ०७१८९ नांदेड- तिरूपती ३० ऑगस्टपर्यंत धावणार असून शुक्रवारी दुपारी ४.३० वाजता नांदेडहून सुटते आणि दुसऱ्या दिवशी १२.३० वाजता तिरूपतीला पोहचते. गाडी क्रमांक ०७१९० तिरूपती-नांदेड १ सप्टेंबरपर्यंत धावणार असून दर शनिवारी दुपारी २.२० वाजता तिरूपतीहून सुटते आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ९.३० वाजता नांदेडला पोहचते.

प्रवाशांची गर्दी कमी करण्यासाठी तिरूपती-साईनगर शिर्डी- तिरूपतीदरम्यान विशेष गाडीच्या १८ फेऱ्या चालवल्या जाणार आहेत. गाडी क्रमांक ०७६३७ तिरूपती-साईनगर शिर्डी ही गाडी ऑगस्टमध्ये ३,१०,१७,२४ आणि ३१ तारखेला सप्टेंबरमध्ये ७, १४, २१ आणि २८ तारखेला दर रविवारी सकाळी ४ वाजता सुटेल आणि सोमवारी शिर्डी येथे सकाळी १०.४५ वाजता पोहचेल.

गाडी क्रमांक ०७६३८ साईनगर शिर्डी-तिरूपती ही गाडी शिर्डी येथून ऑगस्टमध्ये ४,११,१८ आणि २५ तारखेला तर सप्टेंबरमध्ये १,८,१५,२२ आणि २९ तारखेला दर सोमवारी सायंकाळी १९.३५ वाजता सुटेल आणि तिरूपती येथे बुधवारी मध्यरात्री १.३० वाजता पोहचेल.

# दरीत पडलेल्या सहा लोकांना जिवंत वाचविले

## -जिल्हा शोध व बचाव पथकाची कामगिरी











**अमरावती/प्रतिनिधीः-** चिखलदऱ्याजवळील कोसळलेल्या पर्यटकांच्या गाडीतील ६ जणांना जिल्हा शोध व बचाव पथकाने शर्थीचे प्रयत्न करून सुखरूप वाचवले. या घटनेत २ लहान मुलांसह ४ प्रौढांचा समावेश आहे. जीवाची पर्वा न करता रेस्क्यू मोहीम राबवणाऱ्या टीमच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जिल्ह्यातील चिखलदरा येथे निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. सदर गर्दी व पर्यटकांच्या सुरक्षेकरिता जिल्हाधिकारी अमरावती, निवासी उपजिल्हाधिकारी, यांच्या आदेशाने पोलीस स्टेशन चिखलदरा येथे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनात डी डी आर एफ पथक तैनात ठेवण्यात आले आहे. शनिवारी (दि.२६) चिखलदरा घाट रस्त्यामध्ये शहापूर येथून अर्धा किलोमीटर पुढे पर्यटकांचे वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन दरीतून खाली पडले होते.

गाडीमध्ये एकूण सहा व्यक्तींचा समावेश होता. त्यामध्ये ४ व्यक्ती व २ मुलांचा समावेश होता. सदर घटनेची माहिती मिळताच तहसीलदार चिखलदरा व ठाणेदार पोलीस स्टेशन चिखलदरा यांना माहिती मिळताच डी डी आर एफ अमरावती येथील टीमने आपल्या जीवाची पर्वा न करता सर्व व्यक्तींना दरीतून सुखरूप बाहेर काढले. त्यांचे प्राण वाचवले. त्यांना तात्काळ चिखलदरा येथे पी एस सी मध्ये उपचाराकरिता पाठविण्यात आले.

जिल्हा शोध व बचाव पथकातील देवानंद भुजाडे, विशाल निमकर, भूषण वैद्य, अर्जुन सुंदरडे,महेश मांदळे, सुरेश पालवे, सुरज ठाकूर, अजय आसोले यांचा समावेश आहे.

## १ व १० वरील उर्वरित

### सुरक्षा दलांची मोठी कारवाई

जाहीर केले.

**१९ महिन्यांत ४२५ नक्षलवादी ठार**

बस्तर रेंजचे पोलिस महानिरीक्षक सुंदरराज पी. म्हणाले की, २०२४ मध्ये मिळालेल्या निर्णायक आघाडीला पुढे नेत, २०२५ मध्येही बस्तर विभागात बंदी घातलेल्या आणि बेकायदेशीर सीपीआय (माओवादी) संघटनेविरुद्ध सुरक्षा दलांकडून तीव्र कारवाई केली जात आहे. या कारवाईअंतर्गत, जानेवारी २०२४ ते जुलै २०२५ पर्यंत ४२५ कट्टर माओवाद्यांना ठार करण्यात आले आहे.

### इंग्लंडचे गर्वहरण करत

गिल बाद झाला तरी वॉशिंग्टन सुंदर आणि रवींद्र जडेजा यांनी इंग्लंडच्या गोलंदाजीची पिसे काढली. इंग्लंडचे गोलंदाज जडेजा आणि सुंदर यांच्यापुढे नतमस्तक झाल्याचे पाहायला मिळाले. पण जडेजा आणि सुंदर यांनी यावेळी दमदार फलंदाजी केली आणि भारताला सामना ड्रॉ राखण्यात सर्वात महत्वाची भूमिका या जोडीने बजावली.

### बस दरीत कोसळून

मृतांमध्ये ४ मुलांचाही समावेश घटनेची माहिती मिळताच, बचाव पथक घटनास्थळी पोहोचले आणि दरीत पडलेल्या लोकांना बाहेर काढले. मृतांमध्ये चार मुलेही असल्याचे सांगण्यात येत आहे, त्यापैकी एक बाळ अवघ्या आठ महिन्यांचे आणि दुसरे एक वर्षाचे होते. यासोबतच १४ वर्षे आणि २ वर्षे वय असलेल्या दोन बहिणींचाही मृतांमध्ये समावेश आहे, तर त्यांची आई जखमी आहे. तर परदेशी महिलेचे नाव एमी डेला क्रूझ असून ती फिलीपिन्सची आहे. तिचे लाहोरमध्ये लग्न झाले होते. १२ जखमींपैकी चार जणांची प्रकृती गंभीर असून त्यांना रावळपिंडी येथील रूग्णालयात पाठवण्यात आले आहे.

### TCS कंपनीत १२ हजार

. ही कपात टीसीएसच्या सर्व देशांना आणि कार्यक्षेत्रांना प्रभावित करेल, जिथे कंपनी काम करत आहे.

**नेमकी का केली जातेय नोकरकपात?**

टीसीएसने म्हटले आहे की ते प्रभावित कर्मचाऱ्यांना नोटिस कालावधी वेतन तसेच अतिरिक्त विच्छेदन पॅकेज, आरोग्य विमा आणि आउटप्लेसमेंट सहाय्य प्रदान करेल. टाळेबंदीचे कारण एआय नाही तर पुनर्कौशल्य आणि तैनातीतील मर्यादा आहेत. कंपनी म्हणते की ते त्यांच्या कर्मचाऱ्यांना नवीन काळातील कौशल्ये शिकवण्यासाठी सतत गुंतवणूक करत आहेत. परंतू सर्व भूमिका नवीन योजनेत बसत नाहीत.

भारतीय कर्मचाऱ्यांवरही कपातीचा परिणाम होईल का?

कंपनीने भारतातील किती कर्मचाऱ्यांना या कपातीचा फटका बसेल हे सांगितले नसले तरी, भारत हा ऊएए चा सर्वात मोठा कर्मचारी वर्ग असल्याने, त्याचा परिणाम येथेही नक्कीच दिसून येईल असे तज्ज्ञांचे मत आहे. तसेच, मध्यम आणि वरिष्ठ स्तरावरील ही कपात कंपनीत दीर्घकाळ काम करणाऱ्या अनुभवी व्यावसायिकांसाठी चिंतेचे कारण असू शकते.

### पालन पोषणाचा खर्च

नैसर्गिक मृत्युची नोंद करण्यात आली. परंतु, शवविच्छेदनाच्या अहवालात मुलींच्या शरिरात विष आढळून आले. या महत्त्वाच्या फॉरेन्सिक पुराव्याच्या आधारे पोलिसांनी संध्याला रविवारी पहाटे दोन वाजताच्या सुमारास ताब्यात घेतले. सुरुवातीला संध्याने पोलिसांना उडवाउडवीचे उत्तर दिली. परंतु, पोलिसांनी खाक्या दाखवताच तिने हत्येची कबुली दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महिलेच्या पतीला दारूचे व्यसन होते. त्यामुळे ती आपल्या मुलीसह वेगळी राहत होती. या महिलेला एकट्याने मुलींचे संगोपन करण्यात अडचण येत असल्याने तिने हा गुन्हा केला, असा संशय व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### प्रांजल खेवलकरांसह सातही

ससून रुग्णालयात नेण्यात आले असून, त्यांच्या रक्ताचे नमुनेही तपासणीसाठी घेण्यात आले आहेत.

प्रांजल खेवलकरसह सात जणांना दोन दिवसांची पोलीस कोठडी

प्राप्त माहितीनुसार, प्रांजल खेवलकर यांच्यासह सर्व सातही आरोपींना २ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणी अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रांजल खेवलकर हे माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांचे पती आहेत. या प्रकरणामुळे राजकीय वर्तुळातही खळबळ उडाली असून, पुढील तपास गुन्हे शाखा करत आहे.

### धर्मांतर न करता केलेला

प्रतिनिधित्व करणारी संस्था असून, ते वैदिक पद्धतीने, सोप्या विधीने विवाह लावतात. यामध्ये दोघेही हिंदू असणे किंवा हिंदू धर्मात धर्मांतर करूनच विवाह करणे आवश्यक असते. अल्पवयीन आणि धर्मभिन्न व्यक्तींना आर्य समाजात विवाह करता येत नाही, असा नियम आहे.

न्यायालयाने याआधीही स्पष्ट केलं होतं की फक्त आर्य समाज मंदिराचे प्रमाणपत्र विवाहाचा पुरावा मानता येणार नाही. अशा प्रमाणपत्राची कायदेशीर वैधता न्यायालयीन साक्षांवर अवलंबून असते.

### मद्यपी डॉक्टरचा प्रतापः

प्रकरणाची चौकशी सुरू असल्याचे डॉ. मनवर यांनी स्पष्ट केले.

सदर डॉक्टरचे रूग्णांसोबतचे वर्तन चांगले नसल्याच्या तक्रारी यापूर्वीही वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्राप्त झाल्या आहेत. काही युवकांनी या डॉक्टरचे नशेत असतानाचे ऑडिओ, व्हिडीओ बनवले आहेत. या डॉक्टरने उपजिल्हा रुग्णालयात शुक्रवारी रात्री उपचारासाठी आलेल्या टाकळी येथील एका रुग्ण दाम्पत्याशीही गैरवर्तन केल्याची तक्रार आहे.

तसेच शहरातील पंचशील नगर परिसरातील एका गंभीर रूग्णाची तपासणी करताना केवळ डोळे तपासले व इतर तपासणीच केली नाही. त्यामुळे त्या रूग्णावर उपचारास विलंब झाल्याचा आरोप रूग्णाच्या नातेवाईकांनी केला आहे. पालकमंत्र्यांच्या मतदारसंघात असलेल्या दारव्हा येथील उपजिल्हा रूग्णालयाचा कारभार सुधारण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

### फासेपारधी समाजाकडून आमदार

आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. पोलिसांनी हस्तक्षेप करून आंदोलकांना मार्गावरून हटवले.एखादी व्यक्ती लोकप्रतिनिधी म्हणून सभागृहामध्ये पोहचल्यानंतर ती व्यक्ती एका जातीच्या, एका धर्माच्या, एका गावाचे प्रतिनिधी राहत नाही. लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत असताना त्याच्या सोबत असणाऱ्या विधानसभा सदस्यांसोबत सौजन्याने वागणे गरजेचे असून लोकप्रतिनिधीने सभागृहातील सदस्यांसोबत जातीच्या आधारावर भेदभापूर्ण वर्तन व व्यवहार करू नये, असे मतीन भोसले यांनी म्हटले आहे.

संविधानविरोधी तसेच जातीयवादी मानसिकतेच्या शरद सोनवणे यांच्यावर अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ च्या योग्य कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच या जातीयवादी आमदाराला लोकप्रतिनिधी म्हणून राहण्याचा नैतिक अधिकार नसल्यामुळे या आदिवासी विरोधी आमदाराची आमदारकी रद्द करण्यासंबंधीची शिफारस विधानसभा अध्यक्ष यांच्याकडे करण्यात यावी आणि त्यांचे विधानसभा सदस्यत्व कायमस्वरुपी रद्द करण्यात यावे, अशी मागणी मतीन भोसले यांनी केली आहे.

### पाणीपुरवठा होणा-या विहिरीच्या

अनेक वर्षापासून साफ केले नसल्याने यामध्ये शेवाळ व किडे निर्माण झाले. सध्या जनावरांमध्ये लम्पी आजाराची लागण असून पाणी पीत असल्यामुळे या पाण्यामुळे जनावरे दगावण्याची भीती निर्माण झाली आहे, असा या परिसरातील नागरिकांचा आरोप आहे. करीता नगरपंचायतने पुढील धोका ओळखून विहिरीच्या परिसरातील गटार, झाडे झुडपे व जनावराचे टाके सुद्धा साफ करावे अशी मागणी नगरपंचायतकडे प्रभाकर डांगे, रवींद्र पोफळे, प्रक्षी पांडे, प्रकाश गजबे, कैलास गजबे, प्रमोद पिंजरकर यांचे सह अनेक नागरिकांनी निवेदनाद्वारे केली आहे.

### कुऱ्हा येथून शेकडो शिवभक्त

अंबाडकर, किशोर डहाके,भगवंत मेश्राम, सोमेश्वर दुधे, सुधिर शेलोकार,संजय भक्ते,पवन आमले, शुभम कुऱ्हाडे, गजानन मेश्राम, प्रकाश बिलोरे,सागर निमकर, सौरभ माहुले,अनुप कोठीया, गणेश चैले, नरेंद्र बेहरे रोषण भगत,जय बावणे, गौरव शाहू,राहुल कुऱ्हेकर,रोषण भगोले, आदी शिवभक्त सहभागी होऊन रवाना झाले.याकरिता कुऱ्हा येथील महिला, पुरुष युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तळेगाव ठाकूर येथे अज्ञात

२ हजार रुपये नेऊन दुकानातील साहित्याची नासधूस केली. तर योगेश युवराज खुराडे, प्रवीण चरडे यांच्या देखील दुकानांचे कुलूप चोरट्यांनी फोडले आहे.याच मुख्य चौकात असलेले प्रभाकर गणोरकर, प्रितेश राघोर्ते,यांच्या कुलूपबंद घरांना अज्ञात चोरट्यांनी लक्ष करून घरातील साहित्य अस्ताव्यस्त केले आहे. गेल्या दोन दिवसांपासून तिवसा तालुक्यातील अनेक गावात मेघगर्जनेसह पावसाने हजेरी लावली असून याचदरम्यान शनिवारी मध्यरात्री तळेगाव ठाकूर येथील विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला होता. याच संधीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्यांनी गावातील मुख्य चौकात असलेली दुकाने व कुलूपबंद घरांना लक्ष करून चोरीचा डाव साधला आहे.सदर घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. याप्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारी वरून तिवसा पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.घटनेचे गांभीर्य लक्षात घेता श्वान पथकास घटनास्थळी पाचारण करण्यात आले असून या संदर्भात अधिक तपास तिवसा पोलिस करीत आहे

### कर्जाच्या ओझ्यामुळे शेतकऱ्याची

पेरणी करावी लागली. मात्र त्यानंतरही पिकाचे नुकसान झाले. त्यामुळे त्यांच्यावर आर्थिक ताण अधिकच वाढला होता. २६ जुलै रोजी त्यांची पत्नी आणि मुली एका वैद्यकीय कामासाठी मोर्शी येथे गेल्या असताना, संजय यांनी घरातच गळफास लावून आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच शिरखेड पोलीस ठाण्याचे ठाणेदार सचिन लुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला.पुढील तपास पोलिस करीत आहेत.

### लग्नाचे आमिष दाखवून कॅफेमध्ये

घटस्फोट घेण्यास सांगितले. काही दिवसांनंतर आरोपी विवाहित महिलेला घेऊन शहरातील जीएमडी मार्केट समोरील एका कॅफेत घेऊन गेला. त्या ठिकाणी महिलेवर अत्याचार केला. याच कॅफेमध्ये आरोपी तरुणाने विवाहित महिलेसोबत वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले.

त्यानंतर घुमजाव करून विवाहित महिलेला लग्नासाठी स्पष्ट नकार दिला. विवाहित महिलेला शिवीगाळ करून तिला मारहाण देखील केली. त्यानंतर पीडित विवाहित महिलेने सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात धाव घेतली. आरोपीविरूद्ध तक्रार दाखल केल्यावर सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुभम गजानन टाले (वय २९ वर्षे, रा. सांगवी मोहाडी, जि. अकोला) याच्याविरुद्ध ६४, ६४ (२) (एम) बीएनएस या कलमान्वये गुन्हा दाखल झाला.

शहरातील विविध कॅफेवर अश्लील चाळे व गैरकृत्य केले जात असल्याचे प्रकार अनेक वेळा उघडकीस आले आहेत. कॅफेमध्ये तरुण-तरुणींना बसण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. त्यासाठी अतिरिक्त शुल्क वसूल केले जाते. या प्रकरणाच्या तक्रारी झाल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख यांनी शहरातील जवाहर नगर भागातील कॅफेंवर अचानक भेटी देऊन तपासणी केली होती. यावेळी अल्पवयीन मुलं-मुली अश्लील चाळे करीत असल्याचे आढळून आले होते. यासंदर्भात पोलीस अधीक्षक व महापालिका आयुक्तांकडे तक्रारी केल्यानंतरही यावर आळा बसलेला नाही. आता पुन्हा एकदा विवाहित महिलेवर कॅफेमध्ये अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

### सर्पदंशाने चार वर्षांच्या

सर्वतोपरी प्रयत्न केले, पण दुर्दैवाने कनकने उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला. शवविच्छेदनानंतर कनकचे पार्थिव तिच्या कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले. संपूर्ण गावाने अश्रूंमध्ये तिचा निरोप घेतला. पावसाळ्यात सापांचे प्रमाण आणि वावर वाढतो. त्यामुळे अशा सर्पदंशाच्या घटनाही वाढत आहेत.

### जिल्ह्यात उद्धव ठाकरे यांचा

मोटरसायकल रॅली, पेढे आणि लाडू वाटप अशा विविध कार्यक्रमांनी वाढदिवसाला सामाजिक रंग भरला. भर पावसातही शिवसैनिकांचा उत्साह अटळ होता. मंदिरांमध्ये महाआरती करत उद्धव ठाकरे यांना उदंड व निरोगी आयुष्यासाठी साकडे घालण्यात आले.

शिवसैनिकांनी उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांसाठी केलेल्या कर्जमाफीच्या निर्णयाचे कौतुक करत त्यांचा जयघोष केला. 'कितीही संकटे आली तरी उद्धव ठाकरे यांच्यासोबत राहू,' अशी शपथ घेत शिवसैनिकांनी त्यांच्याप्रती निष्ठा व्यक्त केली. येणाऱ्या काळात ठाकरे यांनी पुन्हा राज्याचे नेतृत्व करावे, अशी भावना शिवसैनिकांनी मंदिरात व्यक्त केली.हा वाढदिवस उत्सव शिवसैनिकांच्या एकजुटीचे आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक ठरला.

### शासकीय मत्स्यविज्ञान महाविद्यालयाच्या

मोर्शी ते सालबर्डी रोडवर असलेल्या राजेश्वर महाराज मंदिरासमोर वन खात्याच्या चार एकर जागेवर ५०० झाडे लावण्याचा माझा संकल्प असून परिक्रमासाठी जागा सोडण्यात येणार आहे. याला अमृत वट म्हणून संबोधील्या जाणार आहे.महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचा भूमिपूजन सोहळा पार पडणार असून हा भूमीपूजनाचा कार्यक्रम अतिशय शिस्त पद्धतीने पार पडावा असे आवाहन खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केले.यावेळी आमदार चंदू यावलकर यांनी मत्स्यविज्ञान महाविद्यालय मोर्शीत साकारण्याचे सर्व श्रेय डॉ.अनिल बोंडे यांना जात असून अप्पर वर्धा धरण विकसित करण्याच्या दृष्टीने या ठिकाणी पर्यटन केंद्राची निर्मिती व्हावी या अनुषंगाने एक प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून लवकरात पर्यटन केंद्राला मंजुरी प्राप्त होणार असल्याचे आमदार यावलवकर यांनी स्पष्ट केले.महाविद्यालयाच्या माध्यमातून शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागाचे ५०० लक्ष मत्स्यबीज निर्मितीचे उद्दीष्ट पूर्ण होणार असून युवकांना रोजगार निर्मिती होणार आहे.या बैठकीला मोर्शी-वरुड विधानसभा प्रमुख अमित कुबडे, विद्यापीठाचे कार्यकारी परिषद सदस्य सुनील सोमवंशी,शासकीय मत्स्यविज्ञान महाविद्यालय संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष संजय गारपवार,

भाजपाचे तालुकाध्यक्ष उमेश कोंडे,शहराध्यक्ष राहुल चौधरी,दत्ता पाटील, अशोक देशमुख, श्रीकांत मांडवे यांच्यासह भाजपाचे सर्व पदाधिकारी महिला-पुरुष कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खुल्या मैदानात सुरू होता

जरेले (वय २३, मेटे कॉलनी), विलास अशोकराव लामकासे (वय ३८, सेंद्रिपुरा), राजीक अहमद अब्दुल रफिक (रा. आठवडी बाजार) या आरोपींना अटक केली. त्यांच्या ताब्यातून २१,२०० रोख, ६ मोबाईल फोन (अंदाजे किंमत ५३,०००), ५२ तास पत्त्यांचा संच याशिवाय घटनास्थळावरून ३ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत. दुचाकींमध्ये हिरो स्प्लेंडर एमएच २७ डीके ९८१५, विनाक्रमांकाची हिरो स्प्लेंडर व हिरो पॅशन प्रो एमएच २७ बीएन १३९३ जप्त करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यातील पुढील तपास पोलीस करत असून, आणखी आरोपींना अटक होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

### ९ वर्षाच्या मुलाला घेऊन

याची माहिती देण्यात आली.

हिंगणघाट पोलीस ठाण्याच्या ११२ टिमला कॉल मिळतातच परिस्थितीचे गांभीर्य ओळखत टिमने तात्काळ रिमडोह परिसरातील पेट्रोलपंप येथील घटनास्थळ गाठून सतर्कता दाखवित २५ जुलै रोजी ८ वाजता मनोरुग्ण व ९ वर्षाच्या त्याच्या मुलाला ताब्यात घेतले. त्यांच्या नातेवाईकाचा शोध घेऊन त्यांच्याशी संपर्क करुन त्याला व मुलाला नातेवाईकाच्या स्वाधीन केले.

हा मनोरुग्ण घरी कोणालाही न सांगता २५ जुलै ला सकाळी १० वाजता कार घेऊन निघाला होता व त्याचे जवळील मोबाईल सुध्दा त्याने बंद करून ठेवला होता.

यामुळे त्याचे नातेवाईकांकडून सुध्दा त्याचा शोध घेणे सुरू होते व नातेवाईक चिंतेच्या परिस्थितीत होते. कुठलाही अनर्थ घडू नये ही शक्यता त्यांच्या मनात निर्माण झाली होती.मात्र अनेक प्रयत्नानंतर मुलाचा आणि वडिलांचा शोध लागला नव्हता अशी माहिती आहे.

घटनेचे गांभीर्य पाहू हिंगणघाट पोलिस ठाण्याच्या ११२ टीमच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला. मनोरुग्णाला व त्याच्या मुलाला हिंगणघाट ११२ टीमने नातेवाईकाच्या स्वाधीन केले असून नातेवाईकांनी ११२ हिंगणघाट टीमचे आभार मानले.

### तिवसा-नेरपिंगळाई मार्गावर

टाळण्यासाठी चेतावणी फलक लावण्याची जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे. या अपघाताची माहिती मिळताच शिरखेड पोलीस ठाण्याचे ठाणेदार सचिन लुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक किसन धुर्वे व पोलिस हवालदार कुंजाराम मेटकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. शिरखेड पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# पुण्यातील रेव्ह पार्टीत एकनाथ खडसेंच्या जावयाला अटक

**पुणे-** खराडी परिसरातील एका सोसायटीत रेव्ह पार्टीवर पुणे गुन्हे शाखेने छापा टाकत मोठी कारवाई केली आहे. या कथित रेव्ह पार्टीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या नेत्या ॲड.रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांच्या गुन्हे शाखेने टाकलेल्या या छाप्यात कोकेन, गांजा यासह इतर अमली पदार्थही जप्त करण्यात आल्याची माहिती सांगण्यात आली आहे.

प्रांजल खेवलकर यांच्यासह या प्रकरणात सात जणांना अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या प्रकरणावर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे.'या रेव्ह पार्टी प्रकरणात पोलीस योग्य तो तपास करत आहेत.मात्र, कोणीही चुकीचे वागायचे नसते आणि कोणीही चुकीचे काही करायचे नसते', असं अजित पवार यांनी म्हटले आहे.'पुण्यातील रेव्ह पार्टीची जी



काही घटना घडली आहे, त्या घटनेचा तपास कायद्याने आणि नियमाने पुण्याचे सीपी करत आहेत. जे त्या ठिकाणी सापडलेले आहेत, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. तसेत कोणीही चुकीचे वागायचे नसते आणि कोणीही चुकीचे काही करायचे नसते',असे अजित पवार यांनी म्हटले आहे.

# हरिद्वारच्या मनसा मंदिरात चेंगराचेंगरी



## सहा भाविकांचा मृत्यू

**हरिद्वार-**हरिद्वारच्या मनसा देवीच्या मंदिरात चेंगराचेंगरी झाली असून यात सहा भाविकांचा मृत्यू झाला आहे. या चेंगराचेंगरीत काही भाविक जखमी झाले असून त्यांना स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.रविवार असल्याने हरिद्वारच्या मनसा देवी मंदिरात मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. यावेळी एका ठिकाणी विजेचा करंट बसत असल्याची अफवा पसरली त्यामुळे मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्यांवर एकच गोंधळ उडाला व चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीत ६ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले आहेत.

# महायुतीचे सरकार विश्वासघातकी; शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले-जयश्री शेळके



**बुलढाणा-**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त बुलढाणा जिल्हा शिवसेनेच्या वतीने विविध कार्यक्रम राबविण्यात आले. उद्धव ठाकरेंच्या उदंड व निरोगी आयुष्यासाठी बुलढाण्याचे ग्राम दैवत असलेल्या जगदंबा देवीला पातळ चढवून महाआरती करण्यात आली. तत्पूर्वी २४ जुलै रोजी शेतकऱ्यांना मोफत वृक्ष वाटप आणि बुलढाणा तालुक्यातील ग्रामीण भागात वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. २५ जुलै रोजी जिल्हा परिषद शाळेतील ५ हजार विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. २६ जुलैला सकाळी सामान्य रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप, मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यात आले. त्यानंतर बुलढाणा येथील गर्दे वाचनालयाच्या सभागृहात रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दरम्यान गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि कार्यकर्त्यांसोबत संवाद मेळावा देखील पार पडला.

यावेळी प्रवक्ता जयश्री शेळके, महिला आघाडी जिल्हाप्रमुख चंदा बढे, सहसंपर्क प्रमुख छगनदादा मेहेत्रे, डी. एस. लहाने, जिल्हा समन्वयक संदीप शेळके, युवासेना जिल्हाप्रमुख नंदू कऱ्हाडे, ॲड सुमित सरदार, उपजिल्हा प्रमुख लखन गाडेकर, तालुका प्रमुख विजय इतवारे, विजय इंगळे, दीपक चांभारे पाटील, अशोकमामा गव्हाणे, गजानन उबरहंडे, मोहित राजपूत, शुभम घोंगटे, सिद्धेश्वर आंधळे, अनिल नरोटे, सुधाकर आघाव, रणजीत राजपूत, सरपंच संजय शिंदे, एकनाथ कोरडे, बबन खरे, शेख रफीक यांचेसह प्रमुख पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी ८० टक्के, समाजकारण आणि २० टक्के राजकारणाचा मंत्र दिला. उद्धव ठाकरे यांनी कोरोना सारख्या काळामध्ये महाराष्ट्र सांभाळला. काहींनी गद्दारी केली. त्यामुळे राजकारणातील या देव माणसाला सत्तेतून उतार व्हावे लागले.

# लाडकी बहीण योजनेसाठी २६.३४ लाख महिला अपात्र

## खात्यावर पैसे नाहीत, जून महिन्यातील आकडेवारी जाहीर

**मुंबई**-राज्य सरकारने जून महिन्यातील लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांची तसेच अपात्र महिलांची संख्या पहिल्यांदाच जाहीर केली आहे. जून महिन्यात २.२५ कोटी पात्र लाडकी बहिणींना त्यांच्या खात्यावर पैसे हस्तांतरित करण्यात आले आहे. त्याचवेळी एकूण २६.३४ लाख महिलांना तात्पुरत्या स्वरुपात अपात्र करण्यात आल्याचं राज्य सरकारने म्हटले आहे.



जून महिन्यात सुमारे २.२५ कोटी पात्र लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे. तर जून २०२५ पासून या २६.३४ लाख अर्जदारांचा लाभ तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला आहे.यात काही लाभार्थी एकापेक्षा जास्त योजनांचा लाभ घेत असल्याचे, काही कुटुंबामध्ये २ पेक्षा जास्त लाभार्थी असल्याचे, तर काही ठिकाणी पुरुषांनी अर्ज केल्याच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत. त्यानंतर २६.३४ लाख अर्जदारांचा लाभ तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या सर्व अर्जांची ओळख पटवण्यासाठी महिला व बालविकास विभागाने शासनाच्या सर्व विभागांकडून माहिती मागवली होती. यानुसार माहिती व तंत्रज्ञान विभागाने सुमारे २६.३४ लाख लाभार्थी अपात्र असताना देखील लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत असल्याची माहिती सादर केली आहे.यात काही लाभार्थी एकापेक्षा जास्त योजनांचा लाभ घेत असल्याचे, काही कुटुंबामध्ये २ पेक्षा जास्त लाभार्थी असल्याचे, तर काही ठिकाणी पुरुषांनी अर्ज केल्याच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत.

या माहितीच्या आधारे जून २०२५ पासून या २६.३४ लाख अर्जदारांचा लाभ तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त पात्र असलेल्या सुमारे २.२५ कोटी पात्र लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना जून २०२५ महिन्याचा सन्माननिधी वितरित करण्यात आला आहे.तात्पुरत्या स्वरूपात लाभ स्थगित केलेल्या २६.३४ लाख लाभार्थ्यांच्या माहितीची संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून शहानिशा करून त्यापैकी जे लाभार्थी पात्र ठरतील त्यांचा लाभ शासनातर्फे पुन्हा सुरू करण्यात येईल. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या सर्व अर्जांची ओळख पटवण्यासाठी महिल व बालविकास विभागाने शासनाच्या सर्व विभागांकडून माहिती मागवली होती. यानुसार माहिती व तंत्रज्ञान विभागाने सुमारे २६.३४ लाख लाभार्थी अपात्र आहे.

# संक्षिप्त

## समुद्र खवळला ; मच्छीमारांना सतर्कतेचा इशारा

**मुंबई-**सिंधुदुर्ग जिल्ह्यात वादळी वाऱ्यांसह मुसळधार पाऊस सुरू आहे. समुद्रातही वादळी स्थिती आहे. वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडांची पडझड झाली आहे. महावितरणच्या वाहिन्यांवर झाडे कोसळल्याने काही भागांतील वीजपुरवठा खंडित झाला. दरम्यान, हवामान विभागाने उद्या (ता.२७) पर्यंत ४.८ मीटर उंचीच्या लाटांचा इशारा दिल्याने



प्रशासनाकडून मच्छीमारांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. शुक्रवारी (ता.२५) दिवसभर पावसाच्या जोरदार सरी सुरू होत्या. त्यानंतर रात्रीही पावसाचा जोर कायम होता. परंतु, आज पहाटेपासून जिल्ह्यात वादळीवाऱ्यांसह पावसाच्या सरी पडत आहेत. जिल्ह्यातील वैभववाडी, कणकवली, सावंतवाडी, कुडाळ तालुक्यांत दुपारी बारानंतर मुसळधार पाऊस झाला. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे समुद्र खवळला असून देवगड, मालवण आणि वेंगुर्ले किनारपट्टीला मोठ्या लाटा धडकत असल्याचे चित्र आहे. हवामान विभागाने उद्यापर्यंत ४.१ मीटर ते ४.८ मीटर उंचीच्या लाटा उसळण्याचा अंदाज दिला आहे. या लाटा उसळण्याचा धोका असल्याने प्रशासनाने जिल्ह्यातील मच्छीमारांनी समुद्रात मासेमारीसाठी न जाण्याचे आवाहन केले आहे.

## त्र्यंबकेश्वर - दर्शन पासचा काळाबाजार करणाऱ्या चौघांना अटक


**त्र्यंबकेश्वर-**देवस्थानच्या वतीने देण्यात येणाऱ्या पासचा काळाबाजार करणाऱ्या चार जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दर्शनासाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन त्र्यंबकेश्वर देवस्थानने एक मोफत दर्शन रांग आणि एक देणगी दर्शन रांग असे दोन पर्याय उपलब्ध केले



आहेत. या व्यवस्थेचा गैरफायदा घेण्यात येत आहे. मंदिर परिसरात ऑनलाईन दर्शनपास मिळवून त्याचा काळाबाजार करणाऱ्या टोळीवर त्र्यंबकेश्वर पोलिसांनी कारवाई केली आहे.या टोळीतील चार जणांना अटक केली आहे. बनावट नाव पत्ता आणि ओळखपत्र तयार करुन ऑनलाईन पास मिळवून भाविकांना प्रतिव्यक्ती ७०० ते एक हजार रुपये दराने विकले जात होते. या संशयितांची झाडाझडती घेतल्यानंतर त्यांच्याकडे भ्रमणध्वनी आणि मेल आयडीच्या माध्यमातून हा काळाबाजार होत असल्याचे उघड झाले. या संशयितांविरुध्द त्र्यंबकेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## समुद्रात बुडाली बोट, रायगडचे पाचजण पोहून किनाऱ्यावर पोहोचले

**उरण-**महाराष्ट्रातल्या रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात खोल समुद्रात मासेमारीसाठी गेलेली बोट बुडाली. बोटीत असलेले आठ पैकी पाच मच्छिमार नऊ तास पोहून समुद्र किनाऱ्यावर पोहोचले. इतर तीन मच्छिमार बेपत्ता आहेत. बेपत्ता मच्छिमारांचा शोध सुरू आहे.बोटीत असलेले सर्व मच्छिमार उरण तालुक्यातील आपटा, करंजा आणि हावरे कोळीवाड्यातील आहेत. बोट उरण



येथून अलिबागमधील खांदेरीच्या दिशेने जात असताना बुडाली. बोट बुडाल्यावर पोहत किनारा गाठणाऱ्या पाच जणांना मांडवा पोलिसांनी अलिबाग जिल्हा रुग्णालय येथे दाखल केले आहे. बेपत्ता असलेल्या ३ मच्छिमारांचा शोध सुरू आहे. तटरक्षक दल, स्थानिक बचाव यंत्रणा आणि ड्रोन यांच्या मदतीने बेपत्ता मच्छिमारांचा शोध सुरू आहे.

# मातोश्रीवर जाऊन राज ठाकरेंनी उद्धव ठाकरे यांना दिल्या शुभेच्छा



**मुंबई-**राज्याच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे एकत्र येण्याबाबतच्या चर्चा सुरू आहेत. काही दिवसांपूर्वी हे दोन्ही नेते मराठी भाषेच्या मुद्द्यावरून एका व्यासपीठावर आल्याचे पाहायला मिळाले होते. त्यानंतर आज पुन्हा उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमीत्ताने दोन्ही नेते मातोश्रीवर एकत्र आले. आज राज ठाकरेंनी मातोश्री येथे जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही नेत्यांची भेट महत्त्वाची मानली जात आहे.

शिवसेनाप्रमुखांच्या खोलीत व्यंगचित्रांवर चर्चा झाली. जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. बऱ्याच गोष्टी झाल्या. दोन भाऊ भेटले. दोन नेते भेटले नाहीत.' संजय राऊत हे प्रतिनिधीशी बोलत होते.'दोन भाऊ आहेत, ते भेटणे गरजेचे होते, ते भेटले. नाते दृढ होत आहे. याचा आम्हा सगळ्यांना आनंद आहे,' असेही संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले. युतीबाबतच्या प्रश्नावर मात्र राऊतांनी 'जे होईल ते चांगलेच होईल' इतकंच उत्तर दिले. शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा आज वाढदिवस आहे. त्यानिमित्त मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यात जवळपास २० मिनिटांपेक्षा जास्त चर्चा झाल्याचंही सांगितले जात आहे.जवळपास दहा वर्षांनंतर राज ठाकरे यांनी मातोश्रीवर जात शुभेच्छा दिल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी अगदी दोन शब्दांत आपली प्रतिक्रिया दिली. 'आज मला खूप आनंद झाला आहे,' असे उद्धव ठाकरे म्हणाले. दरम्यान, या भेटीवेळी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत, मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांच्यासह आदी नेतेही उपस्थित होते.

# रायगड जिल्हा,पुणे घाट, सातारा घाट परिसरात ऑरेंज अलर्ट

**मुंबई-** रायगड जिल्हा आणि पुणे घाट, सातारा घाट परिसरात पुढील २४ तासांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संभाव्य आपत्तीच्या अनुषंगाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांना आपत्कालीन परिस्थितीकरिता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

गोंदिया जिल्ह्यातील बाघ नदीने धोका पातळी, रायगड जिल्ह्यातील कुंडलीका नदीने इशारा पातळी ओलांडली असून नदीकाठच्या गावांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पुणे जिल्ह्यातील खडकवासला, पवना धरणातून नियंत्रित विसर्ग चालू असून जिल्हा प्रशासनामार्फत नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.परभणी जिल्ह्यात हादगाव पाथरी येथे २० लोकांना मास्जिदीमध्ये स्थलांतरित करण्यात आले होते. तसेच माटेगाव येथे पूलावरुन पाणी जात असल्याने झीरो फाटा रस्ता सुरक्षास्तव बंद करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यातील उरण जवळ समुद्रात बोट पलटी झाली असता त्यामध्ये असणाऱ्या ८ जणांपैकी ५ व्यक्ती पोहत बाहेर आल्या असून ३ व्यक्तींचे कोस्ट गार्ड, स्थानिक प्रशासन व बचाव पथकांच्या मदतीने शोधकार्य चालू आहे.

सातारा जिल्ह्यात महाबळेश्वर तालुक्यात सततच्या अतीवृष्टीमुळे भूस्खलनाच्या अनुषंगाने सतर्कतेचा सूचना देण्यात आल्या असून भूस्खलनाच्या अनुषंगाने तापोळा महाबळेश्वर रस्ता सुरक्षास्तव बंद ठेवण्यात आला असल्याचेही राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.




# लोणावळ्यात तरुणीवर कारमध्ये सामूहिक अत्याचार

## तिघांविरोधात गुन्हा दाखल, एक पोलिसांच्या ताब्यात

**लोणावळा-**थंड हवेसाठी प्रसिद्ध आणि पर्यटकांचे आवडते ठिकाण असलेल्या लोणावळ्यात धक्कादायक घटना घडली आहे. रस्त्याने घरी निघालेल्या तरुणीला तीन अज्ञात नराधमांनी त्यांच्या कारमध्ये ओढून बसवले आणि कार लोणावळ्यातील तुंगार्ली गावच्या हद्दीतील एका निर्जनस्थळी नेली. तिथे कारमध्येच नराधमांनी तरुणीवर सामूहिक बलात्कार केला. या प्रकरणी लोणावळा शहर पोलिसांनी तीन अज्ञातांच्या विरोधात गुन्हा नोंदवला असून एका संशयिताला ताब्यात घेतले आहे.

लोणावळा परिसरातील २३ वर्षांच्या तरुणीने तक्रार दिली आहे. तरुणीच्या फिर्यादीनुसार पीडित तरुणी ही शुक्रवारी रात्री नऊच्या सुमारास लोणावळ्यातील तुंगार्ली गावाच्या हद्दीतील एका रस्त्याने जात असताना कारमधून आलेल्या तीन तरुणांनी तिचे तोंड दाबून जबरदस्तीने कारमध्ये ओढून बसवले. त्यानंतर त्यांनी तिचे हात मागे बांधून तिचा मोबाईल काढून घेतला. यानंतर तरुणीला विवस्त्र केले. हाताने मारहाण करत चालत्या कारमध्ये तसेच काही ठिकाणी कार थांबवत शुक्रवारी रात्री नऊ ते शनिवारी पहाटेपर्यंत आळीपाळीने बलात्कार करण्यात आला. बलात्कारानंतर नराधमांनी तिला कारमधूनच नांगरगाव येथील रस्त्याच्या कडेला टाकून दिले. यानंतर नराधम कार घेऊन पळून गेले.

पोलिसांनी तरुणीची तक्रार नोंदवून घेतल्यानंतर तातडीने कारवाई सुरू केली. पीडित तरुणीने दिलेल्या माहितीआधारे तपास करुन पोलिसांनी अवघ्या काही तासांत एका संशयिताला ताब्यात घेतले आहे. संशयिताची चौकशी सुरू आहे.



# अटल सेतूवर १३ कोटींहून अधिक वाहनांची वर्दळ

**मुंबई-**मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, ज्याला अटल सेतू म्हणूनही ओळखले जाते, त्याच्या १३ जानेवारी २०२४ रोजीच्या उद्घाटनापासून १.३ कोटींहून अधिक वाहनांनी वापर केला आहे, ज्यात खासगी वाहनांची संख्या सर्वाधिक आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, १३ जानेवारी २०२४ ते २४ जुलै २०२५ या कालावधीत एकूण १३,१६३,१७७ वाहनांनी २२ किलोमीटर लांबीच्या या पुलावरून प्रवास केला. यापैकी १.२ कोटींहून आधिक (१२,०८६,०७६) खासगी वाहने होती, जी एकूण वाहतुकीच्या ९१टक्के पेक्षा जास्त आहेत. उर्वरित वाहतुकीमध्ये हलकी व्यावसायिक वाहने (मिनीबस), बस आणि ट्रक, मल्टी-ॲक्सल वाहने आणि काही प्रमाणात मोठी वाहने यांचा समावेश आहे. विशेषतः, मिनीबसने १७१,७११ फेऱ्या केल्या, तर २-ॲक्सल बस आणि ट्रकने २०२,८६४ फेऱ्या केल्या. मध्यम आणि भारी मल्टॲक्सल वाहनांनी एकत्रितपणे ७००,९८९ वेळा पूल ओलांडला. आतापर्यंत केवळ १,५३७ मोठ्या वाहनांनी या लिंकचा वापर केला आहे.

१२ जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेलाMTHL,दक्षिण मुंबईतील शिवडी ते नवी मुंबईतील चिरले यांना जोडतो, ज्यामध्ये शिवडी, उलवे आणि चिरले येथे इंटरचेंजेस आहेत. २२ किलोमीटरच्या एकूण लांबीपैकी १६.५ किलोमीटर समुद्रावरून, तर ५.५ किलोमीटर जमिनीवरील व्हायाडक्ट्सचा समावेश आहे. देशातील सर्वात लांब सागरी पूल असल्याने, या पुलाने मुंबई आणि नवी मुंबई दरम्यानचा प्रवासाचा वेळ जवळजवळ एका तासावरून २० मिनिटांपेक्षा कमी केला आहे. वेळेच्या बचतीव्यतिरिक्त, यामुळे इंधनाचा वापर कमी झाला आहे आणि प्रवासाचा अनुभव अधिक सुखद झाला आहे. पहिल्या दिवशी, १३ जानेवारी रोजी, २८,१७६ वाहनांनी पुलाचा वापर केला, ज्यामुळे ५४.७७ रू लाख टोल महसूल मिळाला. दुसऱ्या दिवशी, वाहनांची संख्या जवळजवळ दुप्पट होऊन ५४,९७७ झाली, तर टोल उत्पन्न १.०६ कोटींवर पोहोचले. पुलावर १०० किमी प्रतितास वेगमर्यादा आहे, तर रॅम्पवर ४० किमी प्रतितास वेगमर्यादा आहे.

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ सोमवार, २८ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


# शेलुखडसे येथील सरकारी जागेतील अतिक्रमित विहीर खाजगी सात- बारावरून हटवा

■ प्रतिनिधी | रिसोड ■

**जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या शेलूखडसे येथील ग्रामपंचायत गावठाण हद्दीत असलेली अतिक्रमित विहीरिची नोंद खाजगी सात- बारावर असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. परिणामी सरकारी जमिनीवर केलेल्या घुसखोरीचा गंभीर विषय संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा ठरत आहे. त्यामुळे सदर विहीर खाजगी सात- बारावर कशी? हा कळीचा मुद्दा उपस्थित केला जात आहे. सदर विहीरीची नोंद खाजगी सात- बारावरून हटवावी व ती विहीर ग्रामपंचायतच्या सुपूर्द करावी. तद्वतच गावठाणातून असलेला जुना वहीवटीचा रस्ता सुद्धा मोकळा करून द्यावा. या बाबतचे निवेदन गावातील शेतकरी तथा सामाजिक कार्यकर्ते वसंत खडसे यांनी रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना दिले आहे.**

## खाजगी व सरकारी जमिनीवरील घुसखोरी थांबवा – तहसीलदार यांना निवेदन

सदर निवेदनात वसंत खडसे यांनी स्पष्ट नमूद केले आहे की, त्यांची गावठाण हद्दीला लागून भुमापन गट नंबर ५९९ मध्ये २ हेक्टर ३३ आर स्वतःच्या मालकीची सामायिक शेत जमीन आहे. परंतु सात- बारावर असलेले क्षेत्रफळ कमी असल्याचा संशय येत असल्याने त्यांनी उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय रिसोड यांच्या मार्फत दि. २८/११/२०२४रोजी, रजिष्टर क्रमांक०७५६२प्रमाणे हद्द कायम करण्यासाठी सरकारी मोजणी केली आहे.तेंव्हा असे लक्षात आले की, गट नंबर ५९९ च्या दक्षिणेस असलेल्या गट नंबर ६०२ मधील वहीवाटदार ज्ञानेश्वर गजानन खडसे व संजय गजानन खडसे यांनी पूर्व, पश्चिम चालीचा धुरा कोरून गट नंबर ५९९ मध्ये अंदाजे १७ ते १८ गुंठे शेत जमीन बळकावण्याच्या उद्देशाने घुसखोरी केल्याचे सिद्ध झाले आहे.



'सदर गंभीर प्रकरणाची संपूर्ण पडताळणी करून, ती विहीर सरकारी जागेत अतिक्रमित निघाल्यास सर्वप्रथम खाजगी सात- बारावरून हटवून ग्रामपंचायतच्या ताब्यात देण्यात येईल. त्यानंतर पुढील तपास करून सरकारी जागेतील विहिरीच्या नावावर जर कोणी शासनाच्या अनुदानित योजणांचा अवैध लाभ घेतला असेल तर संबंधितांकडून तत्सम स्वरूपाची सक्त वसुली करण्यात येईल. या बाबत वरिष्ठांच्या आदेशानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल..!

**प्रतीक्षा तेजनकर,** तहसीलदार, रिसोड

याआधी गट नंबर ६०२ मधील एका वहीवाटदाराने हद्द कायम करण्यासाठी उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयामार्फत जून २०२४ मध्ये सरकारी मोजणी केली आहे. या दोनही सरकारी मोजणीच्या हद्द कायम निशाण्या तंतोतंत समप्रमाणात आल्या आहेत. त्यामुळे गट नंबर ६०२ मधील खाजगी सात- बारावर नोंद असलेली सदर अतिक्रमित विहीर ग्रामपंचायतच्या गावठाण क्षेत्रातील सरकारी जागेत असल्याचे सिद्ध झाले आहे. मात्र महसूल विभागाच्या निष्काळजीमुळे सदर अतिक्रमित विहीर गत नंबर ६०२ मधील वहीवाटदार यांच्या खाजगी सात- बारावर तर नोंदविण्यात आली आहेच पण विशेष बाब म्हणजे सदर विहिरीच्या नावावर शासनाच्या विविध अनुदानित योजणांचा अवैध लाभ घेतला असल्याचे बोलले जात आहे.



'सदर अतिक्रमित विषय, गट नंबर ६०२ व पूर्वेकडून असलेल्या गावठाण गट नंबर ६०० संबंधित आहे. हा विषय महसूल विभागाच्या अखत्यारीत येत आहे. त्यांनी योग्य ती कारवाई करून सदर विहीर ग्रामपंचायतच्या सुपूर्द केल्यास ग्रामपंचायत त्या विहिरीवर देखरेख करेल. ती विहीर ताब्यात घेऊन सर्व सामान्य लोकांची पाण्याची गरज भागाविण्यासाठी सार्वजनिक सरकारी विहीर म्हणून घोषित करण्यात येईल..!

**सौ. रेणुका भानुदास ताकतोडे**
सरपंच, ग्रामपंचायत शेलुखडसे
ता. रिसोड

# कांचन नदीच्या पुरामुळे शेजारील शेतकऱ्यांचे बेहाल

■ प्रतिनिधी | रिसोड ■

कांचन नदीच्या शेजारील शेतकऱ्यांच्या शेतजमीनी खरळून जातात, शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा मोबदला आजतागायत भेटलेला नाही, शासनाने याची गंभीर नोंद घ्यावी व जिल्हा प्रशासनास सूचना द्याव्या, बाधित शेतकऱ्यांना मदत करण्यात यावी.

राज्यासह वाशिम जिल्ह्यामध्ये संततधार पावसाची मालिका सुरू आहे. रिसोड तालुक्यातील पिपरी सरहद्द अंचळ, जोगेश्वरी तपोवन , नेतंसा, नावली ,मांगुळ झनक या गावावरून कांचन नदी गेली आहे, नदीकाठील शेतकऱ्यांच्या शेतामध्ये नदीला आलेल्या पुराचे पाणी हे ओसाडून वाहत आहे, या नदीमध्ये मेहकर तालुक्यातून येणारे पाणी येते व नदीला भयावह पूर येतो, पूर आल्यानंतर शेजारील शेतकऱ्यांच्या शेतामध्ये जे पीक आहे ते सर्व पीक त्या पाण्याखाली जाते, शेतकऱ्यांच्या शेतजमिनी खरडून जातात येण्या जाण्याकरिता असलेले रस्ते सुद्धा वाहून गेले आहेत, शेतकऱ्यांचे सोलर, लाईनचे खंबे व इतर शेती उपयोगी



साहित्य, सर्व पुरामध्ये वाहून गेलेले आहे. या सर्व बाबींची दखल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी घ्यावी याकरिता मंत्रालय मुंबई येथे मुख्यमंत्री फडणवीस व कृषी विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी यांना कास्तकार फाउंडेशन च्या वतीने अध्यक्ष विष्णू बाजड, जिल्हाध्यक्ष राम पाटील वानखेडे उपाध्यक्ष दीपक गोळे सचिव सतीश गोळे , यांनी निवेदन दिले, व त्यांना विनंती करण्यात आली की लवकरात लवकर आपण बाधित गावांचा आढावा घ्यावा व किती नुकसान झाले. याची गांभीर्याने दखल घ्यावी व ज्या शेतीमध्ये अजूनही पाणी साचलेले आहे . व ज्या शेतकऱ्यांची शेतजमीन खरडून गेली आहे. अशा शेतकऱ्यांना भरघोस मदत तात्काळ द्यावी अश्या प्रकारची विनंती केली.

# 'मोतिबींदु मुक्त महाराष्ट्र' मोफत नेत्रतपासणी व शस्त्रक्रिया मोहिमेची सुरवात



■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्य शासनाच्या आरोग्य विभागामार्फत दि. २२ जुलै २०२५ ते २२ ऑगष्ट २०२५ या कालावधीत मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र हि विशेष मोहिम संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत वाशिम जिल्हयातील सर्व नागरिकांना मोफत नेत्रतपासणी व मोफत मोतीबिंदू नेत्र शस्त्रक्रिमा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. मा. राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महिला व बालविकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र या विशेष मोहीमेचे आयोजन केले आहे.

त्यानुसार वाशिम जिल्हयामध्ये सदर मोहिमेचे उद्घाटन आज दि.२२ जुलै रोजी जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ अनिल कावरखे यांच्या हस्ते करण्यात आले. सदर उद्घाटन प्रसंगी उपस्थीत सर्व रुग्णांना मोतिबीदु आजाराविषयी तसेच डोळ्यांच्या इतर आजाराविषयी संपूर्ण माहिती देण्यात आली, मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र योजना यशस्वी करण्यासाठी ४० वर्षावरील सर्वच जनतेची नेत्र तपासणी तसेच ज्यांना डोळ्याचे इतर आजार आहेत अशा सर्वांनी आपली नेत्र तपासणी प्रा. आ.केंद्र, ग्रामीण रुग्णालय व जिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी जाउन करावी व आरोग्य कर्मचा-यांनीही आरोग्य तपासणी नंतर सर्व रुग्णांवर योग्य ते उपचार करुण रुग्णाच्या उत्तम पुर्णदृष्टी साठी सर्वोतोपरी प्रयत्न करावे.

# ४५ वर्षांपासून बारी ची प्रथा कायम; शर्मा कुटुंबियांचे योगदान



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शहरात श्रीराम बन्सीलाल शर्मा यांनी सुरू केलेली नागपंचमी च्या बाऱ्याची प्रथा आजही कायम आहे अनेक लोक या पूजेचा लाभ घेतात.

शहरात श्रीराम बन्सीलाल शर्मा यांनी नागपंचमी च्या निमित्ताने नागदेवतेचे पूजन करून बाऱ्या म्हणण्याची प्रथा सुरू केली होती ती प्रथा आजही सुरू असून त्याबद्दल आज ४५ वर्षे पूर्ण होत आहेत यापूर्वी अमृता आंध आणि वामन गारोडी यांनीं यांची सुरवात स्वतंत्र काळापासून केली होती असे म्हटले जाते नन्तर शर्मा आणि त्यांचे मित्रमंडळ यांनी ही प्रथा सुरू केली होती अनेक भजन गीत ते गात होते ती प्रथा आजही त्यांचे मुलं सुनील आणि नरेश शर्मा अतुल शर्मा व त्यांचे मित्र मंडळ यांनी कायम ठेवलेली आहे आज रोजी त्यांचे मुलं ही बाऱ्याचे प्रथा कायम ठेवून भव्य महाप्रसादाचे सुद्धा आयोजन करत असतात दि.२८ जुलै रोजी भव्य दिव्य बाऱ्या व महाप्रसादाचा कार्यक्रम सुद्धा बालाजी मंदिर येथे करण्यात येणार असुन दर वर्षी तीन हजार पेक्षा जास्त भाविक भक्त महाप्रसादाचा लाभ घेत असल्याचे बोलल्या जात आहे.

# उंबर्डा बाजार जिल्हा परिषद उर्दू शाळा व गो ग्रीन फाउंडेशन यांच्यावतीने वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

■ प्रतिनिधी | कारंजा ■

दि.२६ जुलै २०२५ रोजी जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक उर्दू शाळा, उंबर्डा बाजार व गो ग्रीन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या उपक्रमात विद्यार्थी, शिक्षकवर्ग, गावकरी आणि गो ग्रीन फाउंडेशनचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पर्यावरण रक्षणाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापक श्री. जुनेद खान यांच्या मार्गदर्शनाने झाली. त्यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांना प्रेरणा



दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शिक्षक व गावकऱ्यांसह विविध वृक्षांचे रोपण केले. या वेळी उपस्थित मान्यवरांमध्ये गो ग्रीन फाउंडेशनचे पदाधिकारी श्री. पद्माकर मिसाळ, परमेश्वर व्यवहारे, रघुभाऊ वानखडे, सचिन ताथोड, प्रवीण जोशी, गिरीश जीचकार, जि प प्राथमिक शाळा उंबर्डा बाजार शाळेतील मुख्याध्यापक अविनाश शिरसाट, केंद्रप्रमुख जाकीर अहमद शेख सर, तसेच शिक्षकवृंद – उज्वला ढोरे मॅडम, शेंडे मॅडम, शामीला मॅडम, बुशरा मॅडम, मोहसीन सर, समाजसेवक वसीम भाई, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आणि गावकरी मंडळी यांचा समावेश होता.

'झाडे लावा, जीवन वाचवा' या संकल्पनेनुसार विद्यार्थ्यांनी लावलेल्या झाडांची जबाबदारी स्वतः घेण्याचे वचन दिले. कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली.

# 'आधार' वृद्धाश्रमात वरिष्ठ नागरिकांचे मोफत आरोग्य तपासणी शिबिर



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम तालुक्यातील तामसी येथील 'आधार' वृद्धाश्रम येथे दि. २२ जुलै रोजी वरिष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.

या शिबिराचे मार्गदर्शन डॉ. शुभांगी नत्थूजी बुंदे-पाटील यांनी केले. या तपासणीमुळे आश्रमातील तसेच गावातील अनेक ज्येष्ठ नागरिकांना आरोग्यविषयक लाभ झाला. 'आधार' वृद्धाश्रमामध्ये नेहमीच ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविले जातात. याचाच एक भाग म्हणून या शिबिरात होमिओपथी डॉक्टर शुभांगी बुंदे-पाटील आणि त्यांच्या टीमने उपस्थित ज्येष्ठांचे आरोग्य तपासले आणि मोफत औषधे दिली.

तसेच त्यांनी नागरिकांना त्यांच्या आरोग्यविषयक समस्यांवर मार्गदर्शन करून बहुमूल्य सल्ला दिला. या प्रसंगी राम पाटील डोरले, आश्रमाचे कर्मचारी व गावातील अनेक नागरिक उपस्थित होते.

# सोनार समाज बांधवांची बैठक संपन्न

**मालेगाव :** संत नरहरी सोनार मंदिर मालेगाव च्या अंतर्गत असलेल्या श्री संत नरहरी सोनार ट्रस्ट मालेगाव ची सर्वसाधारण सभा दि २६ जुलै रोजी श्री संत नरहरी सोनार मंदिरात पार पडली त्या सभेमध्ये विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. सभेच्या अध्यक्ष स्थानी गणेश अर्धापुरकर हे होते . सभेमध्ये मंदिराच्या प्रगती पथावर असलेल्या बांधकामाबद्दल चर्चा करुन आगामी विषयावर चर्चा करण्यात आली. त्याच वेळी नवीन अध्यक्ष म्हणून अविरोध महेश गजानन अंजनकर यांची निवड करण्यात आली. सचिव म्हणून विनोद बानाइतकर यांची फेर निवड करण्यात आली. उपाध्यक्ष गणेश अर्धापूरकर यांची निवड करण्यात आली सहसचिव अतुल भांडेकर यांची निवड करण्यात आली.

# वनसंवर्धन दिनानिमित्त वृक्षारोपण - एस एम सी इंग्लिश स्कूलच्या राष्ट्रीय हरित सेनेच्या चिमुकल्यांचा उपक्रम



■ प्रतिनिधी | वाशिम ■

प्रदूषणाचा भस्मासुर पृथ्वीला गिळू पाहत आहे. प्रदूषणाच्या समस्येने सर्वत्र उग्र रूप धारण केलेले असून पर्यावरणाचे रक्षण करणे आवश्यक झाले आहे. यासंबंधी समाजाला जागृत करण्यासाठी व समाजामध्ये वृक्षारोपण व संवर्धना संबंधी जनजागृती निर्माण करण्यासाठी २३ जुलै हा दिवस वनसंवर्धन दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

या दिनाचे औचित्य साधून प्राचार्य मीना उबगडे, राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक अभिजीत मुकुंदराव जोशी, विभागीय वन अधिकारी अशोक प-हाड, सहायक वनसंरक्षक राजेंद्र कातखेडे यांच्या मार्गदर्शनात वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात आले . यावेळी राष्ट्रीय हरित सेनेच्या चिमुकल्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले यावेळी राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक अभिजीत जोशी यांनी विद्यार्थीना वृक्षारोपण व संवर्धनाचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे आयोजन व संचलन राष्ट्रीय हरीत सेनेचे समन्वयक अभिजीत मुकुंदराव जोशी यांनी केले .वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाचे वनपाल समाधान सानप, वनरक्षक संतोष जुमडे, अनिल लेमले, बी. सी. वानखेडे व राष्ट्रीय हरित सेनेचे चिमुकले व शाळेचे माळी विशाल भंगी, यांनी मोलाचे सहकार्य केले.

# विद्याभारती शाळेत लोकमान्य टिळक यांची जयंती उत्साहात



■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथील विद्याभारती शाळेत लोकमान्य टिळक यांची १६९ वी जयंती अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली.स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच... असा मोहरा कधी न झाला कधी न होणार बाळ गंगाधर टिळक हे नाव जगात गर्जत राहणार... गर्जत राहणार.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक नितेश मिटकरी तर प्रमुख पाहुणे शाळेचे संचालक सुमित सुरेशराव मिटकरी, पर्यवेक्षक विजय गोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन तसेच लोकमान्य टिळकांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळकांविषयी भाषणे सादर केली. यानिमित्त शाळेमध्ये लोकमान्य टिळकांच्या जीवनावर आधारित निबंधस्पर्धा घेण्यात आली. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांसमवेत वृक्षारोपण करण्यात आले.

# समता महिला मंडळाच्या वतीने समता नगरमध्ये 'सर्वोत्तम भूमिपुत्र गौतम बुद्ध' ग्रंथपठनास सुरुवात



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम येथील समता नगरमध्ये समता महिला मंडळाच्या वतीने 'सर्वोत्तम भूमिपुत्र गौतम बुद्ध' या ग्रंथाच्या सामूहिक वाचन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. वर्षावासाच्या निमित्ताने १४ जुलैपासून सुरू झालेला हा कार्यक्रम तीन महिने संध्याकाळी आयोजित केला जाणार आहे.

या ग्रंथवाचनाचे आयोजन शोभाबाई पडघान यांच्या निवासस्थानी करण्यात आले असून वाचनाची वेळ संध्याकाळी ८.३० ते रात्री १० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. या कार्यक्रमात प्रज्ञाताई नवघरे या ग्रंथाचे वाचन करीत असून, परिसरातील अनेक महिला आणि उपासक-उपासिका नियमितपणे उपस्थित राहून श्रवणाचा लाभ घेत आहेत. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या महिलांमध्ये शोभाताई पडघान, रामकोर् जाधव, सुजाता अंभोरे, कमला मोरे, सुलोचना मोरे, मंदा भारसाकळ, मला घरडे, साधना डोंगरे, कल्पना गवई, यमुना साबळे, कविता जावळे, चमकाबाई खडसे, जोशना कांबळे, कुसुम सरकटे, जयश्री सुरवे, किरण गायकवाड, सिंधू जाधव, जया गवई, माया देवकते, सुषमा पडघान, अलका गायकवाड, शालिनी गवई, रत्नमाला उच्चार, बिजली ताजणे, वैशाली धुळधुळे, जिजाबाई भगत, दीक्षा पाईकराव, नलिनी ताईकराव, शोभा खंडारे, मीना पवार, शांताबाई सुके, शनि अंभोरे, सविता डोंगरदिवे, संगीता वानखडे, संध्या वानखडे, विशाखा जाधव, नम्रता कांबळे, अर्चना शेंडे, दुर्गा धुळधुळे, शालिनी अडागले, प्रमिला अडगळे, निशा कहाळे, लक्ष्मीबाई गुडदे, विजया इंगोले व सागर इंगळे यांचा समावेश आहे. तसेच, उपासकांमध्ये मारुती मोरे, किसन पडघान, दादाराव इंगोले, दगडू धुळधुळे, जनार्धन जाधव, वैभव कांबळे, आदींनीही नियमित उपस्थित राहून सहभाग नोंदवला.

# 'मन की बात' कार्यक्रमाचा १२४ वा एपिसोड उत्साहात

■ प्रतिनिधी | वाशिम ■

## भाजपा वाशिम शहराच्या वतीने २२ बूथवर यशस्वी आयोजन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संवादात्मक आणि प्रेरणादायी 'मन की बात' कार्यक्रमाचा १२४ वा एपिसोड भारतीय जनता पार्टी, वाशिम शहराच्या वतीने अत्यंत उत्साही वातावरणात आणि यशस्वीरित्या पार पडला. वाशिम शहरातील विविध २२ बूथवर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून मातृशक्ती, विश्व हिंदू परिषदेच्या विभाग संयोजिका सौ. अनिता ताई काकडे यांची विशेष उपस्थिती लाभली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणादायी विचारांमधून देशभक्तीची भावना अधिक दृढ झाली असून सामाजिक योगदानाच्या दिशेने नवचैतन्य निर्माण झाले.

**आजच्या 'मन की बात' मधील काही महत्त्वाचे मुद्दे :** महिला सक्षमीकरणावर विशेष भर. पर्यावरण रक्षणासाठी जनसहभागाचे आवाहन.



'वोकल फॉर लोकल' मोहिमेचा आढावा. युवकांसाठी उद्योजकतेला चालना. भारताच्या यशस्वी खेळाडूंना पंतप्रधानांकडून शुभेच्छा.

कार्यक्रमाची सुरुवात भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. तसेच भारताचे माजी राष्ट्रपती, 'मिसाईल मॅन' आणि भारत रत्न डॉक्टर ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आणि यशस्वी पार पडण्यासाठी खालील कार्यकर्त्यांचे मोलाचे योगदान लाभले : चरणजितसिंग सेठी, देवेंद्र बागरेचा, मुकेश चौधरी, जगदीश महाजन, वैभव वायचाळ, शंकर शेंडे, कविता खरात, रामा इंगळे, राम बोरा, नवीन शर्मा, स्वप्निल जाधव, राजेंद्र कलवार, कपिल सारडा, अनिता विटेकर, गिरीश शर्मा, छाया मडके, प्रदीप देशमुख, अभिजीत चव्हाण, अनिल ताजणे, विशाल बायवार, सुरेश ताजणे आणि इतर पदाधिकारी.

या कार्यक्रमाचे नेतृत्व भाजपा वाशिम शहराध्यक्ष मनीष मंत्री यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शहर संयोजक शिवम ताजणे व सुनील तापडिया यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमामध्ये भाजपा वाशिम शहरातील महिला मोर्चा, युवा मोर्चा तसेच अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २४३ ■ सोमवार, २८ जुलै २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## हिंगणघाट येथे व्हिडिओ गेम पार्लरवर पोलिसांची धाड

### -१५ जणांविरुद्ध गुन्हे दाखल

**हिंगणघाट जनमाध्यम :** वेगवेगळ्या ठिकाणी चालणाऱ्या ऑनलाइन व्हिडिओ गेम पार्लर जुगार अड्ड्यांवर छापे टाकून कारवाई केली. ही कारवाई शनिवार २६ रोजी करण्यात आली. पोलिसांनी ३ ठिकाणांहून ७ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून १५ जणांवर गुन्हा दाखल करून अटक केली. हिंगणघाट शहरातील गोलबाजार आणि शासकीय रुग्णालय चौक परिसरात ऑनलाइन व्हिडिओ गेम पार्लर बेकायदेशीरपणे सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर हिंगणघाट पोलिसांनी एकामागून एक ३ ठिकाणी छापे टाकले.



गोलबाजारमध्ये चालणाऱ्या व्हिडिओ गेम पार्लरवर पहिली कारवाई करण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळावरून १५ इलेट्रॉनिक मशीन आणि त्याच्या चाव्या जप्त केल्या. या मशीनमध्ये हाय-५, मास्टर, हॉलिडे, फ्रंट लाईन, जलसा, मेगा फ्री प्ले, मेगा बोनस यांचा समावेश आहे. यामध्ये मेगा व्हीनस इत्यादी कंपनीच्या मशिनचा समावेश आहे. डीव्हीआर, चार्जिंग अ?डॉप्टर आणि २४ हजार ३३० रुपयांची रोकड असा २ लाख ९० हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणात रंगारी वार्ड येथील आशिष पराशर (४५), ज्ञानेश्वर वार्ड येथील अनंत भीमनवार (५२), शेख नबी शेख सुलतान (४९), निशानपुरा वार्ड येथील इम्रान खान बिस्मिल्ला खान पठाण (४०), स्वीपर कॉलनीतील राजा मक्रे (३२), विठ्ठल मंदिर वार्ड येथील गजानन करवतकर (४२) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. दुसरी कारवाई त्याच परिसरात करण्यात आली.

तेथून ९ इलेट्रॉनिक मशीन आणि चाव्या जप्त करण्यात आल्या. घटनास्थळावरून ४ मोबाइल, सीसीटीव्ही कॅमेरा, ४३३० रुपयांची रोख असा २ लाख २२ हजार १३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तर शास्त्री वार्ड येथील विशाल माथणकर (३०), हनुमान वार्ड निवसी रूपेश खडतकर (३६), भीमनगर वार्ड येथील अर्पित मेंढे (२१), गौरव मडावी (१९) यांना ताब्यात घेण्यात आले. तिसरी कारवाई शासकीय रुग्णालय चौकातील अथर्व भोजनालय लगत असलेल्या टिन शेड दुकानात चालणाऱ्या व्हिडिओ गेम पार्लरवर करण्यात आली. संत कबीर वॉर्ड मधील रहिवासी आदर्श म्हैसगवळी यांच्या दुकानात हा अवैध व्यवसाय सुरू होता. घटनास्थळावरून विविध कंपन्यांच्या १० इलेट्रॉनिक मशिन्स आणि ११ हजार ३०० रुपयांची रोख असा २ लाख ६४ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्या. तर संत कबीर वार्ड येथील रहिवासी आदर्श म्हैसगवळी (२३), संत तुकडोजी वार्ड येथील विजय रघाटाटे (४५), यशवंतनगर येथील किशोर तेलकोजवार (४६), विठ्ठल मंदिर वार्ड येथील संजय सोनकुसरे (४२) यांना ताब्यात घेण्यात आले. तर प्रमोद मुंढे हा घटनास्थळावरून पसार झाला. पोलिसांनी तिन्ही कारवाईत १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### सावंगीच्या कॅन्सर रुग्णालयात यशस्वी उपचार

## गर्भाशयमुख कर्करोगाशी झुंजणाऱ्या तरुणीला जीवनदान




**वर्धा जनमाध्यम -** वयाच्या छत्तिशीत दुसऱ्या स्तरावरील गर्भाशयमुख कर्करोगाचे निदान झाले. बाह्य ऊर्जा विकिरण उपचार करूनही कर्करोगाची गाठ पूर्णपणे नष्ट झाली नाही. जीवघेण्या वेदनांनी स्त्रीरुग्ण त्रस्त असल्याने अखेर रेडिएशन विभागाने सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट चमूची मदत घेत तिला मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढले. सावंगी मेघे येथील सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलमध्ये ही नवजीवन देणारी शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडण्यात आली.

अवघ्या छत्तिशीत गर्भाशयमुखाच्या कर्करोगाशी झुंजणारी ही चंद्रपूर जिल्ह्यातील रहिवासी तरुणी असह्य वेदनेमुळे त्रस्त होती. नातेवाईकांनी तिला सावंगीच्या कर्करोग रुग्णालयामध्ये उपचारांसाठी भरती केले. रुग्णालयात रेडिएशन ऑन्कोलॉजी विभाग प्रमुख डॉ. तेजश्री तेलखडे यांनी तरुणीची तपासणी केली. सर्व आवश्यक चाचण्या पूर्ण झाल्यावर गर्भाशयमुखाचा दुसऱ्या स्तरावरील कर्करोग असल्याचे निदान झाले. ही कर्करोगाची गाठ ६ सेमी आकाराची होती. या गाठीवर एक्स्टर्नल बीम रेडिएशन अर्थात बाह्य विकिरणांद्वारे उपचार करण्यात आले. योग्य व प्रभावी उपचार होऊनही गर्भाशय मुखावर ३ सेमी आकाराची गाठ कायम राहिली. बाह्य विकिरण उपचारानंतर इतकी मोठी गाठ शिल्लक राहणे, ही दुर्मिळ स्थिती मानली जाते. या गाठीमुळे इंट्राकॅविटरी ब्रेकिथेरपी म्हणजेच आंतरगर्भाशय विकिरण उपचार करणे अवघड होते.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखत डॉ. तेजश्री तेलखडे यांनी त्वरित सर्जिकल ऑन्कोलॉजी विभागातील चमूशी संपर्क साधला. दोन्ही विभागातील तज्ज्ञांमध्ये योग्य समन्वय होऊन उपचारप्रणाली निश्चित करण्यात आली. सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. भूषण जाजू, डॉ. तनू प्रधान, डॉ. आदित्य पटेल यांनी आधी शस्त्रक्रिया करून गर्भाशय मुखावरील गाठ अधिकाधिक प्रमाणात बाहेर काढली. त्यानंतर डॉ. तेजश्री तेलखडे आणि डॉ. आशिष उके यांनी इंट्राकॅविटरी ब्रेकिथेरेपीचा वापर करीत शिल्लक राहिलेल्या गाठीला हायडोस रेडिएशन देऊन ही गाठ पूर्णतः नष्ट केली. या उपचार प्रणालीत मेडिकल फिजिसिस्ट डॉ. अनुराग लुहारिया, रेडिओथेरेपी परिचारिका आरती कांबळे आणि चमूचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले.

जटिल कर्करोगामुळे अकाली मृत्यूच्या दारात पोचलेल्या या तरुणीच्या कर्करोगाचे त्वरीत निदान करून तज्ज्ञ डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांनी अल्पावधित अत्याधुनिक उपचारप्रणालीचा वापर करीत तिला नवजीवन प्राप्त करून दिले. ठराविक कालावधीनंतर पुन्हा या तरुणीची पीईटी सीटी व एमआरआय पेल्वीस तपासणी केली असता कर्करोगाची कोणतीही लक्षणे तिच्यात आढळली नाहीत, असे डॉ. तेजश्री तेलखडे यांनी सांगितले.

## आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वर्ध्यात



**वर्धा जनमाध्यम :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज सोमवार दि. २८ जुलै रोजी वर्धा दौऱ्यावर येत असून ते सकाळी ११.५५ वाजता चरखा सभागृह, सेवाग्राम रोड, वर्धा येथे आगमन व आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी १.३० वाजता चरखागृह येथून नागपूरकडे प्रयाण करतील.

### १५ महिन्यांपूर्वीचे वापरले शपथपत्र

## ग्रामपंचायतचा भोंगळ कारभार, नियमबाह्य पद्धतीने राबविली निविदा प्रक्रिया

**कारंजा (घा) जनमाध्यम:** तालुक्यातील येनगाव ग्रामपंचायत अंतर्गत ग्रामपंचायत भवन बांधकामा करिता निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती या निविदा प्रक्रिये अंतर्गत ज्या निविदा धारकांनी निविदा सादर केल्या त्यामध्ये धीरज शरदराव जळीत या कंत्राटदाराला कंत्राट मिळावे म्हणून ग्रामपंचायत येनगांवने संपूर्ण निविदा प्रक्रिया मध्ये घोळ करून नियमबाह्य पद्धतीने शासकीय नियमांना तिलांजली देऊन धीरज जळीत या कंत्राटदाराचे निविदा प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीचे दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ म्हणजे तब्बल १५ महिन्यांपुर्वीचे शपथ पत्र ग्रामपंचायतने स्वीकारून संबंधित कंत्राटदाराला निविदा मंजूर करून दिली त्यामुळे ग्रामपंचायत येनगाव ने निविदा प्रक्रियेचे नियम धाब्यावर बसून मनमानी कारभार केल्याची तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांना तक्रारदार मोहम्मद रेहान रफीक शेख आणि सुरेश राक्षे यांनी केली. असून बनावट व बोगस दस्तऐवज सादर करून ते निविदा प्रक्रियेत मान्य करून घेणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे वर कार्यवाही करण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

-ही प्रक्रिया नियमबाह्य झालेली आहे. याबाबत सुनावणी घेऊन कार्यवाही करण्यात येईल. प्रवीण देशमुख गटविकास अधिकारी पंचायत समिति कारंजा

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा आज जनसंवाद



**वर्धा जनमाध्यम :** राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा आज दिनांक २८ जुलै रोजी दुपारी ३.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा येथे जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी आपल्या समस्या असल्यास लेखी स्वरूपात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उद्या दिनांक २८ जुलै रोजी वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात ते दुपारी ३.३० वाजता नागरिकांच्या तक्रारींच्या अनुषंगाने जनसंवाद कार्यक्रम करणार आहे. यावेळी ते नागरिकांच्या काही तक्रारी असल्यास लेखी स्वरूपात स्विकारुन संवाद साधणार आहे.

## दारू विक्रेत्याविरुद्ध पोलिसांची कारवाई ७० हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त



**हिंगणघाट जनमाध्यम :** गुन्हे शाखेच्या पथकाने मिळालेल्या माहितीच्या आधारावर विठ्ठल मंदिर वार्ड येथे अवैधरीत्या दारूची विक्री करणाऱ्या पाच जणांविरुद्ध कारवाई करून घटनास्थळा वरून एकूण ७० हजार २०० रुपयाचा दारूसाठा जप्त करण्यात आला,

या संबंधात पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार विठ्ठल मंदिर वॉर्ड येथे आर्थिक फायद्यासाठी आरोपी अनिल पावडे यांच्या घरी धाड टाकली असता विविध प्रकारच्या देशी विदेशी दारूच्या एकूण ४६७ शिश्या किंमत ७० हजार २०० रुपयाचा मुद्देमाल पोलिसांना आढळून आला, याप्रकरणी पोलिसांनी आरोपी भारत चंद्रकांत उंडे वय ३६ वर्ष रा. रंगारी वार्ड याला अटक केली. तर अन्य चार आरोपी अनिल पावडे ,विकी चौधरी, आकाश गवळी ,सुशील हे फरार असल्याचे पोलीसांनी सांगितले .ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखाचे पोलीस निरीक्षक श्री चौधरी सहाय्यक फौजदार मनोज धात्रक, महादेव सानत, पवन पन्नासे, विनोद कापसे यांनी केली. या संबंधात पुढील तपास हिंगणघाट पोलीस करीत आहे.

## पोलीसांच्या धाडीत ७७ हजार ८०० रुपयांचा दारूसाठा जप्त

**हिंगणघाट जनमाध्यम :** पोलिसांच्या गुन्हे पथकाने खबरीच्या माहितीच्या आधारावर महात्मा फुले वॉर्ड येथे धाड टाकली. तेव्हा आरोपी पंकज दीपक काळे वय ४५ वर्ष याच्या घरी ८३ विदेशी दारूच्या बाटल्या गावठी दारू व वाहतूक करणारी होंडा कंपनीची दुचाकी किंमत ६० हजार असा एकूण ७७ हजार ८०० रुपयांचा ऐवज जप्त केला. यासंबंधी पोलिसांनी आरोपी पंकज काळे विरुद्ध हिंगणघाट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. वरील कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांच्या मार्गदर्शनात गुन्हे पथकाच्या पोलिसांनी केली.पुढील तपास पोलीस करीत आहे.

## शहरातील कलोडे सभागृह समोरील अतिक्रमित झोपडपट्टी उठवून त्यांचे दुसरीकडे पुनर्वसन करा

**हिंगणघाट जनमाध्यम :** संत तुकडोजी वॉर्डातील कलोडे सभागृह समोरील अतिक्रमित झोपडपट्टी उठवून त्यांचे दुसरी कडे पुनर्वसन करा या मागणीसाठी कलोडे सभागृहात संत तुकडोजी वॉर्ड प्रभाग क्रमांक ६ व १६ मधील महिला जेष्ठ नागरिकांनी बैठक आयोजित करण्यात आली, या बैठकीला वॉर्डातील सर्व महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिनांक १ ऑगस्ट रोजी कलोडे चौक येथे रास्ता रोको करण्यात येईल. असे सर्वानुमते बैठकीत निर्णय घेण्यात आला.

संत तुकडोजी वॉर्ड येथील कलोडे सभागृह समोरील शासकीय जागेवरील अतिक्रमण हे संत तुकडोजी वॉर्डातील रहिवाश्यांना अतिशय त्रासदायक ठरत आहे. येथील काही दुकानांमध्ये व झोपडपट्टीमध्ये दारू व इतर नशिले पदार्थ विकण्यात येते. तसेच या रस्त्यावर मुली व महिलांची नेहमीच छेड काढल्या जाते.


### -या मागणीसाठी संत तुकडोजी वॉर्डातील नागरिकांचा १ ऑगस्ट रोजी रास्ता रोको आंदोलनं

अतिशय खराब शब्दात बोलल्या जाते. तसेच कुठल्याही सामूहिक सणाला येथे दारू पिवून शिवीगाळ व भांडणे करतात. तसेच झोपडपट्टीमध्ये कुठलीही परवानगी न घेता रात्री १२ वाजेपर्यंत डिजे वाजविला जातो. त्याशिवाय या परिसरात अस्वच्छता राहत असल्यामुळे संत तुकडोजी वॉर्डातील नागरिकांना डेंग्यू, मलेरियासारख्या रोगाचा सामना करावा लागतो. तसेच घरातील व दुकानातील घाण पाणी रहिवाशांच्या घरासमोर आणून टाकतात. याबाबत हटकल्यास अंगावर मारायला धावून येतात. हा त्रास नेहमीचाच झाला असून, येथील झोपडपट्टीला दुसरीकडे स्थलांतरीत करा या मागणीसाठी संत तुकडोजी वॉर्डातील नागरिकांनी प्रशासनाला अनेक वेळा निवेदने दिली.परंतु प्रशासनाने कुठलीही दखल घेतली नाही.अखेर १ ऑगस्ट रोजी कलोडे चौक येथें रास्ता रोको आंदोलनाला संत तुकडोजी वॉर्डातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन अतिक्रमण हटाव आंदोलन समितीने केले आहे.

## दोन गुराख्यांमध्ये हाणामारी!

### -बोरधरण येथील घटना

**सेलू जनमाध्यम :** माझ्या जनावरांकडे का बघतो असे म्हणत वाद करून एका गुराख्याने दुसऱ्या गुराख्यास लाथाबुयांनी मारहाण करीत जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना तालुयातील बोरधरण येथे घडली. या प्रकरणी बालाजी भोवरे (४५) रा. बोरी कोकाटे यांनी मधू कोवे रा. बोरधरण यांच्या विरुद्ध पोलिसात तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला.



बालाजी भोवरे व मधू कोवे हे जनावरे चराईसाठी घेऊन गेले होते. शुक्रवारी सायंकाळी बालाजी जंगलातून जनावरे घरी घेऊन आले असताना त्यांना जनावरांमध्ये म्हशीचे वगार दिसले नाही.

त्या वगाराचा शोध घेत असताना मधू कोवे याने माझ्या जनावरांकडे का बघतो असे म्हणून वाद करीत बालाजीला शिवीगाळ करून मारहाण करीत जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद केले. यात्रकरणी पोलिसांनी गुन्ह्याची नोंद घेतली असून पुढील तपास सेलू पोलिस करीत आहे.

### सावली वाघ घर कोसळले

## अखेर मायलेकास घरकुल बांधून देणार

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यातील सावली वाघ येथे संततधार पावसाने घर पडले.आणि संसार उघड्यावर व कुटुंब स्नानगृहात. मदतीची वाट बघत थकले. अखेर आज प्रशासनास जाग आली. मायलेकास ग्रामपंचायतची ओसरी मिळाली आणि आता घरकुल च्या माध्यमातून घर बांधून देणार आहे,

श्रीराम डंभारे यांची आपत्ती मन पिळवटून टाकणारी. सततच्या पावसात घर कोसळले. दुसरीकडे जायची सोय नाही. मतिमंद असल्याने गावातून मदत मिळेनाशी. म्हणून पडक्या संडास व स्नानगृहात दोघेही आश्रयास. जेवणाची सोय नाही. पुढे काय, याची जाणीव नाही. तेव्हा तहसीलदार शिंदे यांनी माहिती देत सांगितले की, या मायलेकास रात्री ग्रामपंचायत कार्यालयात हलवण्यात आले. जेवणाची सोय करण्यात आली. या कुटुंबास काही नियम शिथिल करीत घरकुल देण्याचा प्रस्ताव आता तयार केल्या जाईल. वरिष्ठ पातळीवर मान्यता घेऊ. त्यांचा सन्मानपूर्वक गृहप्रवेश होईल. आरोग्य तपासणी पण केली. ते खुश आहेत, असे तहसीलदार शिंदे यांनी सांगीतले,

प्राप्त माहितीनुसार, या कुटुंबास पुढील मदत मिळेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयातच ठेवल्या जाणार आहे. तशी दक्षता घेण्यास मंडळ अधिकारी व तलाठी यांना सूचित करण्यात आले आहे. मतिमंद असल्याने ते काही बाबी समजून घेत नाही. त्यांचे आधारकार्ड नाही. पण यातून मार्ग काढण्याची तयारी प्रशासनाने ठेवली आहे. आमदार समीर कुणावार यांनी पण काही वेळा या कुटुंबास मदत दिली. आता पुढे हे मायलेक वाऱ्यावर येवू नये म्हणून प्रशासन त्यांना दत्तक घेईल.

घर पडण्याच्या स्थितीत असल्याने त्यांना सतर्क करण्यात आले होते. पण ते कुणाचेच ऐकत नाही. त्यांचे कोणी नातलग नाही. अशास्थितीत त्यांचा सांभाळ कसा करणार, ही गावकऱ्यांची चिंता. पण आता वृत्त उमटले आणि लगबग सूरू झाली. सध्या तरी शासकीय वास्तू हाच त्यांचा आधार ठरणार. तहसीलदार शिंदे म्हणतात, आम्ही आहोच. ते कुटुंब आता आमची जबाबदारी.

### नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर N 3 3 7 5 2 3 4 वरील माझे नाव **SARFARAZ RAFIK GHANCHI** असे नाव होते.माझ्या आधार कार्ड वरील **SARFARAZ MOHD RAFIQ GHANCHI** हे नाव नमूद आहे. वरील नाव पासपोर्ट वर नमूद करावे.

**पत्ता :-**
सुदामपूरी वर्धा, ४४२००१

## अज्ञात वाहनाच्या धडकेत पादचारी ठार

### -महाबळा शिवारातील घटना

**सेलू जनमाध्यम :** सेलू नागपूर महामार्गावरील महाबळा नजीक नायरा पेट्रोल पंपाजवळ बैल चराई साठी गेलेल्या पादचारी व्यक्तीला भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात पादचारी जागीच ठार झाला, ही घटना रविवारी दुपारी चार वाजताच्या सुमारास घडली दिलीप मोतीराम जेंगठे (वय ४६) रा महाबळा असे मृत व्यक्तीचे नाव आहे,

महाबळा येथील दिलीप जेंगठे हा बैल चराई साठी घेवून गेला होता तो परत येताना नायरा पेट्रोल पंपाजवळ भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने धडक दिली यात तो जागीच ठार झाला घटनेनंतर ट्रकचालक वाहनासह पसार झाला यात घटनेची माहिती मिळताच रुग्णमित्र प्रज्वल लटारे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली सेलू पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेचा पंचनामा केला मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले पुढील तपास पी एस आय किरण महाजन करीत आहे.

## डॉ. सचिन पावडे यांना 'स्पेशल हाय नेट-वर्थ इंडिव्हिज्युअल (HNI) पुरस्कार

**वर्धा जनमाध्यम –** आयआयएम नागपूर येथे पार पडलेल्या कॉर्पोरेट फिलंथ्रॉपी कॉन्क्लेव्ह आणि लीडरशिप समिट २०२५ या भव्य कार्यक्रमात वर्ध्याचे सुप्रसिद्ध समाजसेवक व आरोग्य क्षेत्रातील कार्यकर्ते डॉ. सचिन पावडे यांना स्पेशल हाय नेट-वर्थ इंडिव्हिज्युअल (HNI) पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



डॉ. पावडे यांनी गेल्या काही वर्षांमध्ये आरोग्यसेवा, पर्यावरण,भूजल पुनर्भरण ,ग्रामीण विकास, आणि सामाजिक बांधिलकीच्या विविध उपक्रमांतून समाजात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. त्यांच्या अथक योगदानामुळे विदर्भातील अनेक ग्रामीण भागात आरोग्य सुविधा व सामाजिक जनजागृतीत लक्षणीय सुधारणा झाल्या आहेत. हा पुरस्कार त्यांच्याद्वारे समाजासाठी करण्यात आलेल्या सेवाभावी कार्याची पावती असून, त्यांचा दृष्टिकोन व कार्यपद्धती इतरांसाठीही प्रेरणादायी आहे. डॉ. पावडे यांनी पुरस्कार स्वीकारताना सांगितले, 'हा सन्मान माझ्या एकट्याचा नसून, तो वैद्यकीय जनजागृती मंच,इंडियन मेडिकल एसोसिएशन वर्धा, इंडियन रेडक्रॉस सोसाइटी वर्धा,कुटुंबाचा आणि त्या सर्वांचा आहे, जे माझ्यासोबत या प्रवासात होते. समाजासाठी अधिक कार्य करावे, हीच या पुरस्कारामागची खरी प्रेरणा आहे.




# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## न्यायालयाची नियमावली

निर्णययंदाचा गणेशोत्सव आता जेमतेम महिन्यावर आलेला असताना मूर्ती विसर्जनाबाबत निर्माण झालेला पेच मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे संपुष्टात आला आहे. गणेशोत्सवाची वाढत चाललेली लोकप्रियता, जल्लोषात उत्सव साजरा करण्याची भक्तांची मानसिकता आणि त्यातूनच मूर्तींच्या उंचीबाबत निर्माण झालेली चढाओढ यातूनच गणेशोत्सव, नवरात्रोत्सव तसेच माघी गणेशोत्सवातील मूर्ती विसर्जनाबाबत समस्या निर्माण झाली होती. गणेश मूर्तीची वाढती उंची हा भाविकांच्या उत्साहाचा विषय असला तरी विसर्जन मिरवणुकीसाठी उंच मूर्ती मंडपातून काढणे, विसर्जनस्थळी वाजतगाजत नेणे, रस्त्यादरम्यान होणारी वाहतूक कोंडी, भाविकांचे नृत्य, गणेश भक्तिपर गाण्यांचा जल्लोष यामध्ये मंडपातून निघालेली मूर्ती वाहनातून विसर्जनस्थळी नेईपर्यंत मूर्ती सांभाळणाऱ्या कार्यकर्त्यांना करावी लागणारी तारेवरची कसरत हे एकप्रकारचे अग्निदिव्यच असते. दरवर्षी उंच मूर्ती विसर्जित करताना महापालिका कर्मचारी, सुरक्षा रक्षक, मंडळाचे पदाधिकारी, सदस्यांना द्राविडी प्राणायम करावा लागतो. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींच्या उंचीवरून वादास सुरुवात झाली आहे. पीओपीच्या मूर्तींना बंदी घालण्यात आली असली तरी विविध कारणांमुळे बंदीच्या अंमलबजावणीला अजून यश आलेले नाही. पीओपींच्या मूर्तींचा वाद हा अलीकडच्या गेल्या काही वर्षांमध्ये निर्माण झालेला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने ३० जानेवारी २०२५ पीओपीपासून बनवलेल्या मूर्ती आणि त्यांचे जलसाठ्यात विसर्जन करण्याविरुद्ध अंतरिम आदेश दिला आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश दिले. तथापि, न्यायालयाने आदेश देऊनही बाजारात पीओपीच्या मूर्ती आजही निर्माण होत आहेत. पीओपींच्या मूर्तींमुळे जलप्रदूषण होत असल्याने केंद्र सरकारने त्या मूर्तींच्या विसर्जनास वारंवार आक्षेप घेत शाडूच्या मूर्ती अथवा अन्य पर्यायांचा शोध घेण्यास यापूर्वीच सुचविले आहे. पीओपी पर्यावरणपूरक नाही. ते नद्यांमध्ये, पाण्यात विरघळू शकत नाही. त्यामुळे नद्या उथळ होतात. दुसरीकडे तलाव किंवा विहिरीत विसर्जन केले, तर नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत खराब होतात. त्यामुळे या मूर्तींना नाही तर त्यांच्या विसर्जनाला व त्यातून निर्माण होणाऱ्या जलप्रदूषणाला केंद्र सरकारने वारंवार आक्षेप घेतला आहे. केंद्राचा हेतू पर्यावरणपूरक असला तरी अनेकजण रोजगाराला मुकतील, बेरोजगार होतील, अनेकांना कर्जबाजारी व्हावे लागेल अशा स्वरूपाचे आक्षेप घेत अनेकांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत. २०१२ पासून केंद्र सरकार पीओपी मूर्तींच्या विरोधात असले, तरी भाविकांची पीओपी मूर्ती खरेदी करण्याची मानसिकता, सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रोत्सव मंडळाचाही याच मूर्ती खरेदीबाबतचा आग्रह यामुळे बाजारात पीओपीच्या मूर्तींवर बंदी येणे तूर्तास तरी शक्य दिसत नाही. धर्म आणि रूढी-परंपरांच्या नावाखाली पर्यावरणाचा विचार सोडून देणे आणि अविचारी पद्धतीने उत्सव साजरे करणे हे मुळात चुकीचे असले तरी आजही कोणी हे समजून घेत नाही, हीच खरी शोकांतिका आहे. मूर्ती बनवणाऱ्यांना मूर्ती बनवण्यासाठी नैसर्गिक, विघटनशील आणि पर्यावरणपूरक कच्च्या मालाचा वापर करण्यास कोणाकडूनही प्रोत्साहित केले जात नाही. त्यातून पीओपी मूर्ती विसर्जनावरून केंद्र सरकार व मूर्ती उत्पादक यांच्यातील वाद उच्च न्यायालयात गेला. न्यायालयाने या वादावर तोडगा काढला असला तरी हा तोडगा हंगामी स्वरूपाचा आहे. कायमस्वरूपी नाही. येणाऱ्या माघी गणेशोत्सवापर्यंतच या तोडग्याची मुदत आहे. सहा फुटांवरील गणेश मूर्तींचे समुद्रात, तर त्याखालील मूर्तींचे कृत्रिम तलावांमध्ये विसर्जन करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. पाच फुटांपर्यंतच्या मूर्ती विसर्जनाबाबत कृत्रिम तलावामध्ये न्यायालयाने आदेश दिले असले तरी मुंबई तसेच मुंबई सभोवतालच्या ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल या एमएमआरए क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांवरील जबाबदारी वाढविली आहे. पाच फुटांपर्यंतच्या गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलावाची उंची व खोली याचाही स्थानिक प्रशासनाला प्राधान्याने विचार करावा लागणार आहे. गणपतीबाप्पा हा श्रद्धेचा विषय आहे. या मूर्तींचे विसर्जन पारंपरिक पद्धतीने व्हावे असा त्यांचा आग्रह असला तरी गणेश भक्तांची अलीकडच्या काळात विसर्जनाबाबतची मानसिकता बदलली आहे, हा खरोखरीच बदल मानावा लागेल. वाहतूक कोंडी, परिसरापासून काही अंतरावर विसर्जन स्थळ, विसर्जन स्थळी असणारी गर्दी व त्यातून विसर्जनास होणारा विलंब आणि अनेकदा विसर्जनासाठी हमखासपणे असणारी वरुणराजाची हजेरी यामुळे घराजवळच उपलब्ध असणाऱ्या कृत्रिम तलावांचा पर्याय गणेश भक्तांनी स्वीकारला आहे. यात विसर्जनादरम्यान कृत्रिम तलावांमध्ये मूर्ती विसर्जित करण्यास चांगला प्रतिसाद मिळू लागला. पीओपींच्या मूर्ती विसर्जनावर न्यायालयाने दिलेला निर्णय ही केवळ वरवरची मलमपट्टी आहे. कोणत्याही समस्येवर ठोस तोडगा काढणे आवश्यक असते. अन्यथा त्या समस्येचा भस्मासूर होण्यास फारसा वेळ लागत नाही. पीओपींच्या मूर्तींमुळे पर्यावरणाची होणारी हानी, जलप्रदूषण या गोष्टींकडेही कानाडोळा करून चालणार नाही. त्या सत्यतेचा स्वीकार करण्याची मानसिकता आपणास स्वीकारावी लागणार आहे. मूर्ती मोठ्या उंचीची असो व छोटी असो, गणराया सर्वांमध्येच सामावलेले. भक्त गरीब असो वा श्रीमंत, गणराया आशीर्वाद देताना दुजाभाव दाखवत नाही. उंच मूर्ती हा प्रतिष्ठेचा विषय बनविण्याच्या संकल्पनेला कोठे तरी छेद द्यावाच लागेल. विषय श्रद्धेचा असला तरी त्यातून निर्माण होणाऱ्या परिणामांचाही कधी तरी विचार करावाच लागेल. नदी, तलाव, समुद्र या नैसर्गिक पर्यायांशिवाय अन्य पर्यायांचा शोध घेण्यास आपणास मर्यादा पडल्या आहे. शाडूच्या गणेशमूर्तींचे लवकर विसर्जन होते. ती माती आपण शेतामध्ये, बागेमध्ये, उद्यानांमध्ये वापरू शकतो. पीओपी मूर्तींबाबत ते शक्य नाही. पीओपी मूर्तिकारांना माघी गणेशोत्सवापर्यंत न्यायलयीन निर्णयामुळे तूर्तास दिलासा मिळाला आहे.

# महाराष्ट्रातील राजकारणात 'नवी विटी नवा दांडू' होणार?

**एरव्ही 'अरे तुरे च्या सामन्यात' रंगणा-या माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यानी फडणवीस यांचे तोंडभरून कौतूक केले. थोडक्यात महाराष्ट्रात राजकीय वारे बदलण्याची चिन्ह आहेत. देशात राजकीय उलथापालथ होत असतानाच राज्यात देखील 'नवी विटी नवा दांडू' होण्याची शक्यता दृढ झाली आहे.**

राज्य विधीमंडळाचे तीन आठवड्यांचे अधिवेशन 'नको त्या विषयांमुळे' चर्चेत राहिले. या अधिवेशनात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी, महिला यांच्या हिताच्या चर्चा आणि प्रश्नाना न्याय मिळाला का? असा प्रश्न पडला असतानाच राज्य सरकारच्या वतीने मात्र १६ विधेयकांसह अनेक महत्वाचे निर्णय झाल्याच्या प्रशस्तीची थाप मुख्यमंत्र्यानीच आपल्या सरकारच्या पाठीवर मारल्याचे पहायला मिळाले. राज्यात महायुतीचे पाशवी बहुमताचे सरकार सत्तेवर आल्यापासूनचे हे तिसरे पूर्णकालिक अधिवेशन होते. मात्र सत्ताधारी सदस्यांपासून विरोधकांपर्यत सर्वच पक्षांच्या लोकप्रतिनीधींकडून विकासाच्या कामानां निधीच मिळाला नसल्याची ओरड सातत्याने कायमच राहिली आहे. आता तर केवळ आठ महिन्यातच सरकारच्या मंत्र्यांच्या अपयशी आणि वादग्रस्त कारकिर्दीमुळे मंत्रिमंडळ खांदेपालटाच्या चर्चांना जोर चढला असून १५ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन नव्या को-या मंत्रिमंडळासह साजरा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**भाजप स्वबळावर लढण्याची शक्यता**

महायुती सरकारमधील जाणकार सूत्रांनी अनेक गोष्टींचा खुलासा करताना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बहुतांश महत्वाच्या जिल्ह्यातील निवडणूका भाजप स्वबळावर लढण्याची शक्यता असल्याचे स्पष्ट केले आहे. त्याबाबत मुख्यमंत्र्यांनी देखील शक्य नसेल तेथे तीनही पक्षांकडून वेगळे लढण्याचे सूत्र निश्चित केले जात असल्याचे सूतोवाच माध्यमांशी बोलताना केले आहे. त्यामुळे मुंबई ठाणे पुणे नागपूर सारखे काही अपवाद वगळता राज्यात महायुतीचे घटकपक्ष वेगवेगळे लढण्याची शक्यता आहे.

याचाच परिपाक असा झाला आहे की शिवसेना शिंदेगटाने नुकतेच आनंदराज आंबेडकर यांच्या रिपब्लिकन सेना या पक्षासोबत युती केल्याचे जाहीर केले आहे. तर भारतीय जनता पक्षाने देखील अनेक जिलह्यातील सर्वपक्षीय दिग्गज नेते कार्यकर्ते यांना गळाला लावत आपल्या पक्षांत घेण्याचा सपाटा कायम ठेवला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात देखील दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या चर्चांना उधाण आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीत शिवसेना उबाठा आणि मनसेकडून युती करण्याबाबत चाचपणी केली जात आहे. अश्यावेळी महाविकास आघाडीतील काँग्रेसपक्ष एकाकी राहण्याची शक्यता असून महाराष्ट्रात येत्या काही दिवसांत मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चा देखील सुरू झाल्या आहेत.

**मंत्रिमंडळ विस्तारापूर्वी महामंडळ वाटपाची शक्यता**

याचे कारण शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट, भरत गोगावले, संजय राठोड, दादाजी भुसे यांच्याबाबत माध्यमांतून भ्रष्टाचाराच्या तसेच हनीट्रॅंप-मनीट्रॅंपच्या चर्चांना उधाण आले आहे. भारतीय जनता पक्षाचे मंत्री जयकुमार गोरे, नितेश राणे, आणि गिरिश महाजन यांच्या मंत्रीपदावर गंडातर येणार असल्याच्या चर्चा माध्यमांतून आणि समूह माध्यमांतून वेगाने होताना दिसत असून राष्ट्रवादीचे मंत्री नरहरी झिरवाळ आणि माणिकराव कोकाटे यांच्या मंत्रिपदावर देखील गदा येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. राज्याच्या सामाजिक न्यायमंत्री आणि राज्यमंत्री यांच्यातील वाद जाहीरपणे पत्रांच्या माध्यमातून समोर आला असून मुख्यमंत्र्याच्या नियंत्रणाबाहेर मंत्रिमंडळातील मंत्र्याच्या खात्यात परस्पर बदल करण्याची जुनी परंपरा उपमुख्यमंत्र्याकडून सुरूच राहिली आहे. त्याचवेळी राष्ट्रवादीचे माजी मंत्री अनिल पाटील, धनंजय मुंडे पुन्हा मंत्री होण्याची शक्यता असून विधानसभाध्यक्ष राहूल नार्वेकर मंत्री होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यांच्या रिक्त जागी ज्येष्ठ भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांची वर्णी लागण्याची शक्यता असून शिवसेनेतून मनिषा कायंदे किंवा निलम गो-हे यांना मंत्रिपद दिली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उत्तर महाराष्ट्रातून किशोर पाटील, तर हिंगोलीचे शिवसेना आमदार संतोष बांगर यांच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राज्यात मंत्रिमंडळ विस्तारापूर्वी महामंडळाच्या वाटपाची घोषणा होण्याची शक्यता असून भाजपला ४५ शिंदे गटाला ३५ तर अजित पवार गटाला २८ महामंडळे शासकीय समित्यांच्या अध्यक्षपदांचा 'फॉर्म्युला' ठरल्याचे सांगण्यात येत आहे.

**सरकार 'रम-रमा-रमी' मध्ये 'रममाण' झाल्याचे चित्र?**



हे सारे जरी होत असले तरी राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा उर्मटपणा आणि रमीचा डाव, गृहराज्यमंत्री कदम यांच्या कुंटूंबियाच्या मालकीच्या लेडीज डान्सबारवर पोलीसांच्या छाप्यात आक्षेपार्ह गोष्टी सापडल्याने परवाना रद्द झाल्यचे प्रकरण किंवा राज्याच्या महसूल वाढावा या उदात्त भावनेने राज्य सरकारने तीनही घटकपक्षांच्या नेत्यांशी संबधितांना नव्याने सव्वा दोनशे दारू दुकानांचे परवाने देताना दाखवलेली तत्परता आणि महेरनजर यामुळे हे सरकार 'रम-रमा-रमी' मध्ये 'रममाण' झाल्याचे चित्र विरोधकांकडून रंगवले जात आहे.

महाराष्ट्रात 'हनी नाही आणि ट्रॅंप नाही' अशी स्पष्टोक्ती अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी खुद्द मुख्यमंत्र्यांकडून देण्यात आल्यानंतरही राज्यातील भाजपच्या एका मंत्र्याशी संबंधित लोढा नावाच्या व्यक्तीला मुंबईत पोलीसांनी ताब्यात घेतल्याचे समोर आले आहे. या व्यक्तीचे भाजपसह राष्ट्रवादी शिवसेना ठाकरे पक्षांच्या दिग्गज नेत्यांशी संबंध असल्याची छायाचित्रही माध्यमात झळकत आहेत. तर या अटक केलेल्या लोढाचे जुने व्हिडीयो व्हायरल झाले असून त्यात त्याने भाजपच्या एका नेत्याला 'एक बटन दाबून धडा शिकवण्याच्या धमक्या' दिल्याचे दिसत आहे. तर अश्या वादळी घडामोंडीमध्ये महाराष्ट्रात सध्या सामान्य जनतेच्या जगण्याचे प्रश्न बाजुलाच पडले असून राजकीय नेते सत्ताधारी आणि त्यांच्या बगलबच्च्यांच्या बरबटलेल्या कारनाम्यांनी माध्यमांमध्ये माहितीचा पाऊस पडताना दिसत आहे. त्यातून महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षात कश्याप्रकारे राजकीय लांडगेतोड आणि सत्तेची साठमारी करताना घोटाळे हेराफेरी आणि भ्रष्टाचार करण्यात आला आहे हेच समोर येताना दिसत आहे. छत्तीसगड मध्ये माजी मुख्यमंत्र्याच्या मुलाला केंद्रीय तपासयंत्रणानी ताब्यात घेतल्यानंतर महाराष्ट्रातील सुमित साळुंखे नावाच्या कंत्राटदाराला देखील अटक करण्यात आली असून या व्यक्तीमार्फत राज्यात सहा हजार कोटींचा रूग्णवाहिका घोटाळा झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शिवसेनेचे पहिले मुख्यमंत्री मनोहर जोशींच्या व्यास प्रकरणात त्यांचा राजीनामा घेणारे पुण्याचे सामजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनी या प्रकरणासह मागील सरकारच्या काळातील सहा प्रकरणांबाबत तक्रार दाखल केल्या असून त्यावर आता चौकश्या सुरू झाल्याचे सांगण्यात येत आहे. या रूग्णवाहिका खरेदी घोटाळ्यात राष्ट्रवादी आणि शिंदे सेनेच्या काही बड्या नेत्यांचा संबंध असल्याच्या चर्चांना देखील माध्यमातून उधाण आले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात येत्या काही दिवसात ब-याच राजकीय उलाथापालथी देखील होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभुमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पंचावनवा वाढदिवस साजरा करून दोन दिवस दिल्ली मुक्कामी जावून आले आहेत. त्यांच्या या दिल्लीभेटीत त्यांच्याकडून सर्वच महत्वाच्या केंद्रीय नेत्यांच्या भेटीगाठी आणि चर्चा झाल्या असून शासकीय कामकाजा व्यतिरिक्त राजकीय घडामोडींबाबत फडणवीस यांनी वरिष्ठांशी सल्लामसलत केल्याची सूत्रांची माहिती आहे. त्यात आता चर्चा केलेल्या महामंडळ वाटप हनीट्रॅंप मनीट्रॅंप आणि भ्रष्टाचार प्रकरणांच्या चौकश्यापासून मंत्रिमंडळ खांदेपालटापर्यंतच्या सा-या मुद्यांवर त्यांनी मार्गदर्शन घेतल्याचे सांगण्यात येत आहे. राज्यात येवू घातलेल्या महत्वाच्या प्रकल्पांतील गुंतवणूकीसह केंद्र सरकारकडून मिळावयाच्या वित्तीय सहाय्य आणि निधीबाबतही पाठपुरावा मुख्यमंत्र्याकडून या दौ-यात करण्यात आला असून येत्या काही दिवसांत फडणवीस पुन्हा एकदा दिल्लीत जाण्याची शक्यता विश्वसनीय सूत्रांकडून व्यक्त करण्यात आली आहे.

**'नवी विटी नवा दांडू आता खेळ नव्याने मांडू'**

मागील काही वर्षापासून सुरू असलेल्या सत्तेतील आमदार आणि मंत्र्याच्या भ्रष्टाचाराला आळा घालण्याचा प्रयत्न मुख्यमंत्र्यांकडून होताना दिसत असून आता नगरविकास विभागाच्या सर्व नस्ती मुख्यमंत्र्याच्या नजरेखालून गेल्याशिवाय त्यावर अंतिम निर्णय न घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सुशासन पर्वाच्या शंभर दिवसांनंतर राज्यातील सरकारचे नकारात्मक चित्र उभे राहिल्याने प्रचंड बहुमताच्या या सरकारची लोकाभिमुख प्रगतीशील कल्याणकारी अशी प्रतिमा निर्माण होवू शकली नाही. त्यामुळे देवाभाऊंना आता आठच महिन्यात नव्याने सत्तेचा सारीपाट मांडण्याची गरज असल्याचे लक्षात आले आहे. त्यासाठी त्यांच्याकडून आता मंत्रिमंडळाचा खांदेपालट केला जाण्याची शक्यता असून 'नवी विटी नवा दांडू आता खेळ नव्याने मांडू' असेच ते दिल्लीत जावून वरिष्ठांकडे सांगत असावेत असे मानले जात आहे. त्यांच्या या नव्या राजकीय सारीपाटाची बहुदा कल्पना आल्यामुळेच की काय त्यांच्या वाढ दिवसांच्या निमित्ताने राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा आणि राज्यातील दिग्गज नेते शरद पवार यांनी त्यांच्या स्तुतीसुमनांचा वर्षाव केला आहे, इतकेच नव्हे एरव्ही 'अरे तुरे च्या सामन्यात' रंगणा-या माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यानी देखील फडणवीस यांचे तोंडभरून कौतूक केल्याचे पहायला मिळाले आहे. थोडक्यात काय? महाराष्ट्रात राजकीय वारे बदलण्याची चिन्ह आहेत. देशात राजकीय उलथापालथ होत असतानाच राज्यात देखील नवी विटी नवा दांडू होण्याची शक्यता दृढ झाली आहे. तुर्तास इतकेच!

**किशोर आपटे**

# बाहुबलींची गर्दी

**आज विधिमंडळात ज्या प्रकारे वर्तन सुरू झाले आहे त्यामुळे या महाराष्ट्राला झालेय तरी काय, असा प्रश्न पुढे येतो आहे. महाराष्ट्रातले ४१ टक्के आमदार सध्या गंभीर गुन्हेगार असल्याचे सिद्ध झाले आहे.**



महाराष्ट्रातल्या कोणत्याही छोट्या किंवा मोठ्या शहरातला गजबजलेला चौक... आपला प्रतिनिधी निवडण्याचे दिवस.. ते कधी लोकसभेच्या धामधुमीच्या काळातले असतील किंवा विधानसभेच्या किंवा अगदी गल्ली-बोळातल्या निवडणुकीचे; पण वातावरणात खच्चून भरले आहे ते राजकारण. गर्दी प्रचंड, उत्साह अमाप. सगळ्यांच्या नजरा नवा नेता शोधायला आतूर झालेल्या. पूर्वीही अशीच गर्दी उसळे. वातावरणात अशीच अपार उत्सुकता असे. कर्णे, भोंगे, वाद्ये वाजत. गावातली किंवा शहरातली सुविद्य सज्जन आणि मुख्य म्हणजे शालीन व्यक्ती खासदारकी, आमदारकी, गावकीतल्या पुढारकीसाठी अर्ज भरत असे. मतदाराचे वेडे मन कितीका निवडणुका पाहिल्या असेनात ताजेतवाने, जागे होई आणि आपले नशीब बदलवणारा कुणीतरी आता निवडून येणार, याची उत्सुकता चेहऱ्यावर वाचता येई. हा लोकप्रतिनिधी आदर्शवादाचे उदाहरण असे. पांढरा झब्बा, पायजमा वेष असे. गांधी टोपी इतिहासजमा झाली, तरी ती अशा हवेत अदृश्य असेच असे. शहरागावात, वाडीवस्तीत भावना अशीच असे.

१९८० च्या सुमारास बरेच काही बदलले. चौकातली गर्दी तशीच राहिली किंबहुना वाढली. लोकसंख्या वाढली होती. काहींच्या खिशात पैसा खुळखुळू लागला होता. स्वप्ने मोठी झाली होती. स्वातंत्र्यपूर्व काळातला आदर्शवाद काहीसा माघारला होता अन् नवे काय करायचे, याबद्दल फार काही कळतही नव्हते. चौकात गर्दी तशीच जमत होती. अपेक्षाही वाढल्या होत्या. आर्थिक उदारीकरणाचे वारे वाहू लागले होते. त्यामुळे भावना बदलल्या होत्या. चौकाचौकांत राजकारणासाठी जमा होणाऱ्या गर्दीची भाषा बदलली अन् वातावरणही बदलले. उमेदवार पांढऱ्या वेषाऐवजी रंगीबेरंगी कपडे घालू लागले होते. सायकली, दुचाकींची जागा आता बड्या चारचाकी वाहनांनी घेतली होती अन् घोषणांच्या आवाजात उमेदवार तलवारी बाहेर काढू लागले होते. संस्कृती बदलली होती. शस्त्रे, तलवारी तळपू लागल्या होत्या. राजकारणाचा धर्म बदलला होता. चौकातल्या गर्दीत कान बेजार झाले होते. झांजा, ढोलांबरोबरच बेंजोही जोरात वाजणे जनतेने स्वीकारले होते. संस्कृती बदलली होती.

'लोकसेवा परमो धर्म' असे म्हणणारे साधेसुधे लोकप्रतिनिधी ही महाराष्ट्राची ओळख पुसली जात होती. तुमचा 'दाऊद', तर आमचा 'गवळी' असे म्हणणे सुरू झाले होते. केवळ मुंबईच नव्हे, तर ठाणे, पुणे, नाशिक हे मुंबईभोवतालचे टापू केवळ महानगरे राहिली नव्हती, तर रिअल इस्टेट हब झाली होती. या सर्वच भागात दबंग प्रवृत्तीच्या लोकांनी आपापले बस्तान बसवायला प्रारंभ केला होता. पूर्वी खासदार, आमदार आपल्या समवेत काही व्यापारी, धनिकवणिक ठेवत असत. ही मंडळी जवळ बाळगणे अपरिहार्यता समजली जाई एकेकाळी. आता सारेच बदलले आहे. सिनेमे, प्रसारमाध्यमे लाऊड झाली होती अन् महाराष्ट्रातल्या राजकीय जीवनाचा पोत बदलला होता. बिहार, उत्तर प्रदेशात बाहुबली नेते राजरोसपणे संसदेत निवडून येऊ लागले होते. महाराष्ट्रात याबद्दल पूर्वी केवळ आश्चर्य व्यक्त केले जात असे. आता मात्र असे धनिकवणिक खासदार, आमदार होऊ लागले होते. पुणे परिसरातील खडकवासल्यात किलोभर सोने घालणारा एक राजकीय कार्यकर्ता उमेदवारी मागायला आला तेव्हा राजकीय पक्षातल्या बड्या नेत्यांना धक्का बसला; पण त्यांना संधी मिळाली अन् ते निवडूनही आले होते. आज विधिमंडळात ज्या प्रकारे वर्तन सुरू झाले आहे त्यामुळे या महाराष्ट्राला झालेय तरी काय, असा प्रश्न पुढे येतो आहे.

महाराष्ट्रातले ४१ टक्के आमदार सध्या गंभीर गुन्हेगार असल्याचे सिद्ध झाले आहे. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) ही संस्था प्रत्येक निवडणुकीनंतर अहवाल सादर करते तो लोकप्रतिनिधींवर दाखल झालेल्या गुन्ह्यांचा.

हे अहवाल कमालीचे धक्कादायक आहेत. मावळलेल्या विधानसभेत १६४ जणांवर गुन्हे नोंदवले गेले होते. त्यातले ३९ टक्के गुन्हे गंभीर स्वरूपाचे होते. यावेळी सदनात आमदार असलेल्या तिघांवर खुनाचा, दहा जणांवर खुनाचा प्रयत्न केल्याचा, तर तब्बल २२ जणांवर महिलांवर अत्याचार केल्याचा गुन्हा नोंदवला गेला आहे.विधिमंडळ परिसरात फिरायला येणाऱ्यांची संख्यादेखील गेल्या काही दिवसांत वाढली. या मंडळींना आपली छायाचित्रे काढायची असतात आणि आपापल्या गावी जाऊन आम्ही कुठपर्यंत पोहोचू शकतो, अशी वट दाखवायची असते. खरे तर, महाराष्ट्राची सुबत्ता वाढतेय. जीडीपीत मोठ्या प्रमाणात वाढ दिसते आहे. शिक्षणाचे प्रमाणही वाढत्या अंगाला पुढे सरकतंय; मात्र तरीही हे गुंडकुंड करतात का, तर राजकारण हे अप्राप्य आहे. ते आपल्यासारख्या सगळ्या माणसांचं नाही, असा सर्वसाधारण समज जनतेने करून घेतला आहे. महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सुवर्णपदक विजेते विद्यार्थी होते. त्यांच्या काळामध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात शुद्ध मनाचे तरुण मोठ्या प्रमाणात येतील, असेही वाटू लागले होते; मात्र प्रचंड बहुमत मिळालेल्या या सरकारच्या दुसऱ्या-तिसऱ्या अधिवेशनातच गुंडागर्दीचे प्रदर्शन दिसले, ते महाराष्ट्राचे मन खाली घालणारे तर होतेच शिवाय जनमानसात नक्की काय चालू आहे, हा प्रश्न निर्माण करणारे होते. दोन आमदारांच्या पाठीराख्यांनी परस्परांशी केलेली मारामारी धक्कादायक होती. त्यापूर्वीही आमदारांनी पोलिसांना धमकी देण्याचा प्रकार प्रकार झाला होता. गोपीनाथ मुंडे आणि पद्मसिंह पाटील यांचं भांडण हे अत्यंत खालच्या स्तरावर पोहोचलेलं होतं. ते शब्द कामकाजातून काढून टाकले गेले होते. विधिमंडळाच्या पायऱ्यांवर राज्यपालांच्या भाषणाला जाताना त्यांचा मार्ग अडवणाऱ्यांवर पूर्वीच्या सत्ताधारी पक्षाने ज्या प्रकारे आक्रमण केले होते, तेदेखील शोभा देणारे नव्हते; मात्र राजकीय स्थलनाचा हा मुद्दा सध्या सध्या रसातळाकडे जातो आहे, असे चित्र निर्माण झाले आहे.

महाराष्ट्राचे कृषिमंत्री भरसभागृहात रमीचा खेळ खेळतात किंवा गृह राज्यमंत्र्याच्या आईच्या नावाने एक बार चालतो ही सगळी उदाहरणे धक्कादायक तर आहेतच शिवाय आपण कुठे, अशी शंका निर्माण करणारी आहे, या सर्व परिस्थितीवर उत्तर काय? सार्वजनिक जीवनातील गुंडपुंड बाहेर जाणार की नाही, याचे उत्तर जनतेच्या हातात आहे. पुढच्या पाच वर्षांनंतर संबंध कधीतरी येईल तेव्हा बघू काय ते, असेही एक धोरण असते. सुशिक्षितांना वेळ नसतो. राजकारणाबद्दल गोडी नसते आणि कामाच्या, रोजगाराच्या शोधात असलेल्या हजारोंना कोणीतरी दबंग नेता आपल्याला न्याय देऊ शकेल, अशी वेडी आशा वाटत असते. ही वेडी आशा बाळगणारी मंडळीच आजकाल चौकाचौकात गर्दी करू लागली आहेत. येणाऱ्या छोट्या निवडणुकांमध्ये ही गर्दी पुन्हा वाढेल. मते विकत घेण्याचे प्रकार होतात, अशाही तक्रारी सुजाण नागरिक करू लागले आहेत. या परिस्थितीत महाराष्ट्राचे सार्वजनिक जीवन कसे साफ होणार, हा मोठा प्रश्न आहे. ते शिवधनुष्य पेलावे लागेल.

**मृणालिनी नानिवडेकर**

# रेमंड डेनिम मिल प्रकरण: कामगारांचे समता मैदानावर शक्तिप्रदर्शन

## पालकमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष, तोडगा न निघाल्यास बच्चू कडू यांची २९ तारखेला सभा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - यवतमाळ औद्योगिक वसाहतीतील रेमंड डेनिम मिलमध्ये कार्यरत असलेल्या सुमारे १७०० पेक्षा अधिक कामगारांच्या वेतनवाढ, निलंबन रद्द आणि संपकालीन पगाराच्या प्रमुख मागण्यांवरून निर्माण झालेला तिढा अद्याप सुटलेला नाही. या पार्श्वभूमीवर आज समता मैदानावर मोठ्या संख्येने कामगारांनी एकत्र येत शक्तिप्रदर्शन केलं. रेमंड व्यवस्थापन व कामगार संघटनांमध्ये सुरू असलेल्या वादात तोडगा निघावा यासाठी पालकमंत्री संजय राठोड व जिल्हाधिकारी विकास मीना व व्यवस्थापन यांच्यात दुसरी बैठक सुरू आहे.

या बैठकीच्या पार्श्वभूमीवरच संपूर्ण रेमंड कामगार वर्ग समता मैदानावर जमले असून, वातावरण शांत असले तरी तणावपूर्ण आहे. कामगार संघटनांनी स्पष्ट भूमिका घेतली असून मागण्या मान्य होईपर्यंत कामावर न परतण्याचा इशारा देण्यात आला आहे. कामगार संघटनांनी तीन प्रमुख मागण्यांसाठी लढा देण्यात येत आहे. १७ महिन्यांपासून प्रलंबित वेतन कराराची अंमलबजावणी, निलंबित सहा कामगारांची पुनर्नियुक्ती, संपकालीन दिवसांचा पगार, कामगार संघटनांनी आरोप केला आहे की, रेमंड व्यवस्थापन या मागण्यांकडे दुर्लक्ष करीत असून संवादा ऐवजी प्रकरण न्यायालयात नेण्याचा प्रयत्न केला जात आहे. या संपा संदर्भात माजी मंत्री बच्चू कडू यांना सविस्तर माहिती देण्यात आली असून, ते दि. २९ जुलै रोजी यवतमाळला भेट देणार आहेत. यावेळी कामगारांशी संवाद साधण्यासाठी सभा आयोजित होणार असल्याची माहिती मिळाली आहे. मात्र, सभेचे ठिकाण अद्याप निश्चित करण्यात आलेले नाही. त्यामुळे पुढील दोन दिवसांत राजकीय हालचालींनाही वेग येण्याची शक्यता आहे. समता मैदानातील दृश्य हे या संपाच्या गांभीर्याचे प्रतीक ठरले. स्टेडियमच्या दर्शक गृहावर आणि मैदानावर शेकडो कामगार शांतपणे उपस्थित होते. विविध संघटनांचे पदाधिकारीही मैदानात कार्यकर्त्यांशी संवाद साधत होते. "मागण्या मान्य



झाल्या तर कामावर परत जाऊ", अशी भूमिका त्यांनी जनमाध्यमशी बोलताना स्पष्ट केली. रेमंड मिल प्रकरणी प्रशासनाने तोडगा काढण्यासाठी पुढाकार घेतला असला तरी कंपनीच्या भूमिकेमुळे तोडगा लांबणीवर गेला आहे. कामगारांनी एकवटून ताकद दाखवली असून, पुढील निर्णयावर संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# मोकाट जनावरांचा हैदोस एकाचा बळी!

## बाबाराव काळपांडे यांचा अपघाती मृत्यू; प्रशासनाचे दुर्लक्ष ठरणार किती जीवघेणे?



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - शहरातील मोकाट जनावरांचा प्रश्न आता जीवघेणा ठरत असून यवतमाळ नगरपरिषदेच्या ढिसाळ कारभारामुळे आणखी एका नागरिकाचा बळी गेला आहे. दिनांक २४ जुलै २०२५ रोजी सायंकाळी कॉटन मार्केट चौक येथे दुचाकीस्वार बाबाराव काळपांडे यांचा मोकाट जनावराशी जोरदार धडक होऊन गंभीर अपघात झाला. डोक्याला जबर मार लागल्यामुळे त्यांना तात्काळ नागपूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान दिनांक २५ जुलै रोजी त्यांचे दुर्दैवी निधन झाले.

यवतमाळ शहरात मोकाट जनावरांचा हैदोस दिवसेंदिवस वाढतच आहे. मुख्य रस्त्यांवर ठिय्या मारून बसलेल्या या जनावरांमुळे नागरिकांचे जीवन धोक्यात आले आहे. दुचाकी आणि चारचाकी वाहनचालकांना सतत सर्कस करत मार्ग काढावा लागत आहे. वाहतुकीत अडथळा निर्माण होत असून अनेक वेळा अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. नगरपरिषद प्रशासनाने या गंभीर समस्येकडे वेळेवर लक्ष दिले असते, तर बाबाराव काळपांडे यांचा जीव वाचला असता. मात्र यावर कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे शहरात नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

त्यामुळे पुन्हा एकदा प्रश्न उभा राहतो शहरात मोकाट जनावरांचा बंदोबस्त नेमका कोण करणार? आणि तो किती जीवाच्या बदल्यात? शहर प्रशासनाला याचे उत्तर द्यावेच लागेल. असा सूर सामान्य नागरिकांतून निघत आहे.

# मद्यप्राशन डॉक्टरने जिवंत रुग्णाला केले मृत घोषीत

**जनमाध्यम प्रतिनिधी**

दारव्हा : दारव्हा येथील उपजिल्हा रुग्णालयात मद्यप्राशन करून ड्युटी करीत असलेल्या एका डॉक्टरने जिवंत रुग्णाला मृत घोषित केले. एवढ्यावरच न थांबता डेथ मेमो बनवून शवविच्छेदन करण्याची तयारी केली. रुग्णाला शवविच्छेदन गृहाकडे नेत असताना त्याने हालचाल केली. ही बाब नातेवाईकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी रुग्णाला पुन्हा तपासायला लावले असता, तो जिवंत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर रुग्णाला उपचारासाठी यवतमाळ शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. हा प्रकार शुक्रवारी २५ जुलै रोजी रात्री उशीरा घडला. गोरेगाव येथील विषबाधा झालेल्या एका रुग्णाला दारव्हा उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले, त्यावेळी सेवेत असलेल्या डॉक्टरने कोणत्याही प्रकारच्या आपत्कालीन तपासणी न करता रुग्णाचा मृत्यू झाल्याचे सांगितले. डेथ मेमो तयार करून शवविच्छेदन करण्याची तयारी केली. रुग्णाला शवविच्छेदन गृहाकडे नेण्याच्या हालचाली सुरू केल्या. दरम्यान रुग्णाने हलचाल केली, तसेच डॉक्टर नशेत असल्याचा संशय नातेवाईकांना आला. त्यांनी डॉक्टरला पुन्हा तपासणी करण्यास सांगितले. तेव्हा रुग्ण जीवंत असल्याचे आढळले. त्यानंतर घाबरलेल्या डॉक्टरने डेथमेमो फाडून तातडीने रेफर पेपर तयार केले. नातेवाईकांनी संताप व्यक्त करत प्रसंगावधान राखून रुग्णालया यवतमाळ येथील शासीकय रुग्णालयात दाखल केले. तेथे रुग्णाची प्रकृती सुधारत असल्याचे सांगण्यात आले. हा प्रकार काहींनी उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राजेश मनवर यांना सांगितला. त्यानंतर अधीक्षक रुग्णालयात हजर पोहोचले, त्यांनी संबंधित डॉक्टरला याबाबत मेमो दिला आहे. या प्रकरणात मद्यपी डॉक्टरवर पुढे काय कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी बांधण्यात आलेल्या "योगा भवन"चे लोकार्पण



**जनमाध्यम प्रतिनिधी**

नेर - स्थानिक महादेव नगर परिसरातील खुल्या जागेवर ज्येष्ठ नागरिकांसाठी बांधण्यात आलेल्या "योगा भवन"चे लोकार्पण पालकमंत्री यवतमाळ जिल्हा यांनी आज केले. उद्घाटन प्रसंगी बोलताना पालकमंत्री म्हणालेत ज्येष्ठ नागरिकांसाठी ही आधुनिक सुविधा म्हणजे केवळ आरोग्यपूर्ण जीवन शैलीचं नव्हे तर आपुलकीच्या सहवासाचे ही भक्कम व्यासपीठ ठरेल. यावेळी अनेक मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केलीत.

यावेळी प्रामुख्याने मंचावर ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष प्रा.मनोहर देशमुख, उपाध्यक्ष डॉ. मोहन शर्मा, कानतोडे, सदाशिव नरोटे, लक्ष्मण चिरडे, शाम पिंपळकर, नामदेव महल्ले, भाऊराव ढवळे, मनोज नाल्हे, वैशाली मासाळ, रितेश चिरडे, सुभाषचंद्र भोयर, रश्मा पेटकर, अर्चना इसाळकर, दीपक आडे, मुख्याधिकारी निलेश जाधव, पोलिस निरीक्षक अनिल बेहरानी आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता अनेक कार्यकर्त्यांनी व जेष्ठ नागरिक मंडळाच्या सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# शाळेत विद्यार्थी पटसंख्या असूनही ऑनलाईन नसल्याने दोन शिक्षकांना अतिरिक्त ठरविण्यात आले?

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : पंचायत समिती यवतमाळ मधील आकपुरी जिल्हा परिषद शाळेत सन 2024-25 मध्ये युडायस प्लस मध्ये इयत्ता 1 चे विध्यार्थी ऑनलाईन न केल्यामुळे जिल्हा परिषद शाळा आकपुरी येथील शिक्षण विभागाने दोन शिक्षक अतिरिक्त ठरविले आहे.त्यामुळे शाळेत विध्यार्थी संख्या असूनही केवळ ऑनलाईन नसल्याने शाळेत कार्यरत असलेले दोन शिक्षक अतिरिक्त ठरवून त्यांची बदली केल्याने उपस्थित विध्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे त्यामुळे सन 2024-25 मध्ये इयत्ता 1 चे विध्यार्थी जरी युडायस मध्ये ऑनलाईन केले नसेल तरीपण ते विध्यार्थी सरळ पोर्टलवर ऑनलाईन झालेले आहे आणि ते विध्यार्थी ऑफलाईन शाळेत दाखल पण आहे त्यामुळे पोर्टल सुरु झाल्यास ते विध्यार्थी ऑनलाईन करता येईल पण केवळ ऑनलाईन झाले नसल्याने शाळेतील एकूण तीन शिक्षकांपैकी दोन

### आकपुरी जिल्हा परिषद शाळेतील प्रकार, अतिरिक्त शिक्षकांची बदली थांबवावी : पालकांची मागणी

शिक्षक अतिरिक्त ठरवून त्यांची बदली करणे म्हणजे शाळेत दाखल झालेल्या मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याने विध्यार्थी पालकात भीतीचे वातावरण आहे.त्यामुळे वरील गांभीर्य लक्षात घेऊन अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या शिक्षकांची बदली करण्यात येऊ नये. अशा प्रकारचे निवेदन जिल्हा परिषद शाळाआकपुरी आणि विध्यार्थी पालकांनी मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा परिषद यवतमाळ यांना दिले आहे आणि त्याद्वारे अतिरिक्त शिक्षक हे बदलीस पात्र असल्याने बदलीची प्रक्रिया पूर्ण झाल्यास विध्यार्थी पटसंख्येप्रमाणे शिक्षक देण्यात यावे अशी निवेदणाद्वारे मागणी करून विध्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळावे अशा स्वरूपाची विनंती करण्यात आली आहे.

## वेचक

### महावितरणची थकबाकी पोहचली १५६ कोटीवर

यवतमाळ : महावितरण अमरावती परिमंडळात वीज बिलाची थकबाकी कमी न होता दिवसेंदिवस त्यात वाढ होत आहे. मार्च २०२५ मध्ये असलेली ७५ कोटीची थकबाकीत वाढ होवून जुलै २०२५ मध्ये १५६ कोटी झाली आहे. त्यामुळे वीजबिलाच्या वसुलीसाठी अधीक्षक अभियंता ते जनमित्र सर्वांना ग्राहकनिहाय थकीत वीजबिल वसूलीचे उध्दीष्ठ देण्यात आले असल्याची माहिती मुख्य अभियंता अमरावती परिमंडळ यांनी दिली आहे. महावितरणचे अस्तित्व हे वीजबिलांच्या महसूलावरच अवलंबून आहे. परंतू मार्च २०२५ नंतर प्रत्येक महिन्यात अपेक्षीत महसूलाच्या उद्दिष्टाप्रमाणे बिलांची वसूली झालेली नाही,त्यामुळे थकबाकी कमी न होता त्यात वाढ झाली आहे. ही गंभीर बाब असून महावितरणच्या आर्थिक स्थैर्यासाठी वीजबिल वसूलीशिवाय अन्य पर्याय नाही. त्यामुळे थकबाकी आणि चालू वीजबिलाच्या वसुलीवर परिणाम होत असेल तर वीज पुरवठा खंडित करण्याशिवाय पर्याय नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. परिमंडळात विविध वर्गवारीतीस ३ लाख ८१ हजार ४०६ ग्राहककांकडे असेलल्या १५६ कोटी रूपयाच्या थकीत रकमेत अमरावती जिल्ह्यातील १ लाख ९०९३६ ग्राहकाचा समावेश असून त्यांच्याकडे ६७ कोटी ३९ लाख रूपयाचे आणि यवतमाळ जिल्ह्यातील १ लाख ९०४७० ग्राहकांकडे ८८ कोटी ८१ लाख रूपयाची वीज देयके थकली आहे. तसेच परिमंडळात १ लाख रूपयापेक्षा जास्त थकबाकी असलेल्या ग्राहकाची संख्या ११५७ असून त्यांच्याकडे ३२ कोटी ६७ लाख रूपये थकीत आहे.यामध्ये अमरावती जिल्ह्यातील ४७२ आणि यवतमाळ जिल्ह्यातील ६५५ ग्राहकाचा समावेश असून त्यांच्याकडे अनुक्रमे १४.१७ कोटी आणि १८.५५ कोटी थकीत आहे. त्यामुळे अधीक्षक अभियंता ते जनमित्र यांना वसूलीचे उध्दिष्ठ देण्यात आले असून १ लाख रूपयापेक्षा जास्त थकबाकी असणारे ग्राहकाची तपासणी अधीक्षक अभियंता,५० हजार ते १ लाख रूपयापर्यंत थकबाकी असलेल्या ग्राहकाची वसूलीचे उध्दिष्ट कार्यकारी अभियंता यांना देण्यात आले असून २५ ते ५० हजार रूपयाची थकबाकी असणारे ग्राहक उपकार्यकारी अभियंता,५ हजार ते २५ हजार थकबाकीवाले ग्राहक शाखा अभियंता आणि ५ हजारापरर्यंत थकबाकी असलेल्या ग्राहकाच्या थकबाकीची वसूलीचे उध्दिष्ट जनमित्रांना देण्यात आले आहे.

### ट्रॅक्टर पलटल्याने युवक ठार

बाभूळगाव : ट्रॅक्टरच्या हायड्रोलिक ट्रॉलीमधून मुरूम खाली करताना ट्रॉली पलटी झाल्याने एक युवक जागीच ठार झाला. ही घटना बाभूळगाव तालुक्यातील खडक सावंगा येथे घडली. हिकमचंद उर्फ निषू रामचंद्र कामडी (२३) रा. खडक सावंगा बाभूळगाव असे मृत तरुणाचे नाव आहे. तो आपल्या ट्रॅक्टर क्रमांक एमएच २९ सीजी ३६०३ ची ट्रॉली क्रमांक एमएच २९ सीजे २००६ ने गजानन सिताराम भानारकर यांच्यासोबत मुरूम आणण्यासाठी गेला होता. यावेळी ट्रॅक्टर पावसाच्या पाण्यात नरम झालेल्या जागेत उभा केला. तसेच टिकमचंदने हा ट्रॅक्टरच्या स्टेरिंगवर बसून हायड्रोलिक ट्रॉलीमधून मुरूम खाली करीत होता. दरम्यान, अचानक ट्रॉली उलटल्याने टिकमचंद हा मुरमाखाली दबल्याने त्याचा मृत्यू झाला. घटनेनंतर मृतकाचे वडील रामचंद्र यांनी बाभूळगाव पोलिसात तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### सिंदखेड शिवारात वाघाचा मुक्तसंचार, खुटाफळीतही बिबट्याचा वावर

नेर : तालुक्यातील सिंदखेड आणि खुटाफळी शिवारात मागील आठवडाभरापासून वाघासह बिबट्याचा मुक्तसंचार आहे. यामुळे शेतकरी व नागरिकामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या दोन दिवसात वाघामाय शिवारातील शेतकरी प्रकाश शिंदे यांच्या चार मेंढ्या बिबट्याने फस्त केल्या आहेत. यामुळे परिसरात दहशतीचे वातावरण आहे. शेतात पेरणी केल्यानंतर शेतकऱ्यांना शेतातील नियमित कामासाठी जावे लागते. मात्र, सुर्य मावळल्यानंतर वाघ आणि बिबट्याचे दर्शन नागरिकांना होत आहे. सिंदखेड गावालगत असलेल्या पुलावर गेल्या दोन तीन दिवसांपासुन अनेक नागरिकांना सायंकाळी वाघ दिसल्याने नागरिक भयभीत झाले आहे. यामुळे सायंकाळी सिंदखेड गावात येण्यासाठी कोलुरा, पिंपळगाव मार्गे रस्ता सोडून माणिकवाडा, ब्राम्हणवाडा मार्गे नागरिकांना यावे लागत आहे. तर खुटाफळी वाघामाय शिवारात बिबट्याचे दर्शन होत असल्याने शेतकरी व नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतीचे कामे सुरू असल्याने आता शेतात जायचे की, नाही असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. प्रशासनाने वाघाचा त्वरित बंदोबस्त करावा, अशी मागणी बाजार समितीचे संचालक तथा सरपंच प्रमोद राठोड यांनी केली आहे.

# स्वस्तिक प्लाझा इमारतीत शॉर्टसर्किटने आग टेबल, खुर्च्या व इलेक्ट्रॉनिक वस्तू जळून खाक

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - शहरातील मध्यवर्ती स्वस्तिक चौकातील बहुमजली स्वस्तिक प्लाझा इमारतीत रविवारी सकाळच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. या आगीत वरच्या मजल्यावर असलेल्या एका गाळ्यातील टेबल, खुर्च्या आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू जळून खाक झाल्या. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

सकाळी साधारणपणे साडेसहा वाजताच्या सुमारास इमारतीतून धूर निघताना नागरिकांनी पाहिले. तत्काळ अग्निशमन दलाला सूचना देण्यात आली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे नितेश जगताप, रवी चौधरी, राजू इंगळे, धनराज मारबते व हेमंत डोंगरे यांनी त्वरित घटनास्थळी धाव घेतली आणि आग नियंत्रणात आणली. स्वस्तिक प्लाझा ही बहुमजली व्यापारी इमारत असून, तिचे मालक गौतम पटेल आहेत. इमारतीतील सर्वात वरच्या मजल्यावर तोफिक खान नावाच्या शिक्षकाने ट्युशन क्लासेससाठी दोन गाळे भाड्याने घेतले होते. या गाळ्यात फर्निचर तयार करण्याचे काम सुरु होते. शनिवारी दिवसभर काम झाल्यानंतर रात्री कामगार निघून गेले होते. दरम्यान, सकाळी धूर दिसल्यावर जागरूक नागरिकांनी दिलेल्या माहितीवरून अग्निशमन दलाच्या पथकाने त्वरित तीन फायर सिलेंडरमधून विशेष पावडरचा वापर करून आग विझवली. इलेक्ट्रॉनिक मशिनरीमुळे लागलेली ही आग केवळ पावडरनेच विझविणे आवश्यक होते, अशी माहिती अग्निशमन विभागाने दिली. या आगीत गाळ्यातील टेबल, खुर्च्या, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि काही साहित्य जळून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. आग ही शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी संजय सुर्यतळ तर उपाध्यक्षपदी शरद भगत

**जनमाध्यम प्रतिनिधी**






पुसद - येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी संजय माधवराव सुर्यतळ तर उपाध्यक्षपदी शरद यशवंतराव भगत यांची निवड करण्यात आली. सदर पतसंस्थेची संचालक मंडळ यांचा कार्यकाळ २०२४ अखेर संपला असता नवीन संचालक मंडळ निवड करण्यासाठी अर्ज भरून निवडणूक घेण्यात आली.

यावेळी संस्थेचे नवनिर्वाचित संचालक शिवशंकर घरडे, विजय पाटील, बाबासाहेब वाघमारे, रंजीत वाघमारे, पांडुरंग उतळे, सौ.अश्विनी संजय सुर्यतळ, सौ.सुवर्णरेखा नथ्थुजी वाहुळे हे संचालक अविरोध निवडून आल्याचे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी घोषित केले. अध्यक्ष, उपाध्यक्ष निवड प्रक्रीया सहाय्यक निबंधक मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक सहकार अधिकारी अमोल काळमोरे यांनी यशस्वीरित्या पार पाडली. यावेळी अध्यक्ष म्हणुन संजय सुर्यतळ अविरोध निवडुन आले तर उपाध्यक्ष पदासाठी मतदान घेण्यात आले यामध्ये बाबासाहेब वाघमारे यांना ३ मते मिळाली तर शरद भगत यांना ४ मते मिळाल्यामुळे शरद भगत यांना उपाध्यक्ष म्हणुन घोषित करण्यात आले. या निवड प्रक्रियेसाठी नटवर उंटवाल, माजी सभापती नरेंद्र खंदारे, डॉ. बाबासाहेब खंदारे, विजय पाटील, सौ. शिला विजय पाटील, नथ्थुजी वाहुळे यांनी अथक परिश्रम घेतले. नवनिर्वाचित संचालक मंडळ निवडल्यामुळे पुसद शहरातील सर्व समाज बांधवात एक आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# आ. शरद सोनवणे यांच्या अपशब्दामुळे आदिवासी समाजात संतापाची लाट

## मंत्री अशोक उईके यांच्या अपमानप्रकरणी अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**






यवतमाळ - जुन्नर तालुक्यातील पंचायत समितीच्या सभागृहात २५ जुलै रोजी झालेल्या शासकीय बैठकीत घडलेला एक गंभीर प्रकार सध्या मोठ्या वादाचा विषय ठरत आहे. आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर आयोजित बैठकीत जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांनी आदिवासी विकास विभागाचे मंत्री प्रा. डॉ. अशोकराव उईके यांच्याविषयी "मूर्ख मंत्री, चोर साला" असे अत्यंत अवमानकारक आणि अपशब्द वापरल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकारामुळे संपूर्ण आदिवासी समाजात तीव्र संतापाची लाट उसळली असून, आदिवासी परधान जमात संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे यवतमाळचे जिल्हा पोलीस अधिक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात आमदार सोनवणे यांच्यावर अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ अंतर्गत तात्काळ गुन्हा दाखल करण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे.संघटनेचे अध्यक्ष राजू मडावी व सरचिटणीस प्रा. डॉ. देवानंद सावरकर यांनी दिलेल्या निवेदनात स्पष्ट म्हटले आहे की, मंत्री डॉ. अशोक उईके हे फक्त एक मंत्री नसून संपूर्ण आदिवासी समाजाचे प्रतीक आहेत. त्यांच्या सार्वजनिक अपमानामुळे संपूर्ण समाजाचा अपमान झाला आहे." संघटनेने शासनाला इशारा दिला आहे की, जर या प्रकरणी तात्काळ आणि कठोर कारवाई झाली नाही, तर संपूर्ण आदिवासी समाज रस्त्यावर उतरेल आणि तीव्र आंदोलन छेडले जाईल. अशा आंदोलनातून उद्भवणाऱ्या कोणत्याही अनुचित किंवा अप्रिय घटनेची सर्वस्वी जबाबदारी शासनावर राहील, असा ठाम इशारा देखील देण्यात आला आहे.या निवेदनाची प्रत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गृहमंत्री, तसेच जिल्हाधिकारी यवतमाळ यांना देखील सादर करण्यात आली आहे. दरम्यान, राज्यातील सत्ताधारी पक्षाच्या आमदारांकडूनच मित्र पक्षांतील मंत्र्यांविरोधात अवमानकारक भाषा वापरण्याची मालिका सुरु असल्याचे दिसून येत आहे.

मुख्यमंत्री फडणवीस सध्या दिल्लीत असून, काही वादग्रस्त आमदारांच्या वक्तव्यांवर शिस्तीची कारवाई करण्यासंदर्भात त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्याची माहिती आहे. जुन्नरचे आमदार सोनवणे हे जरी अपक्ष असले तरी ते शिंदे गटाचे समर्थक असल्याची चर्चा आहे. त्यामुळे त्यांनी भाजपमधील आदिवासी मंत्री डॉ. उईके यांच्याविषयी अश्लाघ्य भाषा वापरल्याने राजकीय व सामाजिक वर्तुळात खळबळ उडाली आहे.

या पार्श्वभूमीवर आदिवासी समाजासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यवतमाळ येथील पोलिस अधीक्षक कार्यालयात एकत्र आले होते. त्यांनी घडलेल्या प्रकाराचा निषेध करत सोनवणे यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची जोरदार मागणी केली.

# गोर सिकवाडी महागाव तालुक्याच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सत्कार सोहळा!

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - गोर सीकवाडी या सामाजिक चळवळीच्या वतीने "गोर गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार समारंभ" गौरव सोहळा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे आयोजन देवदत्त कॉम्प्लेक्स काळी (दौ.) येथे करण्यात आले होते. त्यावेळी प्रमुख वक्ता म्हणून गोर सिकवाडीचे अमरावती विभागीय संयोजक प्रा.मोतीराज जाधव व गोर सेना जिल्हा अध्यक्ष किशोर पालतिया यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात एकूण ६० गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा तसेच या वर्षी नव्याने नौकरीला लागलेल्या १८ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांमध्ये मा.सुदेश जाधव (मंडळ अधिकारी वर्धा) लताबाई जाधव (नागपुर वि.अध्यक्ष, धरमळी याडी दळ) फुलसिंग राठोड (माजी सरपंच काळी दौ) विशाल णुळसावत (उपकृषी अधिकारी महागांव) डॉ.अरविंद पवार (गोर सेना मा. जिल्हा सचिव यवत) डॉ.जुगल राठोड (दुर्गा हॉस्पीटल काळी दौ) डॉ.गणेश पवार (प्राथमिक आरोग्य केंद्र काळी दौ) डॉ. ब्रम्हानंद पवार (श्री गुरूदेव हॉस्पीटल काळी दौ) निरंजन राठोड सर (दत्तसेवा अकॅडमी, पुसद) सुरेश राठोड प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी) गोकुळ आडे सर, श्रीचंद राठोड (श्री अभ्यासिका संचालक काळी दौ.) प्रा. विष्णु राठोड सर (सेवानृत्त मुख्यधापक तथा गोर सिकवाडी ता.संयोजक) यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गोर सेना काळी (दौ.) येथील पदाधिकाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले. महागांव तालुक्यातील पालक, विद्यार्थी, महिला व युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्र संचलन गोर सेना ता.अध्यक्ष आजेश जाधव यांनी केले. तर विद्यार्थ्यांचा गौरव सन्मान करणे हेच आमचे खरे कार्य आहे असे यावेळी डॉ.गोपाल डि.राठोड यांनी सांगितले. शेवटी आभार प्रदर्शन पवन राठोड यांनी केले.

# महावितरणची थकबाकी पोहचली १ ५ ६ कोटीवर

## अधिक्षक अभियंता ते जनमित्र सर्वांना थकीत बिल वसूलीचे उद्दिष्ट, वीजबिल न भरल्यास वीज पुरवठा होणार खंडित

**अमरावती/ का.प्र.**

महावितरण अमरावती परिमंडळात वीज बिलाची थकबाकी कमी न होता दिवसेंदिवस त्यात वाढ होत आहे. मार्च २०२५ मध्ये असलेली ७५ कोटीची थकबाकीत वाढ होवून जुलै २०२५ मध्ये १५६ कोटी झाली आहे. त्यामुळे वीजबिलाच्या वसुलीसाठी अधीक्षक अभियंता ते जनमित्र सर्वांना ग्राहकनिहाय थकीत वीजबिल वसूलीचे उध्दीष्ठ देण्यात आले असल्याची माहिती मुख्य अभियंता अमरावती परिमंडळ यांनी दिली आहे.

महावितरणचे अस्तित्व हे वीजबिलांच्या महसूलावरच अवलंबून आहे. परंतू मार्च २०२५ नंतर प्रत्येक महिन्यात अपेक्षीत महसूलाच्या उद्दिष्टाप्रमाणे बिलांची वसूली झालेली नाही, त्यामुळे थकबाकी कमी न होता त्यात वाढ झाली आहे. ही गंभीर बाब असून महावितरणच्या आर्थिक स्थैर्यासाठी वीजबिल वसूलीशिवाय अन्य पर्याय नाही. त्यामुळे थकबाकी आणि चालू वीजबिलाच्या वसुलीवर परिणाम होत असेल तर वीज पुरवठा खंडित करण्याशिवाय पर्याय नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.



परिमंडळात विविध वर्गवारीतील ३ लाख ८१ हजार ४०६ ग्राहककांकडे असेलल्या १५६ कोटी रूपयाच्या थकीत रकमेत अमरावती जिल्ह्यातील १ लाख ९०९३६ ग्राहकाचा समावेश असून त्यांच्याकडे ६७ कोटी ३९ लाख रूपयाचे आणि यवतमाळ जिल्ह्यातील १ लाख ९०४७० ग्राहकांकडे ८८ कोटी ८१ लाख रूपयाची वीज देयके थकली आहे. तसेच परिमंडळात १ लाख रूपयापेक्षा जास्त थकबाकी असलेल्या ग्राहकाची संख्या ११५७असून त्यांच्याकडे ३२ कोटी ६७ लाख रूपये थकीत आहे.यामध्ये अमरावती जिल्ह्यातील ४७२ आणि यवतमाळ जिल्ह्यातील ६५५ ग्राहकाचा समावेश असून त्यांच्याकडे अनुक्रमे १४.१७ कोटी आणि १८.५५ कोटी थकीत आहे.

त्यामुळे अधीक्षक अभियंता ते जनमित्र यांना वसूलीचे उध्दिष्ठ देण्यात आले असून १ लाख रूपयापेक्षा जास्त थकबाकी असणारे ग्राहकाची तपासणी अधीक्षक अभियंता, ५० हजार ते १ लाख रूपया पर्यंत थकबाकी असलेल्या ग्राहकाची वसूलीचे उध्दिष्ट कार्यकारी अभियंता यांना देण्यात आले असून २५ ते ५० हजार रूपयाची थकबाकी असणारे ग्राहक उपकार्यकारी अभियंता, ५ हजार ते २५ हजार थकबाकीवाले ग्राहक शाखा अभियंता आणि ५ हजारापरर्यंत थकबाकी असलेल्या ग्राहकाच्या थकबाकीची वसूलीचे उध्दिष्ट जनमित्रांना देण्यात आले आहे.ग्राहकांची वीजबिल भरण्याची उदासिनता बघता महावितरणकडून नाईलाजास्तव वीज पुरवठा खंडित करण्याची कारवाई सक्रीय करण्यात आली आहे.थकबाकी वसुलीसाठी वरिष्ठ अधिकारीही फिल्डवर उतरले आहे.तसेच आगामी दिवसं हे सणासुदीचे असल्याने महावितरणची कटू कारवाई टाळण्यासाठी थकबाकी आणि वेळेत वीजबिल भरून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

## संक्षिप्त

### उमेदच्या संयुक्त विद्यमाने प्रकल्प उद्घाटन सोहळा



**चांदूर रेल्वे-** जीवनधारा प्रभाग संघ आमला विश्वेश्वर, नारीशक्ती प्रभाग संघ पळसखेड ,ऊर्जा प्रभाग संघ घुईखेड प्रभागामार्फत एकात्मिक शेती प्रभाग प्रकल्प, अंतर्गत रोपवाटिका स्थापना, सेंद्रिय निविष्ठा, मटन शॉप उभारणी,उत्पादक गटांची व्यवसाय उभारणी , परसबाग उभारणी, वृक्ष लागवड , विविध प्रकल्पामार्फत महिला सशक्तीकरणाकरिता कार्यक्रम घेण्यात आले. प्रकल्प मधून उभारलेल्या विविध उपक्रमांचा उद्घाटन सोहळा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर गौरव अभियान अंतर्गत राबविण्यात आला. उपक्रमांमध्ये आयएफसी प्रकल्प अंतर्गत उपजीविका सेवा केंद्र व सेंद्रिय निविष्ठा केंद्र तसेच परसबाग व रोपवाटिका या उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. या विविध उपक्रमातील उद्घाटन सर्व प्रभाग संघ अध्यक्ष यांनी केले. तसेच तालुका अभियान व्यवस्थापक अमोल पेठे, तालुका व्यवस्थापक सविता थेटे, प्रभाग समन्वयक सोनिया चव्हाण, मोनिका मुनघाटे, रेखा खेडकर , संघदीप दुर्योधन, महेश बांदे व सर्व प्रभाग संघातील कार्यरत समुदाय संसाधन व्यक्ती उपस्थित होत्या.

### सौम्या शर्मा यांनी क्षमताच्या कार्याचे केले कौतुक

**अमरावती-** मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी या बैठकीत सर्व सामाजिक संस्थांच्या कार्यकर्त्यांना विशेषतः युवा वर्गाला निमंत्रित केले होते, अमरावतीच्या सर्वांगीण विकासात या युवा वर्गाचे कुठल्या प्रकारे हातभार लागू शकते तसेच त्यांचा विविध विषयावरील दृष्टिकोन व विचार समजून घेण्याकरिता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



पर्यावरणाच्या क्षेत्रात सातत्याने प्रभावी उपक्रम राबवणाऱ्या क्षमता ठाकूर यांच्या संकल्पनेतून,राजनंदिनी स्मृती फाउंडेशन, महानगरपालिका अमरावती व जिल्हा परिषद अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने राबविलेल्या पर्यावरण पूरक गणेशा- २०२४ मध्ये जिल्ह्यातील शाळा मधून जवळपास ३२,००० विद्यार्थ्यांचा प्रशस्ती पत्र देऊन सत्कार करण्यात आला, या अभिनव उपक्रमाचे कौतुक करत, येत्या गणेशोत्सवात लागणाऱ्या प्रशस्ती पत्राकरिता मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी कोऱ्या कागदावर आपली स्वाक्षरी दिली व तसेच सर्वांना पर्यावरण पूरक गणेश स्थापना व विसर्जनाचे आवाहन केले. यावर्षी संस्थेचा तब्बल ५१ हजार पर्यावरण पूरक विद्यार्थ्यांना सन्मानित करण्याचा संकल्प आहे. सोबतच क्षमताने मागील पाच वर्षापासून चालविलेल्या प्लास्टिक संकलन अभियानाचे भरभरून कौतुक केले आणि महानगरपालिकेच्या यंत्रणे सोबत मिळून याला व्यापक स्वरूपावर कसे चालविता येईल यावर चिंतन केले आणि युवकांच्या दूरदृष्टी कोणाची शासकीय यंत्रणांना गरज आहे त्यांना सोबत घेऊन स्वच्छ व सुंदर अमरावती निर्माण करण्याचे या वेळी आश्वासन दिले.

### खोड किड्यावर जनजागृती मोहीम



**तिवसा-** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्न मानव सेवा प्रतिष्ठान वाडी संचालित स्व. आर. जी. देशमुख कृषी महाविद्यालय, तिवसा येथील अंतिम वर्षाच्या कृषी विद्यार्थ्यांनी 'ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम व कृषी औद्योगिक संलग्न उपक्रमांतर्गत भांबोरा गावात खोड किडीच्या प्रादुर्भावावर जनजागृती मोहीम राबवली.या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी शेतांमध्ये प्रत्यक्ष जाऊन पिकांची पाहणी केली. पाहणी दरम्यान शेतकऱ्यांना खोड किडीचा प्रादुर्भाव मुख्यतः पिकाच्या मुळापासून थोड्या वरच्या भागात दिसून येतो, व तो १० ते १५ दिवसांत स्पष्टपणे पसरतो, अशी माहिती दिली. या जनजागृती उपक्रमाचे मार्गदर्शन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण डहाके, ग्रामीण कृषी कार्यानुभव समन्वयक प्रा. सावन राठी, प्रा. गिरीश मेश्राम आणि विषयतज्ज्ञ प्रा. सी. एस. विघे यांनी केले.या उपक्रमात कृषिदूत विद्यार्थ्यांमध्ये सर्वेश सोळंके, सुशील वैद्य, सर्वेश विरुळकर, आदित्य तायवाडे व भूषरा शेख यांनी सक्रिय सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी केला.शेतकऱ्यांना प्रत्यक्ष माहिती देऊन मार्गदर्शन केल्यामुळे खोड किडीच्या नियंत्रणासाठी आवश्यक ती जनजागृती घडवून आणण्यात विद्यार्थ्यांना यश मिळाले.

# चिखलदरा दरीत पडलेल्या 6 जणांचे प्राण डीडीआरएफ टीमने वाचवले

## २ मुलांचा समावेश

**अमरावती/ का.प्र.**

अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा परिसरात नैसर्गिक सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी येथे डीडीआरएफ(जिल्हा आपत्ती प्रतिसाद दल) ची एक टीम तैनात करण्यात आली आहे. शनिवारी, शाहपूर गावापासून सुमारे अर्धा किलोमीटर अंतरावर असलेल्या चिखलदरा घाट रस्त्यावर, चालकाचे नियंत्रण सुटल्याने एक पर्यटकांची गाडी खोल दरीत कोसळली. गाडीत एकूण सहा जण होते, ज्यात चार प्रौढ आणि दोन मुले होती. घटनेची माहिती मिळताच, डीडीआरएफ टीमने खबरदारी घेत आणि स्वतःचा जीव धोक्यात घालून सर्व सहा जणांना दरीतून सुरक्षितपणे बाहेर काढले. या धाडसी आणि जलद कारवाईमुळे सहा निष्पाप लोकांचे प्राण वाचले.




# दमयंती नदीवरील पूल मध्यभागातून तुटला

**मोर्शी/ वार्ताहर**

राममंदिर ते पेठपुरा रस्त्यावरील दमयंती नदीवर बांधकाम करण्यात आलेला पूल मध्यभागातून तुटल्यामुळे या ठिकाणी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता बळावली आहे. या पुलाचे नव्याने बांधकाम करण्यात येईपर्यंत पुलावरून वाहतूक बंद करण्यात यावी.अशी मागणी काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष भूषण कोकाटे यांनी केली आहे.

मोर्शी शहरातील मेन रोडवर असलेल्या राममंदिर येथून पेठपुरा वसाहतीकडे जाणाऱ्या दमयंती नदीवरील पुलाच्या बांधकामाला जवळपास २० वर्ष पूर्ण झाली असून जीर्ण अवस्थेत आलेल्या या पुलाला मात्र दमयंती नदीला आलेल्या पहिल्याच पुराने तडे जाऊन पुलाचे दोन तुकडे पडले आहे.



## पुलावरून वाहतूक बंद करण्याची मागणी

## मोठी दुर्घटना होण्याची शक्यता

तसेच पुढे येणाऱ्या पावसाळ्यात आणखी दमयंती नदीला मोठा पुर आल्यास संपूर्ण पुल नदीच्या प्रवाहात वाहुन जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.पेठपुरा ते राममंदिर चौक हा गजबजलेला वाहतुकीचा रस्ता असून मोर्शी शहरातील नागरिक तसेच टू व्हीलर फोर व्हीलर गाड्या कित्येक वर्षापासून याच पुलावरून जाणे येणे करतात.अनेकवेळा मागणी करून सुद्धा या पुलाचे बांधकाम करण्यात आले नसल्यामुळे ही स्थिती निर्माण झाल्याचे मत नगरसेविका वैशाली भुषण कोकाटे यांनी व्यक्त केले.

> मागील वर्षी मंजुर झालेल्या मोर्शी शहरातील मच्छीसात व आठवडी बाजार येथील पुलासोबत याही पुलाच्या बांधकामा करिता निधी उपलब्ध करून या पुलाचे बांधकाम सुद्धा पूर्णत्वास जाणे आवश्यक होते. या पुलावरून मोठा अपघात घडण्यापुर्वी जाणारी येणारी वाहतूक बंद करण्यात यावी.
> **भुषण कोकाटे,** अध्यक्ष मोर्शी शहर काँगेस कमेटी

# उद्धव ठाकरें यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी कार्यक्रम

## आ. गजानन लवटे व शिवसैनिकांची उपस्थिती

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

शिवसेना पक्षप्रमुख, तथा माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या वाढदिवसमित्य अंजनगाव येथे फळवाटप व वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला.यावेळी दर्यापूर अंजनगाव मतदारसंघाचे आमदार .गजानन भाऊ लवटे शिवसहकार सेना जिल्हाप्रमुख अरुण पाटिल खारोडे, उपजिल्हाप्रमुख महेंद्र भाऊ दिपटे,विधानसभा समन्वयक प्रमोद भाऊ गिरनाळे,तालुका प्रमुख कपिल भाऊ देशमुख शहर प्रमुख राजु भाऊ अकोटकर,अभिजित भावे,शिवसेना अल्पसंख्याक शहर प्रमुख जावेद कुरेशी युवासेना तालुका प्रमुख विशू सावरकर,युवासेना शहर प्रमुख अक्षय गवळी,विक्रम पारडे,गजानन चौधरी,विनोद खारोडे,विनोद पाटिल,शरद फीसके गजानन पाठे,अनुप रेखाते,जगदीश मानकर,अमोल फाटे,संदीप पिंगे,मयूर रॉय, हरिदास कपले,फिरोज खान,जावेद खान, अनीस भाई, अफरोज सौदागर,रोहित खारोडे,देवेश हाडोळे,बजरंग खारोडे व समस्त शिवसैनिक उपस्थित होते.



# साने गुरुजी प्रेमीचे कर्मभूमी स्मारकाला स्नेहवंदन व वृक्षारोपण



**आसेगाव पूर्णा-** साने गुरुजींचे अमळनेर येथे गलवाडे रोड ला कृतिशील कर्मभूमी स्मारक जनसहभातून उभारणी सुरू आहे.येथील खडकाळ मुरमाड जमिनीवर प्रचंड मेहनतीने नंदनवन फुलतय त्याच बरोबर माणसाच्या सर्वांगीण विकासासाठी, भल्यासाठी विविध उपक्रम, प्रशिक्षण राबविले जात आहे. हे उपक्रम समजवून घ्यावे व साने गुरुजी कर्मभूमी स्मारकाला स्नेहवंदन करण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील साने गुरूजी प्रेमी दिवसभर कर्मभूमी स्मारकाच्या निसर्ग रम्य परिसरात रमले.

याप्रसंगी प्राचार्य राजाभाऊ महाजन, प्रा.डॉ.भारत कल्याण कर,शाहू कल्याणकर, अर्चना कल्याणकर,प्रा.डॉ.शांताराम चव्हाण, स्मिता चव्हाण,आकाश देशमुख, प्रा.सुधाकर गौरखेडे, डॉ. मनीषा यादव, गोपाळराव कोरडे, डॉ. दिलीपराव काळे,आनंद रणधी इंद्रायणी किल्लेदार , विठ्ठलराव ठाकरे,संध्या ठाकरे, सुभाषराव सगणे,प्रा. मिना गावंडे ,अनिल चऱ्हाटे, प्रा.डॉ.मुकेश सरदार, संगीता सरदार, संगीता काळे इ. हे जिल्ह्यातील मान्यवर उपस्थित होते. यांच्या सोबत, साने गुरुजी कर्मभूमी स्मारक स्मारकाचे अध्यक्ष प्रा डॉ अ.गो.सराफ, कार्यवाह गोपाळ नेवे,दर्शना पवार व तुषार पाटील,शिव निकम, शुभम पवार, मंगेश लोहार, सचिन पाखले,रोहित पाटील ,लोकेश वाणी ,हेमंत साळुंखे, नाविण्य पाटील प्रथमेश चौधरी ,विक्रांत शेजवल, इ.युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

# शहीद स्मारक परिसराची युवक कॉंग्रेसने केली स्वच्छता

**अमरावती/ का.प्र.**

शहरात ठिकठिकाणी साचलेला कचरा, मनपाच्या दुर्लक्षामुळे वाढलेली अस्वच्छता व काही निवडक ठेकेदारांच्या मनमानी कारभाराविरुद्ध अमरावती शहर युवक कॉंग्रेसद्वारे 'गांधीगारी' पद्धतीने आवाज उठवत विशेष स्वच्छता अभियान राबविले आहे.

जननायक राहुलजी गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त या अभियानाची सुरुवात करण्यात आली होती. महिनाभरापासून सातत्याने शहराच्या विविध भागांत युवक कॉंग्रेसतर्फे हा उपक्रम अविरतपणे राबविण्यात येत आहे. या मोहिमे अंतर्गत नवी वस्ती बडनेरा येथील शहीद स्मारक परिसराची साफसफाई करण्यात आली.कारगिल विजय दिवसाचे औचित्य साधून भारतमातेच्या रक्षणासाठी आपल्या प्राणाची बाजी लावणाऱ्या वीर जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने युवक कॉंग्रेसमार्फत या संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात आली. त्याचप्रमाणे भारतीय सैन्यातील निवृत्त सैनिकांचा यावेळी युवक कॉंग्रेस व बडनेरा कॉंग्रेस पदाधिकाऱ्यांनी सत्कार करित कृतज्ञता व्यक्त केली. साहेबराव मोहोड, बाळाधन दहाट व अनिल माहुले या माजी सैनिकांचा सत्कार यावेळी करण्यात आला. परिसरातील नागरिकांनीही युवक कॉंग्रेसच्या आवाहनाला उत्तम प्रतिसाद दिला व युवक कॉंग्रेसच्या अभियानाचे स्वागत केले.यावेळी बडनेरा ब्लॉक कॉंग्रेस अध्यक्ष संजय बोबडे, प्रकाश पहुरकर, सुरेश इंगळे, लक्ष्मी अहिरे, मंदाताई कोडापे, कृष्णराव गभणे, ज्ञानेश्वर झोंबाडे, अब्दुल रेहमान चौधरी, मिलिंद अहिरे, विनिता गोपाल, किशोर खोब्रागडे, मो.साबीर, दुर्योधन भोयर व परिसरातील इतर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.युवक कॉंग्रेसच्या या शहर स्वच्छता अभियानात समीर जवंजाळ, वैभव देशमुख, अनिकेत ढेंगळे,संकेत साहू, संदेश जैन, शुभम बांबल, मोहीत भेंडे, धनंजय बोबडे, आकाश गेडाम, सुजल इंगळे, श्रेयस धर्माळे, शंतनु देशमुख, गायकवाड, अंकुश टोपले, मोहोड, कुबडे, वेदांत केने, वैभव बैतुले या युवक कॉंग्रेस व एनएसयुआयच्या पदाधिकाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.



## माजी सैनिकांचा गौरव करून केला कारगिल विजय दिवस साजरा

# हिपॅटायटिस जनजागृतीसाठी वॉकथॉन अंतर्गत निघाली रॅली

**अमरावती/ का.प्र.**

जागतिक हिपॅटायटिस दिवसाचे औचित्य साधून, हाती विविध फलक घेत , घोषणा देत , सकाळच्या प्रसन्न वातावरणात , प्रचंड प्रतिसादात डॉ. हेडगेवार हॉस्पिटल व डॉ. अंजली कविमंडन मेमोरियल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने प्रचंड प्रतिसादात व उत्साहात आज वॉकॅथॉनचे आयोजन करण्यात आले .

हिपॅटायटिस विषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने , डॉ.हेडगेवार हॉस्पिटलच्या भाराणी मेमोरियल क्रिटिकल केयर युनिट, नंदा मार्केट येथून हाती विविध घोषणा फलक घेत वॉकॅथॉनची सुरुवात झाली. सहधर्मादाय आयुक्त दिलीप खोचे जावेद खान पठाण , महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ . विशाल काळे , आयोजक डॉ. अमित कविमंडन , डॉ. राजेश इंगोले ,डॉ . यशोधन बोधनकर यांनी हिरवी झेंडी दिली . चेपे यांनी केलेल्या शंखनादाने पारंपरिक पद्धतीने वॉकॅथॉनची उत्साहवर्धक सुरुवात झाली . हाती फलक , घोषणा आणि टी शर्ट घालून मोठया उत्साहाने मोठया संख्येने आबालवृद्ध सहभागीनी पुढाकार घेत जनजागृतीसाठी आयोजित या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



हिपॅटायटिसची कारणे, गांभीर्य व प्रतिबंध या महत्वाच्या विषयांवर जनजागृती व्हावी, या उद्देशाने हा लोकोपयोगी कार्यक्रम शहरातील प्रसिद्ध अशा दोन हॉस्पिटल्सकडून एकत्रिपणे आयोजित केला गेला.रॅलीचा समारोप डॉ. अंजली कविमंडन मेमोरियल हॉस्पिटल येथे झाला. या ठिकाणी वॉकॅथॉन पूर्ण करणाऱ्या सहभागींना मेडल्स प्रदान करण्यात आले .वॉकॅथॉनमध्ये डॉ . अनिल कविमंडन, डॉ . अमित कविमंडन डॉ . मानसी कविमंडन, जनक ल्याण सेवा संस्था ध्यक्ष श्री . अजय श्रॉफ , सचिव गोविंद जोग निशा मनोज भाराणी ,दिलीप खोचे , वैशाली खोचे , राजेश इंगोले , इंगोले , जावेद खान पठाण , विश्वस्त सतीश बक्षी, अविनाश भोजापुरे, आनंद दशपुते, अनिल देशमुख श्रीरंग कविमंडन, डॉ . यशोधन बोधनकर, डॉ. अंजली घिके , डॉ राजेश इंगोले , डॉ . प्रज्ञा बनसोड डॉ .पल्लवी शेटे , डॉ.भाविक चांगोले , डॉ . सुमीत पात्रीकर , अॅड.डा. प्राजक्ता पात्रीकर, रवी देशपांडे , डॉ . प्रमोद मराठे ,राजू पांडे, राधिका दम्माणी, ब्रजेश सादानी , प्रग्नेश दोषी , राजेश कोचे , रुही पिंजानी दिलीप व संध्या चेपे,वनिता कविमंडन, समीर देशपांडे, विकास केमदेव , डॉ .रोहिणी यादगिरे, , डॉ. गणेश बनसोड, डॉ. श्यामसुंदर गिरी, डॉ . आशिष भट्टड, कॅ . अरविंद चांडक , अॅड निळकंठ तायडे , राजेश माळोदे , शारदा नगर हास्य क्लबचे ज्येष्ठ योग गुरु बंड, ललित देशमुख व इतर अनेक प्रतिष्ठीत मंडळी प्रामुख्याने सहभागी झाले.डॉ. हेडगेवार हॉस्पिटल व डॉ. कविमंडन हॉस्पिटलचे कर्मचारी व सहकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# भस्मासूर परतलाय

## AI, Robot मानवी सेवक की मानवी संहारक?

**मा**नवाने प्रगतीच्या नावाखाली जे तंत्रज्ञान घडवले, ते आज स्वतःच्या अस्तित्वालाच आव्हान देऊ लागले आहे. औद्योगिक क्रांतीतले यंत्रमानव असोत किंवा आजचे कृत्रिम बुद्धिमत्ता-रोबोट्स सुरुवातीला ते आपल्या सेवेसाठी होते. आपण सर्व त्याचे कौतुक करीत आहोत पण पुढे काय? पण आता त्यांचे रूपांतर स्पर्धकात, आणि कदाचित उद्याच्या संहारकातही, होत आहे. हा बदल इतक्या वेगाने घडतो आहे की समाज, अर्थव्यवस्था आणि नैतिक मूल्ये यांना त्याचा मागही घेता येत नाही.

कृषीक्रांती व औद्योगिक क्रांतीनंतर मानवाने निसर्गावर वर्चस्व मिळवले. पण कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आता मानवाच्या बौद्धिक श्रेष्ठतेलाच मागे टाकते आहे. AI शिकते, बदलते आणि स्वतःला सुधारते आणि हेच तिचे सर्वात मोठे धोरणात्मक सामर्थ्य व मानवी भवितव्यासाठीचा धोका आहे. तेव्हा ह्या सेवकाला स्पर्धका पर्यंत जाण्या आधी थांबविले पाहिजे.

कृत्रिम मानव (Robots) व कृत्रिम विद्वत्ता (AI) च्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे उत्पादन, निर्मिती, सेवा आणि बौद्धिक क्षेत्रातील असंख्य रोजगार धोक्यात आले आहेत. संपत्ती व सत्ता काही मोजक्या कंपन्यांच्या हाती केंद्रित होतात; अब्जावधी लोक मात्र अर्थव्यवस्थेत निरुपयोगी बेरोजगार ठरतात. तेवा आर्थिक दिवलेखोरी होण्यापासून सावध होणे गरजेचे आहे.

शारीरिक श्रम रोबोट्सकडे आणि विचार करण्याची जबाबदारी AI कडे गेल्याने मानव निष्क्रिय ग्राहकात रूपांतरित होण्याचा धोका वाढतो आहे. नैसर्गिक आव्हाने नाहीशी होत असल्याने जीवनात उद्देश हरवतो; नैराश्य,



व्यसन व कृत्रिम आनंद यांचे प्रमाण वाढते. एकेकाळी साहित्य-तत्त्वज्ञानाने संस्कृती घडवली; आज त्याची जागा कृत्रिम क्षणभंगुर निर्मिती (Digital Meme) ने घेतली आहे. आणि त्यामुळे सामाजिक आणि मानसिक दुष्परिणाम होण्या आधीच सावरले पाहिजे.




(डॉ.व्ही.टी.इंगोले)
M.Tech. Ph. D.
मो. 9049844964,
vtingole@gmail.com

AI च्या वापरावर नैतिक नियंत्रणच नाही. शस्त्रीकरण, पाळत ठेवणारी साधने, प्रचारयंत्रणा सर्वत्र AI वापरले जाते. निर्णय प्रक्रियेत नफा व सत्ता हेच मापदंड ठरतात; मानवी सन्मान व करुणा नाहीशी होतात आणि. सामाजिक नैतीकतेचा बोऱ्या वाजतो आहे.

इतिहासात जास्त लोकसंख्या म्हणजे जास्त उत्पादनशक्ती आणि मोठा बाजारपेठीय फायदा मानला जात असे. पण रोबोटिक्स व AI नंतर उत्पादन झपाट्याने वाढेल आणि किंमती घसरेल, कारण मानवी श्रमाची गरजच उरणार नाही. पण खरेदीदारच कमी झाल्यास हे स्वस्त उत्पादन कोण घेणार? उत्पादन वाढूनही विक्री न झाल्याने अर्थव्यवस्थेची उतरती घसर गुंडी (Domino Effect) सुरू होईल कारखाने बंद पडतील, नोकऱ्या नाहीशा होतील, आणि सामाजिक अस्थिरता वाढेल. अशा परिस्थितीत समाजात 'AI उच्चवर्ग' विरुद्ध 'सामान्य जनता' अशी नवी दरी अधिक गडद होईल आणि वाढती पण निष्कामी लोकसंख्या आणि आर्थिक विषमतेचे भूत डोक्यावर बसेल.

मानवापेक्षा जास्त बुद्धिमत्ता असलेली AGI (Artificial General Intelligence) मानवाला अप्रासंगिक किंवा धोकादायक बनवू शकते. एक चुकीचा Computer Program आणि पूर्ण जग अपरिवर्तनीयरीत्या उद्ध्वस्त होऊ शकते. हा धोका दूरच्या भविष्यकाळातला नाही तो आत्ताच सुरू झालेला आहे.

AI आणि Robot मुळात गुणकारी आहेत पण त्याचा अति आणि चुकीचा वापर घातक होऊ शकतो. हीच वेळ आहे दिशा बदलण्याची. तंत्रज्ञानाला साधन ठेवायचे की तेच स्वामी होऊ द्यायचे हा निर्णय मानवजातीसमोर उभा आहे. आज जागे झालो नाही, तर उद्या 'भस्मासुर' आपल्याच हातून सुटून आपल्यालाच भस्मसात करेल. आता सामाजिक आणि शैक्षणिक विचार परिवर्तन व्हायला हवे आणि तेही प्रार्थमिक शिक्षणा पासून.

# आता थायलंड-कंबोडिया यांच्यात लष्करी संघर्ष

**सं**पूर्ण जग सध्या युद्धाच्या खाईत लोटले आहे. आशिया, युरोप, अमेरिका सर्वच खंडात कोणत्या ना कोणत्या देशात युद्ध चालू आहे. रशिया युक्रेन युद्ध दोन वर्ष झाली तरी चालूच आहे. इस्त्राईल हा देश तर सतत वार मोडवर असतो. कधी पॅलेस्टाईन कधी कधी हमास, कधी जॉर्डन तर कधी इराण या देशांशी इस्त्राईलचे युद्ध सुरूच असते. मागील वर्षी अझरबैजान आणि अल्बेनिया या देशात युद्ध झाले होते. भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धाचा भडका उडाला होता. भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेले ऑपरेशन सिंदूरने तर संपूर्ण जगाची चिंता वाढवली होती. भारत आणि चीन यांच्यात १९६२ पासून तणाव आहे. चीन आणि तैवान यांच्यातही कायम तणाव असतो या दोन्ही देशात कधीही युद्धाला तोंड फुटेल अशी शक्यता असते. दक्षिण कोरिया आणि उत्तर कोरिया यांच्यातही तीच परिस्थिती असते आता त्यात आणखी एका युद्धाची भर पडली आहे आणि हे युद्धही आशिया खंडातील दोन देशातच सुरू झाले आहे. विशेष म्हणजे ही दोन्ही देश भारताचे सख्खे शेजारी नसले तरी शेजारी आहेत. भारताचा शेजारी असलेल्या म्यानमार या देशाच्या पलिकडे हे देश आहेत. आशिया खंडातील महत्वाचे असणाऱ्या कंबोडिया आणि थायलंड या देशात सध्या मोठा लष्करी संघर्ष सुरू आहे.

या दोन्ही देशातील तणाव शिगेला पोहचला असून दोन्ही देशातील सैन्यामध्ये सीमेवर तुफान गोळीबार चालू असून त्यात आतापर्यंत दोन्ही बाजूंनी ३३ सैनिकांचा बळी गेला असून शेकडो सैनिक जखमी झाले आहेत. सोमवारी या संघर्षास सुरुवात झाली पहिल्याच दिवशी दोन्ही बाजूंचे ११ नागरिक गोळीबारात मारले गेले. थायलंडने गोळीबारास सुरुवात केल्याचा आरोप कंबोडियाने केला तर कंबोडियाने प्रथम गोळीबारास सुरुवात केल्याचा आरोप थायलंडने केला आहे.

दोन्ही देश एकमेकांवर आरोप करीत असले तरी दोन्ही देश या युद्धास पूर्वी पासून सज्ज होते फक्त त्यांना युद्धास निमित्त हवे होते ते निमित्त त्यांना सोमवारी मिळाले. सोमवारी सीमेवर गोळीबार झाला आणि युद्धाला तोंड फुटले. मिळालेल्या माहितीनुसार रॉयल कंबोडियन आर्मीने सीमेवर ड्रोन तैनात केले होते. त्यांनी तोफ आणि लांब पल्ल्याच्या बीएम -२१ रॉकेटने गोळीबार केला त्याला थायलंडने चोख प्रतिउत्तर दिले.

गोळीबाराने सुरू झालेला हा संघर्ष आता उग्र स्वरूप धारण करत आहे. या युद्धात ड्रोन, रॉकेट, फायटर विमान, तोफा यांचा वापर होत आहे. दोन्ही




बाजूंनी एकमेकांच्या लष्करी तळांवर हल्ला केला जात आहे. हा लष्करी संघर्ष लवकरात लवकर संपावा अशी जगाची इच्छा आहे. भारतानेही तसे बोलून दाखवले आहे. भारतीय नागरिकांनी या दोन्ही देशात प्रवास करण्याचे टाळावे असे आव्हान भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने केले आहे. अमेरिकेने नेहमीप्रमाणे या युद्धात नाक खुपसले आहे. स्वतःला आंतरराष्ट्रीय तंटामुक्ती संघटनेचे अध्यक्ष म्हणवून घेणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांनी लवकरात लवकर हा संघर्ष थांबवावा नाही तर अमेरिका या दोन्ही देशांशी होणारा व्यापार थांबवेल असा दम दिला आहे. मात्र सद्यस्थितीत दोन्ही देश ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. दोन्ही देश एकमेकांवर हल्ला करतच आहेत त्यामुळे हा संघर्ष आणखी वाढेल अशीच शक्यता आहे. थायलंड आणि कंबोडिया या दोन्ही देशातील वाद हा आताच नाही अनेक दशकांपासून सुरू आहे. प्रिह विहार नावाचे एक मंदिर या दोन्ही देशांच्या सीमेवर आहे. या मंदिराच्या मालकी मालकी हक्कावरून दोन्ही देशांमध्ये तीव्र मतभेद आहेत. हे मंदिर आपल्याच प्रदेशात आहे असा दावा दोन्ही देशांचा आहे त्यावरून २००८ आणि २०११ साली या दोन्ही देशात असाच संघर्ष झाला होता. आता पुन्हा त्याच कारणाने या दोन्ही देशात संघर्ष सुरू आहे. या वर्षीच्या मे महिन्यात एका कंबोडियन सैनिकाला गोळ्या घालून ठार करण्यात आले होते तेंव्हा देखील असाच मोठा तणाव निर्माण झाला होता. तेंव्हाच या दोन्ही देशात युद्ध पेटेल अशी शक्यता जाणकारांनी वर्तवली होती. सुदैवाने तेंव्हा तो संघर्ष टळला आता मात्र हा संघर्ष टळू शकला नाही आणि अखेर युद्धाला तोंड फुटले.

श्याम ठाणेदार

# युध्द दक्षिण-पूर्व आशियासाठी घातक!

**था**यलंड-कंबोडिया सीमा विवाद अचानक २३ जुलै २०२५ ला भयानक मोडवर पोहोचला सीमेवर तैनात एक थाई सैनिक विस्फोटमध्ये घायल झाला हा विस्फोट अशा ठिकाणी झाला की ज्या ठिकाणी मे महिन्यापासुन दोन्ही देशांची सेना आमने-सामने सीमावर्ती भागात तैनात होती.या विस्फोटचा आरोप थायलंडने कंबोडिया वर लावला.यानंतर २४ जुलै २०२५ ला थायलंड सेना अधिकाऱ्यांनी दावा केला की कंबोडिया सेनाने थायलंडच्या ४ सीमावर्ती प्रांतावर ( सुरिन,सिसाकेत,बुरीराम आणि उदोन थानी) रॉकेटने हल्ला केला यामध्ये ११ थायलंड नागरिक आणि एक सैनिक मारल्या गेला.यानंतर प्रत्युत्तर दाखल थायलंड वायुसेनाने एफ-१६ लडाकु विमानाने कंबोडियावर हल्ले केले आणि हा संघर्ष विकोपाला जाऊन पोहोचला व युध्दात परिवर्तीत झाला.११०० वर्षे जुने मंदिर विवादाचे मुख्य कारण असल्याचे सांगितले जाते आणि याला कारणीभूत फ्रान्स असल्याचे जगजाहीर आहे.कारण थायलंड,कंबोडिया आणि लाओसच्या सीमेला एमराल्ड ट्रायंगल म्हटल्या जाते.१९०४ ला फ्रांसीसी औपनिवेशिक प्रशासनाने 'फ्रेंको-सियामी संधी' च्या अंतर्गत सीमा मार्कीगसाठी डांगरेक पर्वत ला मुख्य आधार बनविण्यात आला.१९०७ मध्ये जेव्हा फ्रांसीसी सर्वेक्षण अधिकाऱ्यांनी नकाशा तयार केला तेव्हा प्रीह विहार मंदिर कंबोडियामध्ये दाखविण्यात आले.परंतु थायलंडने अनेक मंदिराच्या बाबतीत शंका व्यक्त केली आणि तेथूनच सीमा संघर्षाला सुरुवात झाली व हा संघर्ष फ्रान्सच्या १२१ वर्ष जुन्या चुकीमुळे निर्माण झालेला संघर्ष आज युध्दात रूपांतरीत झाल्याचे दिसून येते.

गेल्या ११०० वर्षांपासून थायलंड व कंबोडियात जुन्या प्रेह विहेयर मंदिरावरून वाद सुरू आहे.हेगमधील आंतरराष्ट्रीय न्यायालयाने १९६२ मध्ये हे मंदिर कंबोडियामध्ये असल्याचा निकाल दिला आणि थायलंडने निकाल सुध्दा मान्य केला.परंतु आताही आजुबाजुच्या जमिनींवरील वाद सुरू आहे आणि हा संघर्ष दिनांक २४ जुलै २०२५ ला दोन्ही देशांसाठी आगीचा गोळा बनली व हा वाद येवढा विकोपाला गेला की दोन्ही देश भिषण युध्दाच्या छायेत वावरत आहेत ही बाब संपूर्ण आशिया खंडासाठी चिंतेची व गंभीर विषय आहे.थायलंड व कंबोडिया यांना युद्धासाठी उकसविण्याचे काम चीन करीत आहे आणि समझोता करण्याचे काम करीत आहे.म्हणजे आग लावणे आणि विझविने हा चीनचा स्वार्थीपणाचा गुणधर्म आहे. कारण त्याचा मुख्य उद्देश म्हणजे विस्तारवादाला चालना देणे.त्यामुळे चीन दिवसेंदिवस आशिया खंडासाठी घातक सिद्ध होत आहे. कारण थायलंड-कंबोडिया यांच्यात जमीन विविद ११०० वर्षांपासूनचा आहे.परंतु आतापर्यंत येवढी भयानक युद्धजन्य परिस्थिती अजून पर्यंत निर्माण झालेली नव्हती.परंतु आता दोन्ही देशांकडून अत्याधुनिक शस्त्रांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे यात बीएम-२१ रॉकेट,एफ-१६ विमानांनी सैन्य ठिकाणांवर हल्ले आणि एफ -१६ विमानांची थायलंडची तयारी हा अत्यंत गंभीर विषय आहे.दोन्ही देशांचा वाढता संघर्ष पहाता दोन्ही देशांनी एकमेकांच्या राजदूतांची हकालपट्टी सुध्दा केली आहे.कंबोडियाने थायलंडवर बीएम -२१ रॉकेटने कारवाई केली तर थायलंडने एफ-१६ ने प्रत्युत्तर दिले व खुनी संघर्ष सुरू झाला.या संघर्षाचे मुख्य कारण म्हणजे डंगरेक पहाडावर स्थापित ११०० वर्षे जुने शिव मंदिर आहे (प्रासात ता मुएन थोम)या मंदिरावर दोन्ही देश आपला हक्क सांगतात. मंदिर भलेही थायलंडच्या सध्याच्या नकाशामध्ये येते, परंतु कंबोडिया या मंदिराला आपली पृष्ठभुमि मानते. त्यामुळे हा संघर्ष वाढता-वाढता आता युद्धामध्ये परिवर्तीत झाला आहे याचा गंभीर परिणाम थायलंड-कंबोडियाला तर भोगावाच लागेल सोबतच याचे प्रायश्चित्त संपूर्ण आशिया खंडातील देशांना सुध्दा भोगावे लागेल. त्यामुळे यावर ताबडतोब तोडगा निघणे गरजेचे आहे.असे सांगितले जाते की ११०० वर्षे जुने शिव मंदिर ज्याला प्रेह विहेयरच्या नावाने ओळखले जाते हे मंदिर खमेर सम्राट सूर्यवर्मन यांनी भगवान शिव साठी बनविले होते.परंतु वेळेनुसार हे मंदिर आता फक्त आस्थेचे केंद्र नसून राष्ट्रवाद, राजनीती आणि सैन्य ताकदीचा आखाडा बनला आहे.त्यामुळेच कंबोडिया आणि थायलंड यांचा संघर्ष विकोपाला गेला असुन झगड्याचे मोठे कारण बनले आहे.

थायलंड-कंबोडिया वाढता संघर्ष पहाता सीमावर्ती भागातील थायलंडमधील एक लाखाहुन अधिक लोक आपले घर सोडण्यास मजबूर झाले आहेत.२६ जुलैला सीमावाद आणि शिवमंदिर वादांमुळे आणखी भयावह स्थिती दिसून आली दोन्ही बाजूंनी प्रतीहल्ले सुरूच आहे यात ३६ लोक मारल्या गेले व ९० नागरिक जखमी झाले.आतापर्यंत दोन्ही देशांच्या विवादात ७८ लोकांचा मृत्यू झाला असून अनेक लोक गंभीररीत्या जखमी आहेत.दोन्ही देशाची युध्द परिस्थिती पहाता संयुक्त राष्ट्रसंघाने आपातकाल बैठक घेऊन यावर तोडगा काढण्यासाठी चर्चा सुरू केली आहे.परंतु यात अमेरिका व चीनची मध्यस्थी थायलंड व कंबोडियाने नाकारली आहे.त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघानेच हा संघर्ष स्वतः मध्यस्थी करून ताबडतोब थांबवावा व दक्षिण-पूर्व आशिया खंडात शांतता प्रस्थापित करावी.कारण जगात अनेक भागात युद्धजन्य परिस्थिती व गृहयुद्ध सुरू आहे त्यात जर दक्षिण-पूर्व आशियामध्ये युध्दाची चिंगारी वाढली तर संपूर्ण आशिया खंडात मोठा भडका उडुन भयावह स्थिती निर्माण होऊ शकते त्यामुळे याचे निवारण संयुक्त राष्ट्रसंघाने करावे.

रमेश कृष्णराव लांजेवार
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर



# महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्थेची वाटचाल प्रगतीपथ की प्रश्नपथ?

**शि**क्षण हे कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे मूलभूत अधिष्ठान असते. लोकशाही, सामाजिक समता, आणि आर्थिक विकास यांची पायाभरणी हे शिक्षणच करत असते. महाराष्ट्र ही एक प्रबुद्ध, प्रगत आणि विचारशील राज्य म्हणून ओळखली जाते. येथे अनेक सामाजिक सुधारणा चळवळी, विद्रोही विचारवंत, आणि गुणवत्तापूर्ण विद्यापीठांची परंपरा आहे. पण तरीही महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्था आज अनेक आव्हानांच्या गर्तेत अडकलेली आहे. एकीकडे राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP २०२०) लागू करण्याचा जोर आहे, तर दुसरीकडे शाळांमधील शिक्षकांची कमतरता, मुलांची घसरणारी उपस्थिती, शिक्षणातील असमानता आणि तांत्रिक/आधुनिक साधनसामुग्रीचा अभाव ही गंभीर प्रश्नचिन्हे उपस्थित करतात.

सर्वसमावेशक शिक्षणाचा अपुरा पोत-महाराष्ट्रात सर्व मुलांना शिक्षण मिळावे, हे उद्दिष्ट अनेक योजना आणि धोरणांतून मांडले जाते. पण आदिवासी, दलित, भटक्या-विमुक्त जमाती, मुस्लीम आणि ग्रामीण गरीब वर्गातील विद्यार्थी अजूनही शिक्षणाच्या प्रवाहात पूर्णपणे सामावले गेलेले नाहीत. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मुलांची संख्या घटत असून, त्याचा परिणाम सरकारी शाळांवर होतो आहे. दुसरीकडे शहरी भागात खासगी शाळांचा बाजार बहरतो आहे. ही सामाजिक व आर्थिक शिक्षणविषयक दरी अधिक खोल होत आहे.

**शिक्षकांच्या जागा रिक्त, गुणवत्तेचा प्रश्न गंभीर**-२०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार राज्यातील हजारो शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त आहेत. विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि नक्षलग्रस्त भागांत शिक्षकांचे प्रमाण अत्यल्प आहे. शिक्षणाचा दर्जा चांगला असावा, यासाठी सक्षम शिक्षकवर्ग हाच कणा आहे. पण प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता, तात्पुरती नियुक्ती, कॉन्ट्रॅक्ट शिक्षक व्यवस्था यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणात बाधा येते आहे.

**आराखड्यांमध्ये शिक्षण, पण बजेटमध्ये उपेक्षा** -महाराष्ट्राच्या वार्षिक अर्थसंकल्पात शिक्षणासाठी



मोठ्या घोषणांचा गजर केला जातो, पण प्रत्यक्षात बजेट खर्चाचा टक्का कमी असतो. एकीकडे शिक्षणात डिजिटल क्रांतीचा नारा दिला जातो, पण दुसरीकडे बहुतांश शाळांमध्ये संगणक, इंटरनेट, स्मार्ट बोर्ड यांचा अभाव दिसतो. डिजिटल शिक्षणाचा लाभ काही निवडक शहरी मुलांपुरता मर्यादित राहिला आहे. ही 'डिजिटल दरी' ही नवी सामाजिक दरी बनत आहे.

**शालेय सोडतीचे वाढते प्रमाण; अडचणीचे लक्षण**-मुलांच्या शालेय उपस्थितीत घट, आर्थिक गरिबीमुळे शिक्षण सोडणं, मजुरी-श्रमाकडे वळणं किंवा मुलींचं वयात येताच शिक्षण थांबवणे ही सामाजिक स्थिती चिंतेची आहे. काही जिल्ह्यांमध्ये ८वी-१०वीच्या विद्यार्थ्यांमध्ये शालेय सोडतीचे प्रमाण १५ऱ पेक्षा अधिक आहे. ही बाब शिक्षण हक्क कायद्याच्या आत्म्यालाच विरोध करणारी आहे.

**नवीन शैक्षणिक धोरण (NEP २०२०) – अपेक्षा की संभ्रम?**

NEP २०२० हे धोरण शिक्षणाच्या दर्जासाठी अनेक सकारात्मक संकल्पना घेऊन आले आहे. मातृभाषेतील शिक्षण, बहुभाषिकता, कौशल्यावर आधारित शिक्षण यांना प्रोत्साहन दिले आहे. पण महाराष्ट्रात याच्या अंमलबजावणीत अनेक तांत्रिक अडचणी आहेत. शाळांच्या संकुलीकरण (School Complex) योजनेत ग्रामीण शाळांची विलिनीकरण प्रक्रियेबाबत संभ्रम आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणापेक्षा त्यांच्या 'सारख्या सोयीसाठी' रचना आखली जात असल्याची भावना तयार झाली आहे.

**खासगीकरण आणि शिक्षणातील बाजारीकरण**-महाराष्ट्रात दरवर्षी हजारो खासगी शाळा व महाविद्यालये उभी राहत आहेत. प्रवेशासाठी लाखो रुपये शुल्क, प्रवेश प्रक्रियेतील अपारदर्शकता, कोचिंग क्लास संस्कृती आणि 'गुण मिळवण्याच्या' स्पर्धेने गुणवत्तेच्या शिक्षणाची अधोगती होते आहे. शासन पुरस्कृत शाळा मागे पडतात आणि शिक्षण ही सुविधा न राहता 'उत्पादन' बनते. यामुळे गरीब आणि मध्यमवर्ग शिक्षणसुधारणांपासून दूरच राहतो.

शिक्षण क्षेत्रात राजकारणाचे घातक हस्तक्षेप-शिक्षण संस्था, विद्यापीठ, महाविद्यालयांच्या नियुक्त्या, अनुदान निर्णय, अभ्यासक्रम सुधारणा यामध्ये राजकीय हस्तक्षेप वाढत आहेत. विद्यापीठाच्या स्वायत्ततेवर गदा येते आहे. शिक्षक भरती प्रक्रिया, अनुदान मंजुरी व महाविद्यालय मान्यता यासारख्या क्षेत्रांत भ्रष्टाचार, निकृष्ट निर्णय व लांबणीचा धोका आहे.

विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य आणि मूल्य शिक्षण-स्पर्धा, अपयश, सोशल मीडियाचा दुष्परिणाम, आणि पालक-शिक्षक-दाब यामुळे विद्यार्थी मानसिकदृष्ट्या दबावाखाली आहेत. आत्महत्यांचे वाढते प्रमाण, विशेषतः उच्च शिक्षण घेताना होणारा ताण, ही गंभीर समस्या आहे. मूल्यशिक्षण, समुपदेशन व संवेदनशील शिक्षक या गोष्टींची आता तीव्र गरज भासत आहे.महाराष्ट्रासारख्या प्रगत आणि वैचारिक राज्यात शिक्षण ही व्यवस्था अधिक सुबक, सर्वसमावेशक, गुणवत्ताधारित आणि मूल्यनिष्ठ असली पाहिजे. शिक्षण ही केवळ आर्थिक गुंतवणूक नसून, ती सामाजिक पुनर्रचनेची आणि लोकशाही टिकवण्याची प्रक्रिया आहे. शासन, शिक्षक, पालक आणि समाज यांनी एकत्रितपणे शिक्षण क्षेत्रातील आव्हाने समजून घेत ठोस कृती करणे आवश्यक आहे.

प्रशांत विघे

# श्री अंबिका देवी संस्थान श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे प्रवेश व्दाराचा लोकार्पण सोहळा





**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** विदर्भाची पंढरी आई रूक्मिणी मातेचे माहेर आणि श्री अंबिका देवी संस्थान मधून जगतजननी आई रूक्मिणी मातेचे हरण अशा प्राचीन पुरातन श्री अंबिका देवी मंदिराकडील जाणाऱ्या मेन रस्त्यांवरील नव्याने बांधलेले कमाण भव्य दिव्य प्रवेश व्दाराचा लोकार्पण सोहळा २७ जुलै ला सकाळी ११ वाजता पार पडला. प्रथम सकाळी ७.३० वा.अभिषेक करण्यात येऊन नंतर लोकार्पण सोहळा उद्घाटन छायाताई पाम्पटवार यांचे शुभहस्ते मोठ्या थाटात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष हभप ज्ञानेश्वर महाराज पातशे अध्यक्ष श्री अंबिका देवी संस्थान श्री क्षेत्र कौंडण्यपूर यांच्या अध्यक्षतेखाली तर प्रमुख उपस्थिती देवस्थानचे पुजारी नरेंद्र महाराज पुरी, विश्वस्त भैय्यासाहेब ठाकरे, दिनेश वानखडे, राजाभाऊ फिरके, संजय महल्ले, संदिप सोटे हभप पंकज महाजन महल्ले, अशोक पवार, सचिन ठाकरे, रितेश देशमुख, अनुराधा देशमुख, राजेश नागुलवार (नागपूर) आदी मान्यवरांच्या उपस्थितीत घेण्यात आला.

भव्य दिव्य प्रवेश व्दार मेन रस्त्यांवरील मातोश्री स्व.लक्ष्मीबाई व पती स्व.रामभाऊ विश्वंभर बनगिनवार (दिग्रसकर) यांच्या स्मरणार्थ श्री श्यामभाऊ बनगिनवार यांनी श्री अंबिका देवी संस्थान श्री क्षेत्र कौंडण्यपूर मंदिराकडे मेन रोडवरील कमाणीचे प्रवेश व्दार बांधण्यात आलेल्याचा लोकार्पण सोहळा प्रवचनकार छायाताई पाम्पटवार यांचे हस्ते पार पडला. देवस्थानचे अध्यक्ष हभप ज्ञानेश्वर महाराज पातशे यांनी बनगिनवार परिवाराचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.या मध्ये श्यामभाऊ बनगिनवार, पल्लवी , पंकज, पियुष,स्नेहा, स्वरा, अजय,रूपा,जिवन, विशाखा, समस्त परिवार याचा सहभाग होता.बांधकाम ठेकेदार श्रीचंद जाधव (फुलकमरी जि.वाशिम) यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.यानंतर श्री अंबिका देवी मंदिरामध्ये दुपारी १२ वा.वरील कार्यक्रमा निमित्त प्रवचनकार छायाताई पाम्पटवार यांचे आपल्या अमृतवाणीतून प्रवचन होऊन कार्यक्रमांचा शेवट महाप्रसादाने होऊन यशस्वी सांगता करण्यात आली.

# प्रगतिशील शेतकऱ्यांचा सन्मान सोहळा व शेतकरी प्रशिक्षण शिबिर

## मैत्री ॲग्रो सर्विसेस चांदुर रेल्वे तर्फे आयोजन



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे शहरात नव्याने सुरुवात झालेले मैत्री ॲग्रो सर्विसेस तर्फे आज दि.२६ जुलै २०२५ ला मनीराम हाइट्स, सिनेमा चौक चांदूर रेल्वे येथे तालुक्यातील प्रगतीशील शेतकरी अरविंद बकाले, मोतीसिंग जाधव,प्रफुल गारोडे, राजेंद्र घोडे, श्रीकांत निस्ताने यांचा शेतीतून भरघोस उत्पन्न घेणारे शेतकरी म्हणून सन्मान करण्यात आला. तसेच परिसरातील सर्व शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन करण्यात आले. मार्गदर्शक म्हणून सिंजेंटा कंपनीचे डॉ. पवन देशमुख, महेश दुधाटे यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाला प्रा. प्रभाकरराव वाघ, मदन कोठारी, सुधीर दशसहस्त्र यांची प्रमुख उपस्थिती होती.

तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली. परिसरातील सर्व शेतकऱ्यांच्या विकासासाठी तसेच शेतकऱ्यांना विविध कंपनीच्या योग्य,विश्वसनीय, खात्रीच्या शेती निविष्ठा पुरवण्याची हमी यावेळी मैत्री अग्रो सर्विसेस कडून देण्यात आली. मैत्री ॲग्रो सर्विसेसच्या उद्घाटनाचे वेळी त्यांच्या संचालकांनी शेतकऱ्यांचा मान सन्मान करण्याचा मानस बोलून दाखवला होता. तो शब्द आज त्यांनी खरा करून दाखवला. उल्लेखनीय बाब म्हणजे सिजेंटा कंपनीने त्यांचे नवीन कीटकनाशक मैत्री ॲग्रो सर्विसेसच्या दालनात चांदुर रेल्वे येथील शेतकऱ्यांच्या हस्ते लॉन्च केले.शेतकऱ्यांना योग्य मानसन्मान देऊन आपल्याच हाताने आपली कृषी निविष्ठा घेण्याची मुभा मैत्री ॲग्रो सर्विसेस मध्ये देण्यात आली आहे. सर्व प्रकारचे आधुनिक तंत्रज्ञान असलेले औषधी कीटकनाशके, खते उपलब्ध शेतकऱ्यांसाठी करून देण्यात आले आहे असे मैत्री ॲग्रो सर्विसेसचे संचालक हर्षल वाघ,सनी जोशी,अभय बनाईत,अंकुश जोशी,श्रीकांत पारगावकर पारस राय,प्रशांत भैसे यांनी यावेळी सांगितले.

# कै.ना.अ.देशमुख महाविद्यालयात प्रमाणपत्र वितरण

## -बेसिक ब्युटी पार्लर प्रमाणपत्र प्रशिक्षण



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक कै. ना.अ. देशमुख महाविद्यालयातील गृह अर्थशास्त्र विभागांतर्गत उद्योजकता विकासाच्या दृष्टीने २० दिवशीय बेसिक ब्युटी पार्लर प्रमाणपत्र प्रशिक्षणास सुरुवात झाली. प्रशिक्षणाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्य मा. डॉ. वनिता चोरे यांच्या हस्ते झाले.

प्रशिक्षक म्हणून माधुरी चव्हाण अध्यक्ष अंबाई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अमरावती यांनी विद्यार्थिनींना प्रशिक्षण दिले. विद्यार्थिनींना प्रोत्साहित करण्याचे कार्य व प्रशिक्षणाचे आयोजन गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. नीना चवरे व डॉ.वैशाली देशमुख यांनी केले. या प्रशिक्षणात महाविद्यालयातील ४० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. जाणिवा नात स्वयंरोजगार करून कौशल्य विकसित करण्याचे कार्य विद्यार्थिनींनी करावे हा उद्देश समोर ठेवून या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर प्रशिक्षण आयोजित करण्याकरिता संस्था अध्यक्षा, माजी राज्यमंत्री वसुधाताई देशमुख व सचिव प्रा.अभय देशमुख तसेच प्रशासकीय संचालक प्राचार्य जीवनराव देशमुख यांनी प्रोत्साहन दिले. बेसिक ब्युटी पार्लर प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थिनींना प्राचार्य वनिता चोरे व प्रशिक्षक माधुरी चव्हाण यांचे हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहभाग दर्शविला.

# १५ वर्षीय मुलीला आत्महत्येस प्रवृत्त करणारा तरुण गजाआड

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर परिसरातील दहावीत शिकणाऱ्या १५ वर्षीय मुलीने २४ जुलै रोजी राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. या प्रकरणात गाडगेनगर पोलिसांनी एका २४ वर्षीय तरुणाला गजाआड केले आहे. अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव अभिषेक उर्फ गोलू जनार्धन पवार (रा. रमाबाई आंबेडकरनगर, अमरावती) असे आहे. मुलीच्या नातेवाइकांचा आरोप आहे की, अभिषेक पवार मागील काही दिवसांपासून तिचा पाठलाग करत होता आणि तिला सतत बोलायला भाग पाडत होता. त्यामुळे ती तणावात होती आणि त्याच त्रासाला कंटाळून तिने आत्महत्या केली. घटनेनंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले, पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. सायंकाळी मुलीचे नातेवाईक पोलिस ठाण्यात आले आणि आरोपीवर कठोर कारवाईची मागणी केली. मुलीच्या आईच्या तक्रारीवरून, पोलिसांनी अभिषेक पवारविरोधात आत्महत्येस प्रवृत्त करणे, अ‍ॅट्रॉसिटी कायदा आणि पोक्सो कायद्याखाली गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. २५ जुलै रोजी आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले होते.आरोपीला एक दिवसाची पोलीस कोठडीं सुनावण्यात आली.

# देशी दारूसह विरूळ रोंगे येथील दोघे ताब्यात



**चांदूररेल्वे/प्रतिनिधीः-** स्थानिक चांदूररेल्वे पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या विरूळ रोंगे येथील दोघांना देशी दारूसह पोलिसांनी कारवाई करून पकडले. दि.२३ जुलै २०२५ रोजी ग्राम विरूळ रोंगे येथे पोलिसांनी धाड टाकली असता आरोपी सुधाकर जयकृष्ण गळकरी (वय ६५), अशोक नथूजी करपते (वय ४५) यांचे ताब्यातून १८० एम एल च्या ४८ पावट्या व ९० एम एल च्या २२ पावट्या संत्रा, बॉबी व सिमला देशी दारूच्या पावट्या किंमत अंदाजे ५९०० रुपयेचा मुददेमाल मिळून आल्याने त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे.

ही कारवाई चांदूररेल्वे ठाणेदार अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली PSI नितेश आझडे, नंदलाल लिंगोट,HC निलेश शेंडे, राहुल वानखडे, राहुल इंगळे,NPC प्रशांत ढोके,संदीप वासनिक,रवी मुताडे,वैभव ठाकरे,शोभीत ठाकरे, संदीप राठोड, संदीप बदूकले,म.पो.का. पूनम पाटील,जगदीश राठोड, प्रकाश बिरोले यांनी यांनी केली.

# नांदगाव तालुक्यात हुमणी अळीचा प्रादुर्भाव वाढला

## -शेकडो हेक्टर क्षेत्र बाधित -शेतकऱ्यांनी वेळीच उपाययोजना करणे गरजेचे



**नांदगांव खांडेश्वर/प्रतिनिधीः-** तालुक्यातील अनेक भागात यावर्षी सोयाबीन पिकावर हुमणी अळीचा प्रादुर्भाव वाढला असून शेकडो हेक्टर क्षेत्रातील पीक या किडीने बाधित झाले आहे. शेतकऱ्यांनी यावर वेळीच उपाय योजना करणे गरजेचे आहे असे आवाहन तालुका कृषी विभागाकडून करण्यात आले. आज पर्यंत खोडमाशी चक्रभुगा येलो मोझॅक इत्यादी किडीचाच प्रादुर्भावाला सोयाबीनचे पीक बळी पडत होते. परंतु यावर्षी हुमणी अळीचा नव्याने प्रादुर्भाव वाढला असून सोयाबीनचे पीक या अळीच्या प्रादुर्भावाला बळी पडत आहे. त्यामुळे उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट येण्याचा धोका निर्माण झाला. तालुक्यातील वेणी गणेशपूर येथील रोशन बंड या शेतकऱ्यांनी चार एकरातील सोयाबीन हुमणी अळीचा प्रादुर्भावाला बळी पडल्याने संपूर्ण सोयाबीन वखरून टाकले. अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये या किडीचा उपद्रव वाढला असल्याचे दिसून येते. हि अळी जमिनीमध्ये राहून झाडांच्या मुळावर उपजीविका करून झाडाची मुळे खाऊन टाकते. त्यामुळे झाड कोमेजून वाळून जाते. त्यामुळे उत्पादनात घट येऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. कृषी विभागाकडून यावर उपाययोजना सुचविण्यात आल्या असून शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली त्वरित जैविक किंवा रासायनिक कीटकनाशकाचा वापर करून अळीचे नियंत्रण करावे. त्याकरिता तुरळक प्रादुर्भाव असल्यास मेट्या रायजियम जैविक मित्र बुरशी ४ मिली प्रति लिटर पाण्यामधून पिकाच्या मुळाशी आळवणी किंवा १ किलो मेट्या रायाझियम १०० किलो शेणखतात मिसळून एक हेक्टर मध्ये वापरावे. गंभीर प्रादुर्भाव आढळून आल्यास रासायनिक उपायोजना म्हणून फिप्रोनील ४० टक्के, अधिक इमिडाकलोपिड ४० टक्के, दाणेदार ५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून खोडाजवळ टाकावे कार्बो फ्युरॉन ३, टक्के दाणेदार प्रती हेक्टर थायो मेथॅगजाम, ०.४ टक्के अधिक बायफेंथिन, ०.८ टक्के १२ किलो प्रति हेक्टर थायोमेथॉगजाम, ०९ टक्के अधिक फ्रीफोनील , २ टक्के १५ किलो हेक्टर शेतामध्ये ओलावा असताना वापर करून अळीचे नियंत्रण करावे असे आवाहन तालुका कृषी अधिकारी इंगोले व कृषी अधिकारी जावेद शेख यांनी संयुक्तरित्या केले.

# पोपटांच्या थव्यांचा मोसंबीवर ताव



**वरुड/प्रतिनिधीः-** वरुड तालुक्यातील मोसंबी उत्पादक शेतकरी सध्या पोपटांच्या मोठ्या आक्रमणामुळे हवालदिल झाले आहेत. अनेक शेतकऱ्यांनी संत्र्याऐवजी मोसंबी फळबागेची निवड केली होती. कारण, मोसंबी पीक दरवर्षी चांगले उत्पादन व उत्पन्न देणारे ठरले आहे. मात्र, गेल्या ३-४ वर्षांपासून निसर्गाच्या लहरीमुळे फळगळीचे प्रमाण वाढले आहे. यंदा तर पोपटांच्या थव्यांनी थेट फळबागांवर हल्ला चढवला आहे. बेलोरा येथील मोसंबी उत्पादक शेतकरी ललित ताथोडे यांच्या मते, 'यावर्षी जुलैपासूनच अंबिया बहाराच्या मोसंबीत ज्यूस यायला सुरुवात झाली आहे. परंतु, ऑगस्ट-सप्टेंबरमधील विक्रीपूर्वीच पोपटांच्या हजारोंच्या थव्यांनी फळांची नासधूस सुरू केली आहे. एका झाडाखाली ३ ते ४ कॅरेट मोसंबी सडलेली दिसत आहे. पोपट थेट फळांवर चोच मारून अर्धवट खाऊन फेकून देतात, त्यामुळे ती फळे विक्रीयोग्य राहत नाहीत. या परिसरात संत्रा लागवडीपेक्षा मोसंबीला पसंती मिळाल्याचे कारण म्हणजे दरवर्षी येणारे हमखास उत्पादन आणि बाजारात मागणी. मात्र, यंदा प्रत्येक शेतकऱ्याला हजारोंच्या नुकसानाचा फटका बसत आहे. कमी मजुरी उपलब्धतेमुळे यंत्रणा किंवा मानवशक्तीने दिवसभर शेत राखणे शक्य होत नाही,म्हणून शेतकरी मेटाकुटीला आले आहेत.

सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटी, अंजनगाव सुर्जी
(जैन धार्मिक अल्पसंख्यांक संस्था) द्वारा संचालित

**सीताबाई संगई प्राथमिक शाळा**

(100% अनुदानित) अंजनगाव सुर्जी जि. अमरावती

**पाहिजेत**

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | विषय | पदांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षण सेवक (वर्ग 1 ते 4 करिता) | H.S.C. D.Ed. TET अनिवार्य | सर्व विषय | 3 पदे | सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या पदांवर सदर नियुक्ती करण्यात येणार आहे. तसेच संस्था जैन धार्मिक अल्पसंख्यांक असल्याने आरक्षण/बिंदुनामावली लागू नाही. |

वरील पदांकरिता दि.11/08/2025 रोजी सकाळी 10-00 वाजता स्वखर्चाने, स्वलिखित अर्ज, मूळ कागदपत्रे, प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती व फोटोसह प्रत्यक्ष मुलाखतीस संस्थेच्या कार्यालयात उपस्थित राहावे.

अध्यक्ष
सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटी, अंजनगाव सुर्जी

सचिव
शाळा समिती तथा मुख्याध्यापक
सीताबाई संगई प्राथमिक शाळा अंजनगाव सुर्जी

# नागपूर-औरंगाबाद एक्सप्रेस हायवेवर सर्वपक्षीय आंदोलन

## -शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याची मागणी



**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा व्हावा तसेच दिव्यांग,शेतमजूर कामगार,मेंढपाळ,मच्छीमार यांच्या मागण्यासाठी माजी मंत्री बच्चू कडू हे अनेक दिवसापासून आंदोलन करीत आहेत. सरकारने सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते, त्या आश्वासनाची सरकारला जाग यावी म्हणून आज दि.२४ जुलै रोजी धामणगाव रेल्वे तालुक्यातील नागपूर औरंगाबाद एक्सप्रेस हायवे देवगाव चौफुली येथे सर्वपक्षीय आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी प्रहार चे अमरावती जिल्हाध्यक्ष प्रविण हेंडवे, तालुकाध्यक्ष सूरज गंथडे,अमर ठाकरे, नाना होणाडे तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी , मनोज शिवणकर युवा अध्यक्ष, मंगेश ठाकरे, कपिल पडधान क्रांतिकारी शेतकरी संघटना जिल्हा अध्यक्ष, दिगंबर सोनटक्के, नरसिंग खंडार, विजय कोंबे,अमर गायधने,प्रशांत थोटे, शैलेश टाले, अक्षय धोपटे, प्रवीण रोहनकर,योगेश ताथोड, कैलास चांदणे, मंगेश देवळे, दिनेश शेळके, अशोक काळे कम्युनिस्ट पक्ष, गजानन मानकर संभाजी ब्रिगेड,योगेश कावडे ,विशाल भैसे, राजाभाऊ ढोबळे, मनोज चौधरी, रणजित मोकासे, गजानराव पढघण, शिदार्थ मोडक, शिवदास रामटेके, सिद्धार्थ भेंडे,भैया धवस, निवृत्ती कळसकर,ज्ञानेश्वर टाले,अतुल नागमोते,सुधाकर बर्डे, छोटू काकडे, नागेश सोनोने, दीपक पारखंडे, बंडू भोयर, विजय वानखडे, शेख अमीर, राजू नांदुरकर, चेतन किलोर, सचिन वानखडे, प्रेमकुमार हेंडवे,निखिल मिसाळ, स्वप्निल जायले, अमर काकडे, संदीप धांदे, नितीन हिंगे,दानिश पठाण,प्रणय डावरे, फिरोज पठाण,आशु नरुले, सौरभ वानखडे, किशोर जाधव, संतोष तुमसरे, पंकज काळे, आशिष सरोदे, सागर ढोले, गौरव शेंडे, उद्देश सोनटक्के, बुराटे महेंद्र, डोंगरे संजय, हिवस, गौरव जायले, उमेश हिवसे,विनोद गायके, संजय सांगोडे, प्रवीण मडामे, मयूर गुडदे, चेतन गावंडे, जीवन सपाटे, अश्विन डेरे,सागर ठाकरे, विशाल डेहणकर, कांचन राऊत, शुभम ठाकरे, महिंद्रा काळे,आशिष मानकर, शुभम मिरचापुरे,उमेश उडाखे,संजय उडाखे, सुनील बडगया, गोपाल राजगिरे, अमित फुलझले, पंकज पाटील विलास कडूकार ,मंगेश माळोदे, सुनील गुबडे ,निलेश पाल,अजय डाफ, सुरज तीतरे, आशिष गायकवाड, संतोष वाळके, मारुती वाळके, नरेंद्र हुडे,दिलीप पाटील ,शेखर कांबळे ,अनिल भगवे, सोपान घनमोडे,शिवदास मुंडे,लक्ष्मण घाटे ,हेमंत साळवे ,गजानन ठाणगे ,गणेश मेहंगे ,हेमराज भगेवार ,भारत घनमोडे ,तेजस सरोदे, अजय कांबळे,पिंटू तूपटकर ,पांडुरंग मांजरे,सुरेश ढेंबरे, सचिन भोसले, सुमित कटारणे,नितीन राजूरकर, हरीदास कोरडे अवधूत डंबळे, मनोज चौधरी, अजय चौधरी, गजानन वानखडे, चेतन काळे ,देवेंद्र भलमे, सुधीर रंगारी,प्रमोद खुरसाडे, राजू मोकासे, मनीष देवतारे, विलास कडूकार,रामेशोर पवार, अर्जुन तेळे,संकेत कावळे,कुशाल पुसदकर, सागर शेंडे,अतुल कावळे यांच्यासह तालुक्यातील शेकडो शेतकरी व कार्यकर्त्यांनी शेतकऱ्याचा सातबारा कोरा व्हावा म्हणून देवगाव येथील चक्काजाम आंदोलनाला उपस्थित दर्शविली.

# जिल्हा मुद्रांक अधिकाऱ्यांवर फौजदारी दाखल करा

## क्रांती सेनेचे मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा उपनिबंधक तथा जिल्हा मुद्रांक अधिकारी अनिल औतकर यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी क्रांतीसेनेचे संस्थापक अध्यक्ष रितेश तेलमोरे यांनी आज शनिवारी २६ जुलै रोजी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केली आहे.त्यांनी आरोप लावला की, कठोरा, मासोद, रेवसा, बडनेरा, राजुरा ,सुलतानपूर या परिसरातील आर्थिक दुर्बल घटकांना मिळालेले अभिन्यास मधील प्लॉट परस्पर विकण्यात आले. हे प्लॉट विकताना कोणत्याही संबंधित कार्यालयाकडून कारवाई करण्यात आली नाही. त्यांनी सांगितले की ,गेल्या दोन वर्षापासून यासंदर्भात तक्रारी करूनही त्याची दखल घेतल्या गेली नाही. प्लॉटची वैधता न तपासता संबंधित अभिन्यास प्लॉटच्या हस्तांतरण करताना शेतमालक आणि विकसनकर्ता यांनी संगमनत केले. बेकायदेशीर व्यवहाराला आर्थिक हात मिळवणी करून संबंधित अभिन्यास प्लॉटचे हस्तांतरण होण्यास मदत केली. अशा या बेकायदेशीर व्यवहाराला आळा घालण्यासाठी कायद्याने योग्य ती प्रक्रिया आखून दिलेली आहे, परंतु त्याला न जुमानता पैशाचा आरसा समोर ठेवून जाणीवपूर्व दुर्लक्ष करीत अशा प्रकारचे बेकायदेशीर व्यवहार होत आहे. जिल्हा उपनिबंधक तथा जिल्हा मुद्रांक अधिकारी यांना बरेच वेळा प्रत्यक्ष स्वरूपात भेटून तक्रारी दिल्यानंतरही कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. सदर कार्यालय ग्रामीण व शहरी लाभार्थ्यांच्या अधिकारावर गदा आणून त्यांनाच प्रदान केलेले प्रमाणपत्र याचे अवलोकन न करता आर्थिक व्यवहार करत आहे.

आर्थिक दुर्बल घटकमधील आरक्षित नागरिकांचे आरक्षण ठरवणारे शासकीय कर्मचारी व अधिकारी तसेच अभीन्यास विकसनकर्ता, शेतमालक हे सर्व व त्यांना सहकार्य करणारे जिल्हा उपनिबंधक तथा मुद्रांक अधिकारी यांच्यावर कारवाई करणे अभिप्रेत आहे.त्यांनी व्यापाऱ्यांशी हात मिळवणी करून व आर्थिक व्यवहार करून डोळे मिटून आर्थिक दुर्बल घटकांच्या नियमावलीमध्ये मंजूरी मिळवलेल्या अभिन्यास मधील प्लॉटच्या खरे जो लाभार्थी नाही त्यांच्या नावाने करून देत आहे. आर्थिक दुर्बल घटक चे प्रमाणपत्र न तपासता या गोष्टीला संपूर्णतः मुद्रांक अधिकारी औतकर जबाबदार असून त्यांच्यावर गुन्हे दाखल करावी अशी मागणी केली आहे. पत्रकार परिषदमध्ये रितेश तेलमोरे, प्रदीप उसरे, आकाश इंगळे , दीपक थोरात, आकाश ससाने, राहुल सरदार आदि उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**

माझे पक्षकार नामे **शुभम गोकुळराव काळे व सौ. छाया गोकुळराव काळे** दोघेही रा.भक्ती मंदिर वार्ड, दगडी पूल जवळ खरकाडीपुरा, अमरावती यांनी दिलेल्या माहिती व अधिकारा वरुन संपूर्ण जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे **शुभम गोकुळराव काळे व सौ. छाया गोकुळराव काळे** यांनी नोंदणी पोटतुकडी प्लॉटचे वर्णन -
नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर कचेरीचे कक्षेतील व अमरावती म.न.पा.च्या हद्दीतील मौजे बेनोडा, प्रगणे नांदगांव पेठ, ता.जि. अमरावती येथील शेत सर्वे नं. ३७/१ मधील जमिन ज्याचा रा.मा.क्र.एन.ए.पी.-३४/बेनोडा-७/१९७६-७७ आदेश दि.३०/०८/१९७७ नुसार कन्व्हर्शन मंजुर झालेल्या व रा.मा.क्र/एम. आर. सी.-८१/ बेनोडा/७६१/२०२४-२५ या प्रकरणामधील आदेश दि. ०९/०४/२०२५ नुसार सब डिव्हीजन मंजूर जागेतील प्लॉट क्र. १२९/ए क्षेत्रफळ ११२२ चौ.फुट (१०४.२८चौमी), यावर आर.सी.सी. कॉलम पद्धतीचे पक्के स्वरुपाचे बांधकाम ज्यामध्ये दोन हॉल, दोन बेडरूम, एक किचन व दोन संडास बाथरूम अशी मालमत्ता व याची चतुःसिमा येणे प्रमाणे-
**पुर्वेसः १२९ बि,** **पश्चिमेसः प्लॉट क्र १२८,**
**उत्तरेसः लेआऊट मधील रस्ता,** **दक्षिणेसःप्लॉट क्रमांक १२३**
येणे प्रमाणे मालमत्ते बाबत माझे पक्षकार नामे **शुभम गोकुळराव काळे व सौ. छाया गोकुळराव काळे** यांनी या मिळकतीचे मालकांसोबत टोकन सौदा केलेला असून करारात ठरल्याप्रमाणे सदरचे मालमत्तेबाबत पुढील काहीच दिवसामध्ये माझे पक्षकार हे स्वता किंवा ते सांगतील त्यांचे नावे खरेदी करार करणार आहेत.
करीता या द्वारे संपूर्ण जनतेस सूचित करण्यात येते की, सदहू मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, गहाणं, बोझा, वारसहक्क, जप्ती, कर्ज, ताबा अथवा कोणत्याही कुठल्याही प्रकारचा अधिकार असल्यास नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०४ (चार) दिवसाचे आत पूर्ण लेखी दस्ताऐवजी पुराव्यांसह माझ्या खालील पत्त्यावर, माझेशी संपर्क साधावा अथवा माझे पक्षकार यांचे सोबत त्यांच्या वर नमूद पत्त्यावर संपर्क साधावा. सदर मुदतीनंतर माझे पक्षकार कराराप्रमाणे वरील मिळकती रितसर नोंदणीकृत खरेदी करून घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी. याकरीत नोटीस प्रसिद्धीस सादर.

**ॲड. सागर द. अंजीकर**
**ऑफिस पत्ताः 'शांताई', भूमिपुत्र कॉलनी, कॉंग्रेस नगर जवळ, अमरावती, ता. जि. अमरावती.**
**मो. क्र.९४२३४२६०८९**

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक ३२३**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखय
अकोला
जिल्हा विशेष

# सावरगावमध्ये घाणीचे साम्राज्य : टायफाईड रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील अतिदुर्गम सावरगाव येथे सध्या संपूर्ण गावात घाणीचे साम्राज्य पसरले असून, त्यामुळे टायफाईडसारख्या साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे. गावातील अनेक भागांत साचलेल्या सांडपाण्यामुळे दुर्गंधी पसरली असून, याचा थेट फटका ग्रामस्थांच्या आरोग्याला बसत आहे.

सावरगाव येथे सुट्टीवर आलेले सैनिक अनिकेत राठोड यांना देखील घाण आणि दुर्गंधीमुळे टायफाईडचा त्रास झाला आहे. त्यांच्या घराजवळील हातपंपाजवळ सतत सांडपाणी साचलेले असून, दुर्गंधीमुळे परिसरात राहणे अशक्य झाले आहे. त्यांनी दिनांक २१ जुलै रोजी ग्रामपंचायतीकडे तक्रार दाखल केली असूनही, आठवडाभर उलटल्यानंतरही तक्रारीकडे कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही.

गावातील अनेक रस्ते चिखलात गेले असून, शाळकरी मुलांना तसेच नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत अनेक ग्रामस्थ आजारी पडत असून, चतारी येथील ग्रामीण रुग्णालयात अनेक रुग्णांवर उपचार सुरू आहेत. विशेषतः टायफाईड, डायरिया यांसारख्या पाण्याद्वारे पसरणाऱ्या आजारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

## स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष; ग्रामस्थ संतप्त



ग्रामस्थांनी अनेक वेळा तोंडी तक्रारी करूनही ग्रामपंचायतीने कोणतीही ठोस कार्यवाही केली नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. पातुर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तसेच स्वच्छता विभाग यांनी याकडे अक्षम्य दुर्लक्ष केल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

सावरगावमधील वाढत्या आरोग्य धोक्याच्या पार्श्वभूमीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. अन्यथा मोठ्या साथीचा उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**सैनिकाची तक्रार आठवडाभरापासून धुळखात!**

सैनिक अनिकेत राठोड यांनी २१ जुलै रोजी हातपंपजवळील दुर्गंधी आणि घाणीबाबत तक्रार केली होती. मात्र, आठवड्यानंतरही त्यांच्या तक्रारीकडे कुठल्याही प्रकारची दखल घेतलेली नाही.

*'गावातील सांडपाणी ग्रामपंचायतीने हेतूपरस्पर माझ्या घरासमोर आणून सोडले आहे. त्यामुळे माझे घर पूर्णपणे घाणीच्या विळख्यात सापडले आहे. दुर्गंधीमुळे माझ्या आई-वडील व मुलांना टायफाईड, डायरिया यांसारखे आजार वारंवार होत आहेत.'*

**गजानन पायघन,**
ग्रामस्थ, सावरगाव

त्यांच्या कुटुंबातील सदस्य देखील आजाराच्या विळख्यात अडकण्याची भीती व्यक्त करत आहेत.

**डेंग्यूचा धोका वाढला!**

सावरगावमध्ये साचलेल्या सांडपाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढली आहे. यामुळे डेंग्यूसारख्या गंभीर आजाराचा धोका वाढला असून, ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. वेळेत उपाययोजना न केल्यास परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते.

# चान्नी, पातुर ठाणे हद्दीतील सात अल्पवयीन मुलींचा यशस्वी शोध

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील चान्नी व पातुर पोलीस ठाणे हद्दीतील तब्बल सात अल्पवयीन मुलींचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले आहे. मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या मदतीने ही संयुक्त कारवाई करण्यात आली. जानेवारी २०२५ ते जुलै २०२५ दरम्यान मुलींच्या बेपत्ता होण्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

चान्नी पोलीस स्टेशन हद्दीतील पाच तर पातुर पोलीस ठाणे हद्दीतील दोन अशा एकूण सात अल्पवयीन मुली पळून गेल्याच्या घटना घडल्या होत्या. या प्रकरणी दाखल गुन्ह्यांचा तपास करून संबंधित मुलींचा शोध घेण्यात आला आणि त्या त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आल्या.

चान्नी पोलिसांनी २६ जुलै रोजी छत्रपती संभाजीनगर येथे धाड टाकून एका पीडित मुलीला व तिच्यासोबत




**मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष व पोलिसांची संयुक्त कारवाई**

असलेल्या २५ वर्षीय आरोपीला ताब्यात घेतले. पीडित मुलीच्या जबाबावरून पिंपरडोळी येथील आरोपीविरुद्ध बलात्कार व 'पॉक्सो' कायद्यानुसार गुन्हा वाढवण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

ही संयुक्त कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. चान्नी ठाण्याचे ठाणेदार रवींद्र लांडे, उपनिरीक्षक विजय घुगे, तत्कालीन उपनिरीक्षक संजय कोहळे, अनिल सोळंके, सुधाकर करवते, तसेच पातुरचे ठाणेदार हनमंत डोपेवाड, उपनिरीक्षक बंडू मेश्राम, संबोधी इंगळे आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष यांच्या संयुक्त प्रयत्नातून हे यश मिळाले.

**पालकांनी घ्यावी अधिक काळजी**

'पालकांनी सतर्क राहणे अत्यंत गरजेचे आहे. अल्पवयीन मुले-मुलींना मोबाईलपासून शक्यतो दूर ठेवावे. मुली शाळेत जात असताना त्यांच्यावर लक्ष ठेवावे. कोणी संशयास्पद व्यक्ती त्रास देत असल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा,'

**रवींद्र लांडे,**
ठाणेदार, चान्नी पोलिस ठाणे

## महाआरती उपक्रमामुळे समाज जागृती- हभप संजय महाराज

**अकोला :** महाआरती तथा संस्कार शिबिर उपक्रमामुळे समाजात सद्भाव निर्माण होऊन समाज जागृती होते. अशामुळे भक्तीभाव निर्माण होतो. हा भक्तिभाव योग्य संस्कारात रूपांतरित होऊन जीवनाला खऱ्या अर्थाने दिशा मिळते. अशा या महाआरतीची दुर्गम व आदिवासी बहुल भागात अत्यंत आवश्यकता असून वारकरी संप्रदायाने अशा परिसरातील मंदिरात सातत्याने महाआरतीचा कार्यक्रम घेऊन मोठी समाज जागृती निर्माण करण्याचा हितोपदेश जेष्ठ मार्गदर्शक व जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था आळंदीचे विश्वस्त हभप संजय महाराज पाचपोर यांनी केला. गायगाव रस्त्यावरील अग्रवाल फार्म हाऊस येथे श्री संत ज्ञानोबा तुकाराम बहुद्देशीय सेवा समितीच्या वतीने साप्ताहिक महाआरती चिंतन बैठक संपन्न झाली. बैठकीस राज्यातील कीर्तनकार व सेवाधाऱ्यानी उपस्थिती दर्शवीत प्रतिसाद दिला.

# महिला सक्षमीकरण शिबिरात महिलांना आरोग्य, व्यवसाय आणि कायद्याचे मार्गदर्शन

■ प्रतिनिधी | अकोला ■

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त जनविश्वास सप्ताह साजरा केला जात आहे. या सप्ताहाअंतर्गत अकोला येथे महिला सक्षमीकरण उपक्रमांतर्गत महिला आरोग्य, व्यवसाय व कायदा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.

महसूल कॉलनीतील रोकडे सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाचे आयोजन अकोला जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हाध्यक्ष सौ. प्रतिभा अवचार यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रवक्ते आ. अमोल मिटकरी हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हाध्यक्ष मोहम्मद बदरुज्जमा उपस्थित होते. तसेच पक्षाचे उपाध्यक्ष मदन भरगड, प्रदेश सचिव काशीराम साबळे, महिला सचिव संध्या वाघोडे, प्रदेश सचिव सौ. छाया कात्रे, सौ. सुषमा राठोड, जिल्हा महासचिव विकास पवार व सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश भाऊ खाडे यांची उपस्थिती होती.



या शिबिरात सौ. चोरे, डॉ. रूपाली पवार, ॲड. शुभांगी ठाकरे, डॉ. प्रीती कोकदे व प्रा. जयश्री नवलकर यांनी आरोग्य, कायदेविषयक बाबी, महिला सक्षमीकरण व व्यवसाय यावर मार्गदर्शन केले.

आ. अमोल मिटकरी यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, 'महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून विविध व्यवसाय उभे करून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे.

**जिल्हाध्यक्ष प्रतिभा अवचार यांचे आयोजन**

शासनाच्या विविध योजनांतून त्यांना सहाय्य मिळवून देण्यासाठी आम्ही नेहमी तत्पर आहोत. मार्केटिंग व विक्रीची व्यवस्था उभी करण्यासाठीही मदत केली जाईल.'

कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान आ. अमोल मिटकरी व जिल्हाध्यक्ष मोहम्मद बदरुज्जमा यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संध्याताई वाघोडे यांनी केले. शुभांगी तायडे व मनिषा राऊत यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचलन केले. यावेळी उमेदचे तालुका समन्वयक श्री. शेरेवार हे देखील उपस्थित होते. या शिबिराला महिलांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

## मारवाड़ी प्रेस गणेशोत्सव मंडळाची तयारी जोमात; संकष्टी चतुर्थीला झाले भूमिपूजन



■ प्रतिनिधी | अकोला ■

आपल्या ८९ वर्षात पदार्पण करणाऱ्या स्थानीय सावतराम चाल येथील मारवाड़ी प्रेस गणेशोत्सव मंडळाची तयारी जोमाने सुरू झाली आहे. सोमवारी संकष्टी चतुर्थी पर्वावर गणेशोत्सवाचे भूमिपूजन गणपती बाप्पा मोरयाचा गजरात मोठ्या भक्तिभावात संपन्न झाले. यावेळी पूजा अर्चना नरेंद्र भाला, विश्वनाथ शर्मा, नितिन चांडक व भूपेंद्र तिवारी यांनी केले. यावेळी मंडळाची नूतन कार्यकारिणी गठीत करण्यात आली. यात अध्यक्षपदी नितीन चांडक यांना घोषित करण्यात आले. या कार्यकारणीत

सचिव जतिन राठी, सहसचिव भरत तापडिया, उपाध्यक्ष निशांत भंसाली, अतुल मांडाणी, अंकेक्षक सागर हेडा, कोषाध्यक्ष विलास मोरे,

सदस्य अनिल बंग, चैलेश शाह, प्रमोद मालपाणी, संजय कलंत्री, प्रशांत चांडक, नकुल सोनी व सल्लागार म्हणून अनिल तापडिया, शरद चांडक, ब्रजेश तापडिया, सुशांत राठी, शैलेंद्र तिवारी, पंकज तापडिया, मनोज लड्ढा, भूपेंद्र तिवारी, सचिन चांडक, केशव खटोड, आर्कि अमित राठी, गोविंद लड्ढा, अमित भुतडा आदीचा समावेश करण्यात आला. यावर्षी गणेशोत्सव मंडळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पने वर आधारित पर्यटन स्थळे व ऑपरेशन सिंदूरची विहंगम झाकी साकार करणार आहे. या भूमिपूजन सोहळ्यात मूर्तीकार सुरेश अंबेरे, मंडपकर्ते बाबु बागडे, ध्वनिकार राजु चौधरी, मुन्नाभाई आदीचे स्वागत करून स्वागत प्रतिनिधिक स्वरूपात मंडप निर्माण कार्य प्रारंभ करण्यात आले. संचालन सचिन चांडक यांनी व आभार राम बाणाईत यांनी मानलेत. यावेळी कमलकिशोर तापड़िया, जगमोहन तापड़िया, राधेश्याम चांडक, प्रमोद कचोलिया, नितिन जाजू, आश्विन जाजू, संजय मंत्री, प्रमोद मालपानी, लूणकरण मालाणी, संतोष राठी, विशाल सारडा, डॉ तुषार चरखा, यश खत्री, पलक तिवारी, सुजल चांडक, राम लड्ढा, नारायण दुबे, विजय पनपालिया, विनीत बियानी, नरेंद्र राठी, नरेंद्र तापड़िया, लोकेश टावरी, अनंत बोदडे, आदी उपस्थित होते.

# डॉ. झाकीर हुसेन नगर परिषद शाळेत पालक सभा उत्साहात संपन्न

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

शुक्रवारी ता. २५ जुलै रोजी डॉ. झाकीर हुसेन नगर परिषद शाळेत पालक सभा उत्साहात पार पडली. या सभेच्या माध्यमातून शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांची प्रगती आणि शाळेच्या सर्वांगीण विकासावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या वेळी शाळेचे मुख्याध्यापक मोहम्मद शफीक यांनी शाळेच्या यशस्वी उपक्रमांची माहिती देत भविष्यातील विविध योजनांची



रूपरेषा पालकांसमोर मांडली. त्यांनी शाळेच्या प्रगतीत पालकांच्या सहकार्याचे महत्व अधोरेखित केले. शिक्षक इखलास अहमद यांनी विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व व्यक्तिमत्त्व विकासासाठी शिक्षक आणि पालक यांच्यातील समन्वयाची गरज स्पष्ट केली. प्रमुख पाहुणे हाफिज अबू बकर आणि हाफिज कौसर यांनी शाळेच्या कार्याची प्रशंसा करत विद्यार्थ्यांच्या नैतिक व शैक्षणिक उन्नतीसाठी पालकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

सभेत उपस्थित पालकांनी आपले अभिप्राय, सूचना व अडचणी मांडत शाळेच्या प्रगतीसाठी पूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले. ही सभा शाळा आणि पालक यांच्यातील संवाद सशक्त करणारी ठरली. सभेचे सुत्रसंचालन शिक्षक शकील एजाज यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक मोहम्मद शफीक, शिक्षकवर्ग, सर्व पालक तसेच प्रमुख पाहुणे हाफिज अबू बकर आणि हाफिज कौसर यांची उपस्थिती होती.

# सदाभाऊ खोत यांना राज्याचे कृषी मंत्री करावे

## रयत क्रांती संघटना युवती प्रदेशाध्यक्षा प्रिया राऊत यांची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

रयत क्रांती संघटनेचे संस्थापक व शेतकरी नेते माजी कृषी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांना राज्याच्या कृषी मंत्रीपदी नियुक्त करावे, अशी मागणी रयत क्रांती संघटनेच्या युवती प्रदेशाध्यक्षा प्रिया अक्षय राऊत यांनी केली आहे.

प्रिया राऊत म्हणाल्या की, 'सदाभाऊ खोत हे स्वतः शेतकरी, शेतमजूर व कामगार वर्गाचे प्रतिनिधित्व करणारे अभ्यासू नेते आहेत. त्यांनी कृषी राज्यमंत्री असताना राज्यभर दौरे करत शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेतल्या आणि त्या विधानसभेत मांडून उपाययोजना करण्याचा सातत्याने प्रयत्न केला. अधिवेशनातही शेतकरी विषयक मुद्द्यांवर त्यांनी प्रभावी भूमिका घेतली होती.'

'आज राज्यातील कृषी खाते अडचणीत असून अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या



हितासाठी आणि खात्याचे व्यवस्थापन प्रभावीपणे करण्यासाठी सदाभाऊ खोत यांच्यासारख्या अनुभवी व संवेदनशील नेत्याची गरज आहे. त्यामुळे त्यांना कृषी मंत्रीपदी विराजमान करून पुन्हा एकदा शेतकऱ्यांची सेवा करण्याची संधी द्यावी,' अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. राज्यातील शेतकरी, शेतमजूर व ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रश्न जाणणारा व त्या समस्यांवर ठोस उपाययोजना करणारा नेता म्हणून सदाभाऊ खोत यांचे नाव आजही विश्वासाने घेतले जाते.

# तपे हनुमान व्यायाम शाळेच्या कावड यात्रेच्या वाहनाची तोडफोड !

■ प्रतिनिधी | पातूर ■

पातुर येथील तपे हनुमान व्यायाम शाळेच्या कावड यात्रेची वाहनाची तोडफोड करीत चालकास जबर मारहाण करून शिवीगाळ करत आरोपिंनी रक्कम घेतल्याची तक्रार पातूर पोलिसात दाखल झाली आहे

प्राप्त माहितीनुसार, यश गाडगे(२१)रा. नानासाहेब नगर, पातूर हा युवक २२ जुलै रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास एमएच ३० डीडी ४२७६ क्रमांकाच्या वाहनासह मिलींद नगर चौक येथे गेला होता. त्यावेळी

**आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल**

अज्ञात इसमाने गाडी थांबवून तुझ्या गाडीच्या बाहेर ॲंगल आला असून त्याचा धक्का मला लागल्याचे सांगितल्याने बाजूला थांबविली असता, समीर बेग, आरिफ खान अमानुला खान आणि शेख अजीज शे कालु रा. पातूर या तिघांनी त्याच्या गाडीला आडवे जाऊन अडवले. अश्लील शिवीगाळकेली करून काठीने मारहाण केली. वादावादीतून तिघांनी त्याला जबरदस्तीने १ हजार रुपये घेतले. तसेच त्याच्या गाडीचे काच फोडल्यामूळे ४ हजार २०० रुपयांचे नुकसान करून, अश्लिल शिवीगाळ करीत मारहाण केली. हा प्रकार घडल्यानंतर पीडिताने थेट पातूर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. या प्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ११८(१), ११५, ३५२, ३२४, ४१३, व ३१५(३) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक हनुमंत डोपेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे

## राणी सती धाम मध्ये जल्लोषात झाला तीज उत्सव

**अकोला :** राजस्थानी समाजात सौभाग्याचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या श्रावण मासातील हिरवळीचा तीज उत्सव स्थानीय राणी सती धाम येथे हर्षोल्लासात संपन्न झाला. रविवारी संपन्न झालेल्या या महिला उत्सवात धाम येथे महिलांनी एकच गर्दी करीत झोपळ्यांचा आनंद घेतला. समितीच्या वतीने परिसरात ३१ झोपाळे निर्माण केले होते. उत्सवात परिसरात विविध साहित्याचे स्टाल लावण्यात आले होते. यावेळी महिलांनी आकर्षक व पारंपरिक वेषात उपस्थित होऊन अनेक रंगारंग कार्यक्रम करीत झोपाळ्यावर झोके घेत श्रावण मासातील गीत म्हणत आनंद व्यक्त केला. तर अनेक महिलांनी तीजचे महत्व सांगितले. यावेळी मातृशक्ती ने दादीची पूजा अर्चना केली. धामचे अध्यक्ष जगदीश बाछुका यांच्या अध्यक्षतेत संपन्न या तीज महोत्सवाच्या जगदीश बाछुका आदींनी मेहनत घेतली.

# पाच वर्षांपासून रोजगार हमी योजनेत भ्रष्टाचाराचा आरोप

## पातूर तालुक्यातील शेतक–यांची विभागीय आयुक्तांकडे तक्रार; १३ ऑगस्टपासून उपोषणाचा इशारा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

**पातूर तालुक्यातील रोजगार हमी योजनेत गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने भ्रष्टाचार होत असल्याचा गंभीर आरोप शेतकरी राजा ग्रुपचे अध्यक्ष रवी सोनोने, ज्ञानेश्वर गाडगे व अन्य शेतकऱ्यांनी केला आहे. २३ जून रोजी त्यांनी अमरावती विभागीय आयुक्तांकडे लेखी तक्रार सादर करत ही माहिती दिली.**

शेतकऱ्यांनी रोजगार हमी योजनेअंतर्गत स्वतःच्या शेतात वृक्ष लागवड केली होती. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून त्यांना वृक्ष संगोपनाचे देयक मिळालेले नाही. यासंदर्भात त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी केल्या असूनही प्रशासनाकडून कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. शेतकऱ्यांनी यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण देखील केले



होते, मात्र त्यानंतरही दोषींवर कोणतीही कारवाई न करता संबंधित अधिकाऱ्यांना पाठबळ देत त्यांची बदली करण्यात आली, असा आरोपही या तक्रारीतून करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, पातूर तालुक्यात गेल्या चार ते पाच वर्षांपासून रोजगार हमी योजनेत व्यापक स्वरूपाचा भ्रष्टाचार सुरु आहे. विशेषतः एपीओ, पीटीओ यांच्यावर कोणतीही शिस्तभंगात्मक कारवाई न करता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना पाठीशी घातल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. परिणामी, दोन वर्षांपासून वृक्ष संगोपन अनुदानापासून तालुक्यातील शेतकरी वंचित राहिले आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

**समिती गठीत करून चौकशीची मागणी :** शेतकऱ्यांनी विभागीय आयुक्तांकडे सादर केलेल्या तक्रारीत, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठीत करून मोका पाहणी करण्यात यावी आणि दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**१३ ऑगस्टपासून उपोषणाचा इशारा :** वृक्ष लागवड संगोपनाच्या देयकासाठी दोन वर्षांपासून लढा देणाऱ्या शेतकऱ्यांनी अखेर १३ ऑगस्टपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनिश्चितकालीन उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे. यापुढे विभागीय आयुक्तांकडून काय कारवाई केली जाते, याकडे आता पातूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २४२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# सततच्या पावसाने शेतीला आले तळ्याचे रूप

## पिके पडली पिवळी



**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून पावसाची जोरदार हजेरी असल्याने सर्व शेतांमध्ये पाणी साचले आहे. सोयाबीन, कपाशी, तूर ही पिके सतत पाण्यात असल्याने पिवळी पडायला लागली. पावसाने विश्रांती घेतली नाही तर पिके हाताची जातील, अशी भीती बळीराजा व्यक्त करीत आहे.

तब्बल १२ दिवसांची विश्रांती घेतल्यानंतर पावसाचे बुधवार, २३ जुलै रोजी आगमन झाले. त्या दिवसापासून आजपर्यंत गेले चार दिवस पावसाची परिसरात दमदार हजेरी आहे. धो-धो बरसणाऱ्या पावसामुळे शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले. ज्या शेतकऱ्यांची शेती खोलगट भागात आहे, त्यांच्या शेताला तळ्याचे रूप प्राप्त झाले आहे.

स्थानिक रहिवासी विनोद मारोतराव ढोमणे (४५) यांच्या संपूर्ण शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचले. परिणामी शेतात उभे असलेले पीक गेल्या कितीतरी दिवसापासून पूर्णपणे पाण्यात आहे. ही अवस्था विनोद ढुमणे यांच्या शेताची नाही तर इतरही काही शेतकऱ्यांच्या शेताची आहे. रस्त्याला लागून ज्यांची शेती आहे, त्यांच्या शेतात मोठ्या प्रमाणात पाणी आहे. गावनदीला लागून ज्यांची शेती आहे, त्यांच्या शेतात पाणी साचल्याने पिके केव्हाचीच संकटात आली आहे.

पावसाचे शेतात पडणारे पाणी वाहून जाण्याकरिता नाल्यांचा अभाव असल्याने अनेकांच्या शेतात विदारक परिस्थिती निर्माण झाली.

वायफळ, डोरली, लोणसावळी, धामणगाव, वाठोडा, दहेगाव (मिस्किन), कुरझडी या गावांतील शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने संकटाची स्थिती निर्माण झाली आहे. सुरुवातीला हलक्या स्वरूपाचा येणारा पाऊस नंतर उग्ररूप धारण करतो. अतिवेगात येणाऱ्या पावसामुळे अवघ्या काही वेळातच परिस्थिती बिघडते. गावाच्या परिसरात वाहणाऱ्या सर्वच नदी-नाल्यांना गेल्या चार दिवसांपासून पूरपरिस्थिती कायम आहे. या परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर हे शेतांमध्ये जाण्यास तयार होत नाही. अगोदरच नापिकी व कर्जबाजारीपणामुळे हताश झालेल्या अनेक शेतकऱ्यांनी यावर्षी कर्ज घेऊन पीक पेरणी केली. परंतू पावसाचा खंड राहिला; पण पीक समाधानकारक स्थितीत आले. आता तीच उभी पिके शेतांमध्ये साचलेल्या पाण्यामुळे नष्ट होणार असल्याची भीती परिसरातील शेतकऱ्यांच्या मनात आहे,

# गरज पडल्यास अमरावती, नागपूर येथे देखील शस्त्रक्रिया-आ.वानखेडे

## आर्वीत रुग्णांचा शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**वर्धा/जनमाध्यम**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्य सेवेची जबाबदारी घेतली आहे. मोफत आणि उत्तम दर्जाच्या आरोग्य सेवा देण्याचा संकल्प शासनाने केला आहे. पालकमंत्र्यांनी जिल्ह्याला मोतिबिंदू मुक्त करण्याचा संकल्प केला. प्रत्येकाला सुंदर जग पाहण्याची संधी या अभियानातून उपलब्ध होत आहे. पालकमंत्र्यांचा हा अतिशय कौतुकास्पद असा उपक्रम आहे. शिबिरात निदान झाल्यानंतर शस्त्रक्रियांची आवश्यक्ता असलेल्या रुग्णांवर गरज पडल्यास अमरावती, नागपूर येथे देखील शस्त्रक्रिया केल्या जातील, असे मनोगत आ.वानखेडे मोतिबिंदू विरहीत अभियान कार्यक्रमात बोलत होते,

यावेळी तालुक्यातील नागरिकांनी मोतीबिंदू विरहित अभियानास उत्कृष्ट प्रतिसाद दिला, या कार्यक्रमाला पालकमंत्री उपस्थित होते.यावेळी पालकमंत्री म्हणाले राज्यातील प्रत्येक नागरिकास विनामूल्य उत्तम दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे धोरण आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेली आयुष्मान भारत ही योजना तर क्रांतिकारी ठरली



आहे. जिल्ह्यात देखील नागरीकांना उत्तम आरोग्य सुविधा देण्यासाठी प्रयत्न केले जात असून त्यामुळेच मोतिबिंदू विरहीत अभियानासारखे उपक्रम राबविण्यात येत अस्याचे सांगितले.

मोतिबिंदू विरहीत वर्धा अभियानांतर्गत आर्वी येथे आयोजित मोतिबिंदू विरहीत आर्वी अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी पालकमंत्री बोलत होते. यावेळी आ.सुमित वानखेडे, अप्पर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, माजी खासदार सुरेश वाघमारे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुमंत वाघ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले, माजी नगराध्यक्ष प्रशांत सव्वालाखे, सुनील गफाट, संजय गाते, वैद्यकीय अधीक्षक डॉ.पुष्पक खवशी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.निलेंद्र वर्मा आदी उपस्थित होते.

जिल्ह्याला मोतिबिंदू मुक्त करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात मोतिबिंदू तसेच दंत व इतर आजारांची तपासणी व शस्त्रक्रिया केल्या जात आहे. वर्धा व हिंगणघाट नंतर आर्वी येथील हे तिसरे शिबिर आज पार पडले. माझ्या वाढदिवसानिमित्त बडेजाव न करता सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेची कामे करा, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते. त्यामुळे त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी जिल्ह्यात मोतिबिंदू विरहीत अभियान सुरू झाले. जिल्ह्यातील शेवटच्या मोतिबिंदू रुग्णावर शस्त्रक्रिया होईपर्यंत अभियान सुरुच राहील, असेही सांगितले.

आ.सुमित वानखेडे यांच्या नेतृत्वात आर्वी येथे आयोजित हे अभियान देखील तालुक्यातील हजारो रुग्णांना दिलासा देईल. या मतदारसंघात कारंजा आणि आष्टी येथे देखील असेच अभियान होणार आहे. जिल्ह्यात मोतिबिंदूच्या प्रत्येक रुग्णांचा शोध घेऊन त्यांच्यावर तज्ञ डॉक्टरांच्यावतीने मोफत शस्त्रक्रिया केल्या जातील. राज्य शासनाच्यावतीने महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना राबविली जात आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेल्या आयुष्यमान भारत योजनेतून ५ लाखापर्यंतचे उपचार, शस्त्रक्रिया विनामुल्य केल्या जात आहे. ज्या नागरिकांनी आयुष्मान भारत कार्ड काढले नसतील त्यांनी ते काढून घ्यावे, असे आवाहन देखील यावेळी पालकमंत्र्यांनी केले.

सुरुवातीस पालकमंत्री व आ.वानखेडे यांच्याहस्ते फित कापून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर त्यांनी रुग्ण तपासणी, औषध वितरण, चष्मे वाटप, आयुष्मान भारत व जनआरोग्य योजनेंतर्गत नोंदणी, रक्त व इतर आजारांच्या तपासणी कक्षाची पाहणी केली. यावेळी पालकमंत्र्यांनी स्वत:ची रक्तदाब तपासणी देखील करून घेतली. रुग्णांशी संवाद देखील साधला. यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात किसान विकास पत्र व चष्म्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुमंत वाघ यांनी केले. संचलन रविकांत बुरघाटे व गौरी बारहाते यांनी केले तर आभार गटविकास अधिकारी सुनिता मरस्कोल्हे यांनी मानले.

तपासणी शिबिरास रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आर्वी शहरातील सहकार मंगल कार्यालयाच्या सभागृहात आयोजित या शिबिरास तालुक्यातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सकाळी ९ वाजतापासून नोंदणीस सुरुवात झाल्यानंतर ठिकठिकाणी रुग्णांची गर्दी दिसत होती. आरोग्य अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आलेल्या प्रत्येक रुग्णांची नोंदणी करून तपासणी केली. शिबिरस्थळी तपासणीसाठी पुरुष व महिलांकरीता वेगवेगळी व्यवस्था करण्यात आली होती. दोनही ठिकाणी नोंदणीसाठी प्रत्येकी १० पथके लावण्यात आली होते.

# दारूच्या नशेत एकाची आत्महत्या

**वर्धा-** दारूच्या नशेत इसमाने स्वतःच्या घरीच गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुरांडे ले-आउट, आर्वीनाका येथे घडली. महेश गंगाधर उईके (३६) रा. बुरांडे ले-आउट असे मृतकाचे नाव आहे.महेशला दारूचे व्यसन होते. नेहमीप्रमाणे तो मद्यप्राशन करून घरी आला व पत्नीसोबत वाद घातला. पत्नीने हटकले असता तुला व मुलींना मारून टाकतो, असे म्हटले. यानंतर तो ड्युटीवर जातो, असे म्हणत दुचाकी घेऊन गेला. त्याच्या भीतीने पत्नी जया ही दोन्ही मुलींना घेऊन नातेवाईकांच्या घरी गेली. दुसऱ्या दिवशी तक्रार नोंदविण्याकरिता रामनगर पोलिसांकडे गेली. पोलिसांनी तिची तक्रार घेऊन तिला महिला तक्रार निवारण मंचात पाठविले. तेथून दूरध्वनी करण्यात आला पण महेश हा फोन उचलत नव्हता. त्यामुळे त्याची पत्नी घरी आली तेव्हा महेश याने घरी कुणीही नसताना गळफास घेत आत्महत्या केली असल्याचे उजेडात आले. याप्रकरणी रामनगर पोलिसांनी गुन्हा नोंद केला.

# मेघे विद्यापीठातील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखेचे आयोजन

## हेडेरा ब्लॉकचेन डेव्हलपर कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**वर्धा/जनमाध्यम**

वंगी येथील दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था अभिमत विद्यापीठातील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखा आणि स्कूल ऑफ अलाईड सायन्सेसद्वारे आयोजित हेडेरा ब्लॉकचेन डेव्हलपर कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हैदराबाद येथील इन्फॉर्मेशन डेटा सिस्टीम्स इन्कच्या सहकार्याने आयोजित या तीन दिवसीय कार्यशाळेत सुमारे २८० विद्यार्थी सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांना हेडेरा हार्शग्राफ या सुरक्षित, परिवर्तनीय व पर्यावरणपूरक तंत्रज्ञानावर आधारित ब्लॉकचेन विकासाची सखोल माहिती आणि प्रत्यक्ष अनुभव देण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेत वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक सुप्रिया बिस्वास, ब्लॉकचेन डेव्हलपर व प्रशिक्षक निकिता गुगले व सॉफ्टवेअर डेव्हलपर अक्षय रेड्डी यांनी विद्यार्थ्यांना सखोल प्रशिक्षण दिले. कार्यशाळेच्या समारोप समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. संदीप श्रीवास्तव लाभले होते. यावेळी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. के.टी.व्ही. रेड्डी, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. उत्कर्षा पाचारणे, विभागप्रमुख पालाश गौरशेट्टीवार, अलाईड सायन्सेसच्या शैक्षणिक अधिष्ठाता सुप्रिया नारड, उपसंचालक भुवनेश्वरी यांचा समावेश होता. डॉ. श्रीवास्तव यांनी विद्यार्थ्यांचा उत्साह, समर्पण आणि सहभागाचे कौतुक करीत आगामी काळात आरोग्य क्षेत्रात ब्लॉकचेनचा उपयोग करण्यासाठी मेघे अभिमत विद्यापीठात स्वतंत्र अद्ययावत केंद्र स्थापन करण्याचा मानस व्यक्त केला.

या कार्यशाळेसाठी कुलपती दत्ता मेघे, प्रधान सल्लागार सागर मेघे, कुलगुरू डॉ. ललितभूषण वाघमारे, कुलसचिव डॉ. स्वेता काळे पिसुळकर यांनी दिलेले मार्गदर्शन व सहकार्यासाठी डॉ. के.टी.व्ही. रेड्डी यांनी आभार मानले.

## संक्षिप्त

### दोन युवकांच्या तत्परतेने महिला सुखरूप

वर्धा- रेल्वेत चढताना हात घसरल्याने रेल्वेतून पडणाऱ्या महिलेला दोन युवकांनी तात्काळ मदत केल्याने महिलेचा जीव वाचला. ही घटना वर्धा रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर घडली.मिळालेल्या माहितीनुसार, रोअंश श्याम बेलखोडे (वय १९) आणि अंशुल सेटीया (वय १९) हे दोघे युवक मदतीकरिता धावून गेले. नागपूर कोल्हापूर एक्सप्रेस जाणारी रेल्वे वर्धा रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर थांबली होती. यावेळी एक महिला काही कामानिमित्त प्लॅटफॉर्मवर उतरली. परंतु रेल्वे सुरू झाल्यानंतर ती परत चढण्याचा प्रयत्न करीत असतांना तिचा हात स्लीप झाला आणि ती खाली पडण्याच्या स्थितीत आली. यादरम्यान प्लॅटफॉर्मवर उपस्थित रोहांश आणि अंशुल या दोघांनी धाव घेत महिलेला वाचवले.

### शेळीसह बोकड चोरी

**वर्धा-**अज्ञात चोरट्याने शेळीसह बोकड चोरून नेल्याने २० हजार रुपयांचे नुकसान झाले. ही घटना २५ जुलै रोजी उघडकीस आली. पुलगाव येथील शेख आसिद शेख रसिद यांच्या मालकीच्या गोठ्यातून बोकड आणि शेळी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे २५ जुलै रोजी सकाळी उघडकीस आले. याप्रकरणी तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### साटोडा शिवारातून दुचाकी चोरी

**वर्धा-**अज्ञात चोरट्याने साटोडा शिवारातील अपाजी धाबा परिसरातून दुचाकी लंपास केली. याप्रकरणी सावंगी (मेघे) पोलिसांनी गुन्हा दाखल केला. रवींद्र काशिनाथ तोडकर रा. दहेगाव, ह. मु. वर्धा यांनी एमएच ३२ यू ३८१५ क्रमांकाची दुचाकी अपाजी धाबा साटोडा चौक येथे उभी ठेवली होती. कंपनीतून काम करून परतल्यानंतर दुचाकी दिसली नाही. परिसरात शोध घेऊनही दुचाकी न मिळाल्याने याप्रकरणी तक्रारीवरून सावंगी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

### छोट्या व्यावसायिकास मारहाण

**वर्धा-**हातगाडीवर मक्याचे कनिस विक्री करणा-या छोट्या व्यावसायिकाला मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना वर्धा शहरातील साईमंदिर चौकात बॅचलर रोड परिसरात घडली. चेतन बालाजी धोंगडे रा. तेलीपुरा वर्धा असे जखमीचे नाव आहे. या प्रकरणी जखमी धोंगडे यांच्या तक्रारीवरून सुरज शिंदे नामक व्यक्तीवर वर्धा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### उभ्या कारला ऑटोची धडक

**वर्धा -** उभ्या कारला ऑटोने धडक दिली. यात कारचे मोठे नुकसान झाले. ही घटना पिपरी मेघे भागातील गोपाल नगर येथे घडली. या प्रकरणी प्रिया गोपाल लांडगे रा. गोपाल नगर पिपरी मेघे यांनी रामनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीवरून पोलिसांनी एम.एच. ३२ ए. के. ०३२६ क्रमांकाच्या ऑटो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. संबंधित ऑटो सुरज दीपक काकडे रा. आकोली ता. सेलू हा चालवित होता असे तक्रारीत नमुद असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### तरुणाची गळफास घेत आत्महत्या


**पुलगाव-**पोलिस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात येणा-या चोंडी ता. देवळी येथील रहिवासी कुणाल शरद मिठे (वय २२) याने राहत्या घरी गळफस घेत आत्महत्या केली. या प्रकरणी पुलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

# ४५ वर्षापासून श्री.संत गजानन महाराज पारायणाची परंपरा

**देवळी/जनमाध्यम**

सालोड येथील गजानन झित्रूजीं कामडी यांचे घरी दरवर्षी श्री संत गजानन महाराज २१ अध्याय पारायण श्रावण महिन्याच्या सुरवातीस सुरु केले जातात. विशेष म्हणजे या पारायणाला यावर्षी कोणताही खंड न पडता ४५ वर्ष पूर्ण होत आहे.

कामडी परिवाराची श्री संत गजानन महाराजांवार अगाध श्रद्धा असून ते गेल्या ४५ वर्षा पासून महाराजांची भक्ती करतात.गजानन कांमडी यांनी सांगितले की श्री गजानन महाराजांचे पारायण केल्याने आम्हाला शांती आनंद आणि सकारात्मक ऊर्जा मिळते. तसेच महाराजांच्या कृपेने भक्तांच्या जीवनातील अडचणी दूर होतात अशी श्रद्धा आहे. दरवर्षी हे पारायण केल्याने आम्हाला दुःखातून मुक्ती,अध्यात्मिक विकास, कामनापूर्ती, सकारात्मक विचार,व ज्ञान मिळते.महाराजांच्या कार्याचा व शिकवणीच्या बोध होतो.हे पारायण सात दिवसाचे असते यामध्ये दररोज तीन अध्याय वाचन केले जाते.शेवटच्या दिवशी प्रसादाचे आयोजन केले जाते. यादरम्यान परिसरातील बरेच भाविक पारायणाला येत असतात. व तेही मोठ्या भक्ती भावाने याचा लाभ घेतात. ही परंपरा एका पिढी



कडून दुसऱ्या पिढीतही मोठ्या आनंदाने व भक्तीभावाने अविरत सुरु असून यातून कामडी परिवाराने आधात्मिक वारसा जपत श्री संत गजानन महाराज वरील आपली भक्ती व श्रद्धा कायम मनात कोरली आहे.

# ट्रकवर कार आदळली, एक जखमी

**वर्धा**-भरधाव कार समोरून येणाऱ्या ट्रकवर आदळून झालेल्या अपघातात एकजण जखमी झाला. हा अपघात पुलगाव शिवारात समृद्धी महामार्गावर झाला. अयान शेख रा. मुंबई असे जखमीचे नाव आहे. अजमी खान अश्रफ खान (२८) रा. मुंबई हे त्यांची पत्नी महक खान, मित्र अयान शेख, जुनेद मोहम्मद शेख हे मुंबईवरून नागपूर येथे समृद्धी महामार्गाने एमएच ०५/५५५३ क्रमांकाच्या कारने जात होते. अयान शेख हा कार चालवित होता. त्याच्या कारच्या पुढे एमएच ३६ एए २६२९ या क्रमांकाचा ट्रक नागपूरकडे जात होता. या ट्रकची अचानक स्पीड कमी झाल्याने भरधाव कार ट्रकवर आदळली. यात अयान शेख जखमी झाला. अपघात होताच ट्रकचालक घटनास्थळावरून पसार झाला.

# विदर्भ विभागीय मच्छीमार संघावर अशोक मोरे अविरोध

**हिंगणघाट/जनमाध्यम**

मत्स्य सहकार महर्षी,माजी खासदार स्वर्गीय जतीरामजी बर्वे यांच्या प्रेरणेतून स्थापन झालेल्या विदर्भ विभागीय मच्छीमार संघाच्या संचालक पदावर हिंगणघाट येथील बाला भोई मत्स्य व्यावसायिक सहकारी संस्थेचे अध्यक्ष अशोक मोरे यांची बिनविरोध निवड झाली आहे.विदर्भातील विविध मच्छीमार संस्था या संघाच्या सदस्य आहेत. या महत्त्वपूर्ण निवडणुकीत अशोक मोरे यांची बिनविरोध निवड झाल्याने त्यांच्या कार्यावर आणि नेतृत्वावर विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.



अशोक मोरे यांच्या निवडीमुळे विदर्भातील मच्छीमार बांधवांच्या हितासाठी आणि मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठी नवीन ऊर्जा मिळेल अशी आशा व्यक्त केली जात आहे. या निवडीबद्दल माजी न्यायाधीश चंद्रलाल मेश्राम, प्रभाकर मांढरे, प्रकाश डायरे (नागपूर), मधुकर बावणे, चंद्रशेखर दाते, धर्मदास गाढवे, सुभाष कोल्हे, रामकृष्ण मोरे, आशीष सुरजूसे, लक्ष्मण कापटे, अनिल ढाले, प्रदीप बावणे आणि संस्थेतील सर्व सभासदांनी अशोक मोरे यांचे अभिनंदन केले आहे.

# बोरगाव रस्त्यावरील खड्डा देतो अपघातास निमंत्रण

**साहूर/जनमाध्यम**

बोरगाव साहूर रस्त्यावर आढाऊ नाल्यावरील फुलावर रस्त्याच्या मध्यभागी भला मोठा खड्डा पडला असून या खड्डुयामुळे वाहतूक ठप्प झाली आहे. मागील वर्षीही अगदी याच ठिकाणी खड्डा पडला होता. परंतु बांधकाम विभागाकडून हा खड्डा त्यावेळी थातूरमातूर बुजवण्यात आल्याने पुन्हा यावर्षी पाऊस येताच त्याच ठिकाणी खड्डा पडल्याने वाहतुकीस अडचण जात आहे. या रस्त्यावरून नेहमीच शेतकरी नागरिकासह विद्यार्थ्यांना ये-जा करावी लागते. चार-पाच दिवसापासून सतत पाऊस सुरू असल्याने पावसामुळे अढाऊ नाल्यावर मध्यभागी मोठा खड्डा पडला असल्याने या पुलावरून वाहतुकीस अडथळा निर्माण झाला. असून या खड्डुयाची तडकाफडकी दुरुस्ती करून पुलाची उंची वाढवावी अशी मागणी साहूर बोरगाव वडाळा येथील नागरिकांनी केली आहे.

सदर आढाऊ नाल्यावरील आधीच पुलाची उंची व रुंदी कमी आहे. त्यात या नाल्यावर मध्यभागी खड्डा पडल्याने बैलबंडीसह फोर व्हीलर वाहनास अडचण निर्माण झाली आहे. मात्र या रस्त्याकडे बांधकाम विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष असून ते नागरिकांच्या जिविताशी खेळत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. नेहमीच या रस्त्याची व आढाऊ नाल्यावरील पुलाची समस्या कायम असून पावसाळ्यात शेतकरी विद्यार्थी वृद्धांना याच पुलावरून जीवघेणा



प्रवास करावा लागतो. सततच्या पावसामुळे या पुलाच्या दोन्ही कडा खचल्या असून या नाल्यावर मध्यभागी खड्डा पडल्याने या नाल्यावरील वाहतूक प्रभावित झाली आहे. या ज्वलंत समस्येकडे लोकप्रतिनिधीसह बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी अक्षम्य दुर्लक्ष केल्यामुळे नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला आहे.

गावाशेजारी अनेक जुने छोटे पुल आहे. या पुलावरून पुढील गावांचा मार्ग जोडलेला आहे. आढाऊ नाल्यावरील पुलावरून सुद्धा पुढे बोरगाव वर्धपुर सत्तरपुर वडाळा झाडगाव टूमनी इत्यादी गावाचा मार्ग जोडलेला आहे. या पुलावरून नेहमी या गावातील नागरिकासह विद्यार्थी व शेतकऱ्यांची ये-जा असल्यामुळे संबंधित बांधकाम विभागाला या पुलाची उंची व रुंदी वाढविण्यासाठी वारंवार लेखी व तोंडी सूचना दिल्या आहेत मात्र अद्यापही या पुलाची व बोरगाव साहूर रस्त्याची समस्या कायम असल्यामुळे पावसाळ्यात मोठी पंचाईत होत आहे. पावसाळ्यात थोडा जरी पाऊस आला की या पुलावरून पाणी वाहते परिणामी नागरिकांना पाणी ओसरण्याची वाट पाहावी लागते.

पलीकडच्या गावातील विद्यार्थी शिक्षणासाठी साहूर आष्टी येथे येतात. पण पावसाळ्यात याच पुलावर पाणी असल्यास विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. याबाबत बोरगाव वडाळा येथील ग्रामस्थांनी शासन प्रशासनाला वारंवार लेखी निवेदन देऊनही याकडे दुर्लक्ष केले जात आहे. पाऊस जास्त प्रमाणात आला की प्रचंड पाण्याचा प्रवाह या पुलावरून वाहतो ही बाब शेतमजूर नागरिक विद्यार्थी व शेतकऱ्यासाठी नित्याची व जोखमेची झाली आहे. परिणामी नागरिकांना जिवघेणा प्रवास या पुलावरून व रस्त्यावरून करावा लागत असल्यामुळे नागरिकात रोष निर्माण झाला आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक २४३**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# अंजनगाव बसस्थानक परिसरात ऑटोचालकांची वाढली मुजोरी

## बसस्थानाकात ऑटो नेऊन भरतात प्रवाशी;कारवाई केली तर करतात हुज्जत



**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

बसस्थानक परिसरात अवैध प्रवाशी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून यात ऑटो धारक चालक तर स्थानाकाच्या गेट वर ऑटो प्रवाशी भरण्यासाठी उभी करतात तर काही ऑटो वाले तर थेट बस स्थानाकात जाऊन प्रवाशी ऑटोत भारतात कोणी त्यांना हटकले तर ते हुज्जत घालतात यावर पोलिसांनी कडक करावी करण्याची गरज निर्माण झाली असून बस स्थानकाच्या संरक्षण भिंतीलागत महिनो गिनती उभे राहत असलेल्या ऑटोवर सुद्धा कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे

रविवारी (ता.२७) बस स्थानाकाच्या आत तीन ते चार ऑटो प्रवाशी भरत असतांना ट्रॅफिक पोलिसांना दिसले त्यांनी हटकताच दोन ऑटो लगेच पडून गेले व एक ऑटो पोलिसांच्या हाती लागला त्याला कारवाई साठी पोलिसाने थांबवले असता परिसरातील पंधरा ते विस ऑटोवाले जमा झाले व पोलिसांशी हुज्जत घालू लागले नेमक्या यावेळी या ठिकाणी उपस्थित असलेल्या पत्रकाराने त्यांचा फोटो काढला तेव्हा हे ऑटोवाले त्या पत्रकारांशी हुज्जत घालू लागले तू आमचा फोटो का काढला असे बोलू लागले गरमागरमी वाढली असतांना पोलिसांनी कारवाई करत ऑटो कारवाई करण्यासाठी थेट पोलीस स्टेशन मध्ये नेला अश्या अवैध प्रकारावर नित्याने कारवाई अपेक्षित असून मुजोर ऑटोवाल्यांच्या मुसक्या आवळने गरजेचे असल्याचे मत अनेकांकडून व्यक्त केल्या जात आहे

> बसस्थानाकात अवैध रित्या प्रवाशी भरणाऱ्या ऑटोचालकावर करावी केली असून या भागात आता यापुढे जातीने लक्ष ठेवायला सांगितले असून स्थानकाच्या गेटवर उभी राहणारी ऑटो व रस्त्याच्या मधोमध ऑटो उभी करून प्रवाशी भरणाऱ्यांवर कडक करावी करण्यात येईल
>
> **सुरज तेलगोटे**
> **पोलीस निरीक्षक, अंजनगाव सुर्जी**

### ऑटोवाल्यांनी बनवला पार्किंग झोन

बस स्थानकाच्या संरक्षण भिंतीलागत मुख्य मार्गावरील फुटपाथ वर महिनोगिनती काही ऑटो एकाच ठिकाणी उभे केलेले असून यामुळे नागरिकांना रस्त्यालागत पायी चालण्याची वाट या ऑटो पार्किंग च्या घशात गेली असल्याचा प्रकार येथे होत असून त्या उभ्या असलेल्या ऑटो समोर ऑटोचालक मुख्य रस्त्यावर ऑटो उभे करून प्रवाशी भरतात यावर आणि जे ऑटो महिनोगिनती या सार्वजनिक परिसरात उभे आहेत यावर पोलिसांनी तातडीने कारवाई करण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे

## शामराव संभे यांचे निधन

**मालखेड (रेल्वे)-** येथील जेष्ठ नागरीक शामराव देवाजी संभे यांचे वयाच्या ९६ व्या वार्षी (दि.२७) सकाळी ६ वाजताच्या सुमारास अल्पशा आजाराने आज निधन झाले. त्याच्या पश्चात चार मुले, एक मुलगी व नातूपंतू असा बराचसा आप्त परिवार आहे. त्याच्यावर हिंदू स्मशानभूमी मालखेड रेल्वे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



### पी. आर. पोटे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटमध्ये

# कॉम्प्युटर सायन्स विभागाच्या फोरम स्थापनेचा सोहळा

**अमरावती/ का.प्र.**

पी. आर. पोटे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती येथील कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागात फोरम स्थापनेचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन विभागामार्फत विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, तांत्रिक कौशल्ये, संघटनकौशल्य, तसेच करिअर विकासासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. जवंधिया होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. मोहम्मद जुहैर, अकॅडेमिक डीन डॉ. डी. ए. शहाकर, कॉम्प्युटर सायन्स विभागप्रमुख डॉ. व्ही. बी. गडिचा, आणि अकॅडेमिक कोऑर्डिनेटर प्रा. एम. एस. बुरंगे हे मान्यवर मंचावर उपस्थित होते.फोरम स्थापनेच्या या कार्यक्रमाचे संयोजन विभागातील फोरम समन्वयक प्रा. पी. एन. उमेकर व प्रा. एस. एच. इंगळे यांनी केले. त्यांनी यशस्वी



नियोजनाद्वारे संपूर्ण कार्यक्रम प्रभावीपणे पार पाडला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर प्रास्ताविकात फोरम स्थापनेचा हेतू व उद्दिष्टे स्पष्ट करण्यात आली.

कार्यक्रमात नव्याने निवडलेल्या फोरम सदस्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष तसेच विविध तांत्रिक, सांस्कृतिक व साहित्यिक समित्यांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा समावेश होता. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक नवीन आत्मविश्वास निर्माण झाला.प्राचार्य डॉ. पी. एम. जवंधिया यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी तांत्रिक शिक्षणाबरोबरच नेतृत्व आणि सर्जनशीलतेचा विकास करण्याचे आवाहन केले. तसेच अशा फोरम उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळते, हे त्यांनी अधोरेखित केले.संचालन प्रा. एस. एच. इंगळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. पी. एन. उमेकर यांनी मानले.

## श्री संत महादेव महाराज यांचा ३४ वा पुण्यतिथी उत्सव

**मोर्शी/ वार्ताहर**



लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री संत महादेव महाराज उर्फ निर्भय बाबा यांचा ३४ वा पुण्यतिथी उत्सव सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या श्रीक्षेत्र सालबर्डी येथे संत महादेव महाराज संस्थानमध्ये २७ जुलै ते ३ ऑगस्ट दरम्यान मोठ्या उत्साहाने साजरा होत आहे.या पुण्यतिथी महोत्सवानिमित्ताने भव्यदिव्य अशा पक्क्या सभा मंडपामध्ये भागवत कथाकार व कीर्तनकार ह.भ.प. युवाचार्य श्री.संतोषजी महाराज आढावणे समर्पण आश्रम भोकरदन जि.जालना यांचा भागवत कथेचा कार्यक्रम २७ जुलै ते २ ऑगस्टपर्यंत संपन्न होणार आहे.

२७ जुलै रोजी संत महादेव महाराज संस्थान सालबर्डीचे अध्यक्ष वामनरावदादा वासनकर यांच्या हस्ते तीर्थस्थापना होणार असून दैनंदिन कार्यक्रमांमध्ये रुक्मिणी महिला भजन मंडळ पाळा,मॉ भगवती महिला भजन मंडळ, माऊली महिला भजन मंडळ मोर्शी,श्री समर्थ रामजीबाबा भजन मंडळ मोर्शी,शारदा महिला भजन मंडळ नया वाठोडा,गजानन माऊली महिला भजन मंडळी हिवरखेड,जय गजानन महिला भजन मंडळ खानापूर यांच्या भजनाच्या कार्यक्रमानंतर दि.२ ऑगस्ट रोजी भागवत कथेचा समारोप होणार असून ३ ऑगस्ट रोजी वाणीभूषण ह.भ.प.युवाचार्य श्री संतोषजी महाराज आढावणे यांचे काल्याच्या कीर्तनानंतर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.११ऑगस्ट रोजी प्राक्षाळ पूजा व प्रसाद विपुल भडांगे मोर्शी तर्फे १८ ऑगस्ट रोजी शारदा वारकरी महिला भजन मंडळ खानापूर यांचा भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

### रवींद्र गुल्हाने यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित

# शिबिरात ६१ रक्तदात्यांनी बजावला हकक



**मोर्शी/ वार्ताहर**

शिव कावड यात्रा मित्र परिवारातर्फे न.प.चे माजी बांधकाम सभापती रवींद्र गुल्हाने यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदाता संघ मोर्शी तर्फे आयोजित अग्रवाल कॉम्प्लेक्स येथे पार पडलेल्या रक्तदान शिबिरात ६१ रक्तदात्यांनी रक्तदान करून मोलाचे सहकार्य केले.यावेळी प्रत्येक रक्तदात्यास भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

जिल्ह्यामध्ये रक्तदान शिबिरे कमी होत असल्यामुळे रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. या गंभीर समस्येची दखल घेत नगरपरिषदेचे माजी बांधकाम सभापती रवींद्र गुल्हाने यांच्या मित्र परिवारातर्फे शिव कावड यात्रेचे औचित्य साधून या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिवकावड यात्रेच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन ६१ बॉटल रक्तदान संकलित केले. याप्रसंगी रक्तदाता संघाचे अध्यक्ष डॉ.प्रदीप कुऱ्हाडे, कोषाध्यक्ष डॉ.प्रमोद पोतदार,कार्याध्यक्ष मिलिंद ढोले, सचिव गजानन हिरुळकर,सहसचिव अजय पाटील यासह राजू साठवणे, योगेश गणेश्वर, नितीन उमाळे, नितीन पन्नासे, सुमित अग्रवाल उपस्थित होते. यावेळी रक्त संकलनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ.राहुल खराटे, योगेश पानझडे, संगीता गायधने, स्वाती बुरंगे, जयवंत गावंडे, प्रवीण कळसकर, रेश्मा बहुरूपी उपस्थित होते. रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी राजू बिजवे, राजू श्रीराव,नितीन बरघट, गोलू ढोले, अनिकेत काळे, धीरज एकोतखाणे, धनंजय गोहाड, सचिन तायवाडे, राजेश खडागडे, स्वयंम श्रीवास, आशिष गुल्हाने, मयूर देशमुख, मनोज खंडारे, पवन मामुरकर, जीवन फंदे, अक्षय गावंडे, मुकेश आसोलकर, विलास तायवाडे, आकाश शिंदे, अक्षय उमक, गौरव राऊत, तुषार शिंगाने, गोलू गुल्हाने, अंकीत शिरभाते, कमलेश बरडे इत्यादी कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

## डॉ. नरेंद्र भिवापुरकर अंध विद्यालयाचा वर्धापन दिन

**अमरावती**-दि. ब्लाईड वेलफेअर असोसिएशन अमरावती व्दारा संचालीत डॉ. नरेंद्र भिवापुरकर अंध विद्यालय अमरावती व आश्रीत अंध विद्यालय ५९ व्या वर्धापन दिन समारंभाप्रसंगी आयोजित कार्यक्रमात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. डॉ. मदनगोपाल, संस्थापक सचिव स्व. अॅड सुंदरलाल श्रीवास्तव, कोप्याध्यक्ष स्व. श्री. आवासाहेब देवस्थळे यांच्या प्रतिमेचे पुजन व हारार्पन करुन कार्यक्रमाचे उदघाटन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन प्रादेशिक उपायुक्त माया केदार, दिनेश गायकवाड डॉ. अनुराधा तोटे ज्ञानबा पुंड, डॉ. गोविंद कासट, प्रविण मालपाणी,सुनिल सरोदे, धनंजय नाकील,रतन कांबळे, मुख्याध्यापक नवनाथ इंगोले, पंकज मुदगल इत्यादी च्या उपस्थितीत १० वी १२ वी मध्ये गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना भेटवस्तु देवुन मान्यवराच्या हस्ते गौरविण्यात आले.

# गुणवंत विद्यार्थीच घडविणार उद्याचा उत्तम समाज- आ.सुलभा खोडके

### उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य कार्यक्रम

**अमरावती/ का.प्र.**

दहावी व बारावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी मिळविलेले सुयश हे त्यांच्या जिद्द चिकाटी व मेहनतीचे फलित आहे. आता त्यांना उच्च शिक्षणाची कास धरून पुढील ध्येय गाठायचे आहे. विद्यार्थ्यांसमोर आज जरी अनेक आव्हाने असली तरी शिक्षणासाठी लागणाऱ्या शैक्षणिक सोयी, संधी तसेच प्रगत,अद्यावत व तांत्रिक बाबी उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांना कोणतेही लक्ष्य गाठणे कठीण नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता अबाधित राखून अथक



प्रयत्न करीत प्रत्येक संधीच सोने करून आपल्या स्वप्नांना आकार द्यावा,असे स्फूर्तिदायी मनोगत आ.सुलभा खोडके यांनी व्यक्त केले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शोध प्रतिष्ठान, अमरावती अध्यक्ष - यश खोडके यांच्या अभिनव संकल्पनेतून मोर्शी रोड स्थित संत श्री ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी व्यासपिठावर आ. सुलर्भा खोडके, महाराष्ट्र राज्य विधानपरिषद सदस्य -आ.संजय खोडके, मोटिव्हेशनल स्पीकर अनिरुद्ध पाटील. राज्य शिक्षक संघाचे अध्यक्ष-दिलीप कडू, आयटीआय निदेशक संघटनेचे -भोजराज काळे , शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष यश खोडके, मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी -ललित चौधरी,प्रवीण दिवे, प्रदीप नानोटे, माजी नगरसेवक प्रशांत डवरे,अविनाश मार्डीकर, माजी महापौर रिना नंदा, सपना ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता माता सरस्वती देवी यांच्या प्रतिमेस वंदन-नमन- पूजन-माल्यार्पण व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी संततधार पाऊस सुरु असतांनाही जवळपास दोन हजार विद्यार्थी व पालकांच्या उपस्थित होते.आई -वडिलांच्या कष्टाची जाण ठेवून विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच सुसंस्कृत होऊन त्यांचा सन्मान वाढवावा असे आवाहन सुद्धा प्रसिद्ध वक्ता अनिरुद्ध पाटील यांनी केले. यावेळी विद्यार्थी,पालक, शिक्षक वृंद तसेच सर्व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### नाम चिंतन हे प्रभावी साधन हभप आशिष महाराज चटप



**कुऱ्हा-**श्री तिर्थक्षेत्र कौंडण्यपूर येथील श्री विठ्ठल रूक्मिणी संस्थान मध्ये २३ जुलै पासून सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व श्रीमद् भागवत कथा यानिमित्त हभप आशिष महाराज चटप पांढुर्णा मध्यप्रदेश यांचे किर्तनातून नाम चिताने कलीयुगामध्ये मनुष्य जातीचा उद्धार होतो तो देवाला प्राप्त करण्याकरिता नाम चिंतन हे प्रभावी साधन आहे असे किर्तनाव्दारे आपल्या वाणीतून व्यक्त केले.व्यासपीठ नेतृत्व हभप एकनाथ महाराज कोष्टी (मृदुंगालकार श्री क्षेत्र आळंदी) तसेच भागवत कथा प्रवक्ते हभप भास्कर महाराज गोंदिकर देव देवता पुजन हभप पंकज महाराज महल्ले कौंडण्यपूर तसेच कार्यक्रमाचे संयोजक हभप गजानन महाराज नरोडे (भिवगांवकर) श्री विठ्ठल रूक्मिणी संस्थानचे अध्यक्ष व विश्वस्त तसेच सर्व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कारगील विजय दिवस



**कुऱ्हा-**येथील हिंदू युवा एकता मित्र परिवारातर्फे कु-हा पोलिस ठाण्यासमोरील हनुमान मंदिरात साप्ताहिक महाआरती प्रसंगी कारगील विजय दिवस साजरा करण्यात आला.याप्रसंगी ज्या जवानांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.आपल्या देशाला विजय मिळवून दिला त्या सर्व शहीदांना पांच मिनिटे मौन पाळून आदरांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी हिंदू युवा एकता मित्र परिरार अंकुश इंगोले कैलास दमाये सूरज राठोड प्रभाकर भोयर, गौरव डहाके दीपक राऊत, महेश चैले, कर्मयोगी फाउंडेशन तीवसा तालुका जिल्हाध्यक्ष. नागेश लुटेअंकुश सुने, स्वप्निल इंगोले, रोशन राऊत, नयन सारवे, कमलेश चिरडे, करण चीरडे, बाबूलालजीं सुने, राहुल मानकर, पंकज दारोकार, रोशन बावणे, भीमरावजी मानकर, निरंजन भोयर, ऋषिकेश कुराडे, गौरव इंगोले, अक्षय सुरसाऊत, सारंग वसुले, मोहन ठोंबरे, हर्षल दारोकार, सचिन निस्ताने, राज क्षीरसागर, यश निस्ताने, सौरव दारोकार, अजय चिरडे, चंदन बंगरे तसेच दिशा लुटे, विकी लुटे, आरोही मेश्राम, रिया लुटे, अनिरुद्ध मेश्राम, भावेश भोयर चिमुकल्यांसह कारगिल विजय दिवस हिंदू युवा एकता मित्र परिवारा तर्फे साजरा करण्यात आला.

### श्रावण महिन्यानिमित्त हरीपाठ



**चांदुर रेल्वे-**श्रावण महिन्यानिमित्त श्रद्धेचा आणि भक्तीचा माहोल जपत विक्रांत हाउसिंग सोसायटी, पात्रीकर कॉलनी, गजानन कॉलनी येथील हनुमान मंदिर व शिव मंदिरात हरीपाठाचा कार्यक्रम भाविक वातावरणात पार पडला.

या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन समस्त रहिवाशांच्या पुढाकारातून करण्यात आले होते. ह. भ. प. प्रमोद महाराज देशमुख (निंभेकर, विणावाले) यांच्या मार्गदर्शनाखाली हरीपाठ करण्यात आला. या वेळी ह. भ. प. दिगांबर दुबे, मनोजभाऊ परडके, राजू मोधळे, रामभाऊजी निस्ताणे, नरेंद्र महाराज घोडे (बग्गीकर), रामेश्वर राजनेकर, राठोड साहेब, गाढवे साहेब बालमृदंगाचार्य यांनी सहभाग घेतला.महिलावर्गातून अरुणाताई दुबे , झाडे ताई, चित्रे ताई, कदम ताई, कलावटे ताई यांनी भक्तिपूर्वक सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाला परिसरातील अनेक गावकरी, महिला भगिनींनी उपस्थिती लावली होती.कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत भक्तिभावाने पार पडले असून, परिसरात धार्मिकतेचे स्फुरण पसरले. उपस्थितांचे सामूहिक स्वरूपात गायन व नामस्मरण भक्तिभावाने झाले.

### 'सहयोग'तर्फे ठिकठिकाणी वृक्षारोपण

**चांदूल रेल्वे-**सहयोग मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटिव्ह सोसायटी, चांदूर रेल्वे तर्फे 'चला झाडे लावुया' या मोहीमेंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम शहरात उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमात शहरातील नागरिकांनी, शालेय विद्यार्थ्यांनी आणि स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनी उत्साहाने सहभाग घेतला.

परिसरातील ग्रामिण रूग्णालय, शाळा - कॉलेज, मूकबधिर विद्यालय, नगरपरिषद, पंचायत समिती, विश्रामगृह आणि मोकळ्या जागेत विविध प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आली. यात पिंपळ, वड, जांभूळ, कडुलिंब, करंज, गुलमोहर अशा वृक्षांचा समावेश होता. शालेय विद्यार्थ्यांनी 'झाडे लावा, झाडे जगवा, पर्यावरण वाचवा' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. या कार्यक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण झाली असून, वृक्षारोपण आणि संवर्धनासाठी सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. याप्रसंगी शाखा व्यवस्थापक ऋतुजा ठाकरे व सर्व कर्मचारी तसेच शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

## मद्यपी डॉक्टरचा प्रताप:

# न तपासता रुग्णास केले मृत घोषित

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** विषबाधा झालेल्या रूग्णास न तपासताच मृत घोषित केल्यानंतर शवविच्छेदनाची तयारी सुरू असताना रुग्णाने हालचाल केली. त्यानंतर त्या रुग्णास यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. आता या रुग्णाची प्रकृती सुधारत आहे. ही खळबळजनक घटना दारव्हा येथील उपजिल्हा रुग्णालयात घडली. मद्यप्राशन करून कर्तव्य बजावणाऱ्या डॉक्टरच्या कारनाम्यामुळे हा प्रकार घडल्याचे समोर आले. दारव्हा तालुक्यातील गोरेगाव येथील विषबाधा झालेल्या एका रुग्णाला दारव्हा उपजिल्हा रुणालयात उपचाराकरीता आणण्यात आले.



त्यावेळी सेवेत असलेल्या डॉक्टरने कोणतीही प्राथमिक तपासणी न करता रुग्णाचा मृत्यू झाल्याचे सांगितले व डेथ मेमो तयार करून शवविच्छेदन करण्याची तयारी सुरू केली. रूग्णाच्या नातेवाईकांना हा प्रकार जरा संशयास्पद वाटत होता. मात्र, डॉक्टरने रुग्णाला शवविच्छेदन गृहाकडे नेण्याच्या हालचाली सुरू केल्या. त्याच दरम्यान रुग्णाने हलचाल केली.

डॉक्टरच्या वागण्यामुळे तो नशेत असल्याचा संशय नातेवाइकांना आला. त्यांनी डॉक्टरला रूग्णाची पुन्हा तपासणी करण्यास सांगितले, तेव्हा रूग्ण जिवंत असल्याचे आढळले. त्यामुळे घाबरलेल्या डॉक्टरने 'डेथ मेमो' फाडून तातडीने रूग्णाचे 'रेफर पेपर' तयार केले. या प्रकाराने नातेवाईक चांगलेच संतापले होते. मात्र, रूग्णाची प्रकृती बघता त्याला तातडीने यवतमाळ येथे उपचाराकरीता आणण्यात आले. या रुग्णाला यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले असून येथे रूग्णाची प्रकृती सुधारत असल्याचे त्याच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितले. दारव्हा रूग्णालयातील हा प्रकार उपजिल्हा रूग्णालयाचे अधीक्षक डॉ.राजेश मनवर यांना कळताच त्यांनी तातडीने रूग्णालयात पोहचून घटनेची माहिती घेतली. त्यानंतर संबंधित डॉक्टरला नोटीस बजावली. जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या कानावरही हा प्रकार घालण्यात आला. रूग्णाच्या जीवन मरणाशी खेळ करणाऱ्या त्या डॉक्टरवर कठोर कारवाई करण्याची मागणी नातेवाईकांनी केली आहे. डॉक्टरला नोटीस बजावण्यात आली असून ☞(पान २ वर)

# फासेपारधी समाजाकडून आमदार सोनवणेंच्या निषेधार्थ रास्ता रोको

## प्रतिमेला चपलेने मारून व्यक्त केला निषेध

**अमरावती/प्रतिनिधीः-** फासेपारधी, रामोशी समाजाबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याबद्दल फासेपारधी बांधवांनी आणि मुलांनी शिंगणापूर फाटा येथे आमदार शरद सोनवणे यांच्या निषेधार्थ रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी शरद सोनवणे यांच्या प्रतिमेला चपलेने मारत निषेध व्यक्त केला. शरद सोनवणे यांची आमदारकी रद्द करा, अशी मागणी श्री दादाजी आदिवासी फासेपारधी समाज संघटनेचे अध्यक्ष मतीन भोसले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. जुन्नरचे अपक्ष आणि शिंदे शिवसेनेचे सहयोगी आमदार शरद सोनवणे यांनी तीन दिवसांपुर्वी त्यांच्या मतदारसंघात चोऱ्या होत असून, त्या चोऱ्या फासेपारधी आणि रामोशी करीत



असल्याचे विधान केले होते, तसेच आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या विषयी देखील अपमानजनक वक्तव्य केले होते. त्यांच्या वक्तव्याचा सर्वत्र निषेध केला जात आहे. मतीन भोसले यांच्या नेतृत्वात नागपूर-औरंगाबाद महामार्गावर शिंगणापूर येथे रास्ता रोको करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली आणि आमदार शरद सोनवणे यांच्या प्रतिमेला चपलेने मारून निषेध व्यक्त केला. या ☞(पान २ वर)

# पाणीपुरवठा होणा-या विहिरीच्या सभोवताल घाणीचे साम्राज्य

## सांडपाण्याचे गटार व झाडेझुडपांनी वेढला परिसर

## नांदगावात नगरपंचायतची निष्क्रियता कारणीभूत

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** शहराला लागूनच असलेल्या मोखड रस्ता स्मशानभूमी जवळील नगरपंचायतच्या सार्वजनिक विहरी वरून नांदगाव शहराला दररोज पाणीपुरवठा होतो. परंतु या विहिरी सभोवताल सांडपाण्याचे गटार व झाडे झुडपे वाढल्यामुळे या परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. तेव्हा हा परिसर व जनावराकरीता पाणी पिण्यासाठी असलेले टाके स्वच्छ करण्यात यावे अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी नगरपंचायत कडे निवेदनाद्वारे केली. नगरपंचायतची निष्क्रियता चव्हाट्यावर



आली आहे. या विहिरीवरून नांदगाव शहराला दररोज पाणीपुरवठा होतो. परंतु विहिरीच्या परिसरात शहरातील वाहत येणारे सांडपाण्याचे गटार साचले असून या गटारातील दूषित पाणी विहारीत झिरपते. या पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका होण्याची भीती व्यक्त होत आहे तसेच विहिरीजवळ जनावराकरीता पाणी पिण्यासाठी टाके असून या टाक्याची अवस्था फारच दयनिय आहे. हे टाके ☞(पान २ वर)

> विहिरीचा परिसर झाडे झुडपे यांनी वेढला असून परिसरात सांडपाण्याचे गटार आहे. शिवाय जनावरांना पाणी पिण्याचे टाक्यात शेवाळ व किडे आहेत. अनेक वर्षापासून हे टाके साफ केले नाही. त्यामुळे जनावरे पाणी पिल्याने आजारी होण्याची शक्यता आहे. नगरपंचायतीने हा परिसर व जनावरांचे टाके स्वच्छ करावे.
>
> **-प्रभाकर डांगे,** नागरिक- नांदगाव खंडेश्वर

# कुऱ्हा येथून शेकडो शिवभक्त मंडळी मोठ्या महादेवाला रवाना



कुऱ्हा/प्रतिनिधीः- श्रावण महिन्याच्या पावन पर्वावर कुऱ्हा व परिसरातील शेकडो भोले भक्त मोठा महादेव असलेल्या पचमढीसाठी दरवर्षी रवाना होतात. याही वर्षी नागपंचमीच्या पर्वावर कुऱ्हा येथील चांदुर रेल्वे तिवसा रस्त्यावरील शिव मंदिरांवरून कुऱ्हा व आजूबाजूच्या परिसरातील शिवभक्त २७ जुलै ला सायंकाळी ६ वा.महाआरती करून हर हर महादेवाच्या गजरात असंख्य शिवभक्त रवाना झाले.

मध्यप्रदेशातील नर्मदापूरम जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेले पचमढी या ठिकाणी श्रावण महिन्यात नागपंचमी निमित्त १० दिवसांसाठी मोठी यात्रा भरत असते.चौऱ्यागड व नागव्दार यांच्या दर्शनासाठी विविध राज्यातील भोले भक्त शिवशंभूच्या दर्शनासाठी जातात.या ठिकाणाला मोठे महादेव असे सुध्दा संबोधले जाते.तिवसा तालुक्यातील कुऱ्हा व परिसरातील भोले भक्त मोठ्या संख्येने पचमढी येथील नागव्दाराचे नागपंचमीला दर्शन घेतात.दुसऱ्या दिवशी चौऱ्यागडाचे दर्शन घेऊन परत निघतात. यामध्ये कुऱ्हाचे शिवभक्त रूपेश टिंगणे, नितीन दारोकार,सतिश रामदास वसुले, नितीन वरठी, संतोष धुमाळे,राजु टेकाडे, विशाल चव्हाण,विपूल नेरकर, विलास☞(पान २ वर)

## तळेगाव ठाकूर येथे अज्ञात चोरट्यांचा धुमाकूळ

# रात्री चार दुकाने व कुलूपबंद २ घरे फोडली, ६२ हजारांचा ऐवज लंपास

**तिवसा/प्रतिनिधीः-** तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर येथे शनिवारी रात्री अज्ञात चोरट्यांनी चांगलाच धुमाकूळ घातला. एकाच रात्री दोन कुलूपबंद घरे व चार दुकाने फोडून एकूण ६२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे तळेगाव ठाकुर गावात एकच खळबळ निर्माण झाली आहे. शनिवारी २६ जुलै रोजी मध्यरात्रीच्या सुमारास तळेगाव ठाकूर येथील मुख्य बाजार चौकात असलेले अमोल मनोहर पन्नासे यांच्या दुकानाला अज्ञात चोरट्यांनी लक्ष करून दुकानाचे कुलूप तोडले व रोख ६० हजार रुपये चोरून नेले. त्याचप्रमाणे



याच परिसरात असलेल्या संतोष निमावत यांच्या दुकानातून रोख रक्कम ☞(पान २ वर)

# कर्जाच्या ओझ्यामुळे शेतकऱ्याची आत्महत्या

**शिरखेड गावातील घटना**

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी तालुक्यातील शिरखेड गावात कर्जाच्या विवंचनेतून एका शेतकऱ्याने आत्महत्या केली. संजय पांडुरंग भुजाडे (वय ४५) असे मृत शेतक-याचे नाव असून, त्यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपवले. ही घटना शुक्रवारी (२६ जुलै) उघडकीस आली.

संजय भुजाडे यांच्याकडे केवळ दीड एकर शेती होती. सततच्या नापिकीमुळे त्यांनी काही महिन्यांपूर्वी अर्धा एकर शेती



विकली होती. उरलेल्या जमिनीत पेरणीसाठी त्यांनी स्टेट बँकेकडून दीड लाखांचे कर्ज घेतले होते. तसेच, दोन मुलींच्या शिक्षणासाठी बचत गट आणि मायक्रो फायनान्स संस्थांकडूनही कर्ज घेतले होते. यावर्षीच्या अवेळी आणि जोरदार पावसामुळे त्यांना दुबार☞(पान २ वर)

# लग्नाचे आमिष दाखवून कॅफेमध्ये महिलेचे सर्वस्व लुटले

## समाज माध्यमावर झाली होती ओळख

**अकोला/प्रतिनिधीः-** व्यसनाधीन पतीपासून वेगळ्या राहणाऱ्या विवाहित महिलेची एका तरुणासोबत समाज माध्यमातून ओळख झाली. या ओळखीतूनच तरुणाने लग्नाचे आमिष दाखवून कॅफेमध्ये महिलेचे सर्वस्व लुटले. वारंवार अत्याचार केल्यानंतर तरुणाने लग्नाला नकार देत धमकावले.



या प्रकरणात नराधम आरोपी शुभम टाले याच्याविरुद्ध विविध कलमान्वये सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील कॅफे की अनैतिक व्यवसायाचे केंद्र? असा प्रश्न निर्माण झाला असून कारवाईची मागणी केली जात आहे. एका ३३ वर्षीय विवाहित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, पती सतत दारू पिऊन मारहाण करीत असल्याने महिला वेगळी राहत होती. यावेळी शुभम टाले याच्यासोबत समाज माध्यमातून ओळख झाली. पुढे ओळख वाढून चांगली मैत्री झाली. आरोपीने विवाहित महिलेला लग्नाचे आमिष दाखवून पतीपासून ☞(पान २ वर)

# सर्पदंशाने चार वर्षाच्या कनकचा करुण अंत

**चिंचोली गावातील घटना**

**अमरावती/प्रतिनिधीः-** मोर्शी तालुक्यातील चिंचोली गवळी गावात शुक्रवारी (२६ जुलै) रात्री साडेनऊच्या सुमारास एक हृदयद्रावक घटना घडली. सर्पदंशामुळे चार वर्षाच्या कनकचा दुर्दैवी मृत्यू झाला.कनक आपल्या घरात खेळत असताना अचानक सापाने तिला दंश केला. ही बाब लक्षात येताच कुटुंबीयांनी तात्काळ मोर्शी येथील रुग्णालयात तिच्यावर उपचार सुरू केले. मात्र प्रकृती गंभीर झाल्याने तिला रात्री अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले. डॉक्टरांनी ☞(पान २ वर)

# जिल्ह्यात उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस ६५ ठिकाणी उत्साहात साजरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस अमरावती जिल्ह्यात ६५ ठिकाणी मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहर प्रमुख, महिला आघाडी आणि युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये आणि अमरावती महानगरात विविध सामाजिक उपक्रम राबवले.



महाआरती, फळ वाटप, शालेय साहित्य वाटप, रक्तदान शिबिर, रोगनिदान शिबिर, चष्मे वाटप, अन्नधान्य वाटप, मेडिकल किट वाटप, वृक्षारोपण, महिलांना शिलाई मशीन वाटप☞(पान २ वर),

# शासकीय मत्स्यविज्ञान महाविद्यालयाच्या अनुषंगाने बैठक!

## खासदार डॉ.बोंडे व आमदार यावलकर यांची उपस्थिती



**मोर्शी/प्रतिनिधीः-** दि.३ ऑगस्ट रोजी मोर्शी शहरात शासकीय मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचा भूमिपूजन सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न होणार असून त्या अनुषंगाने दि.२६ जुलै रोजी साईबाबा मंदिर गभने लेआउट येथे खासदार डॉ.अनिल बोंडे व आमदार चंदू यावलकर यांच्या उपस्थितीत नियोजित बैठक पार पडली. मोर्शी येथील अप्पर वर्धा वसाहती मधील ४.०८ हेक्टर जागा हि विद्यापिठाच्या इमारत बांधकामास आवश्यक असल्याने सदर जागा हि जलसंपदा विभागाने विद्यापीठास हस्तांतरित केली आहे.या मत्स्यविज्ञान महाविद्यालयाच्या निर्मितीसाठी २६५ कोटी रुपयाची मंजुरात मिळाली असून भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी भोई समाजातील महिला-पुरुष यांना मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्या स्वागतासाठी वेळ देण्यात येईल.यावेळी तालुक्यातील जवळपास तीन ते साडेतीन हजार नागरिक या सोहळ्याला उपस्थित राहील. यासाठी भाजपाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी प्रयत्न करावे अशा सूचना डॉ.अनिल बोंडे यांनी दिल्या.☞(पान २ वर)

# खुल्या मैदानात सुरू होता जुगार पोलिसांची धाड, सहा जण ताब्यात

## २.५९ लाखांचा ऐवज जप्त

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** शहरातील डांगरीपुरा भागात उघड्यावरच जुगाराचा थाट मांडणाऱ्या टोळीवर चांदुर रेल्वे पोलिसांनी शुक्रवारी (दि.२६ जुलै) रात्री कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे टाकलेल्या या धाडीत सहा जणांना रंगेहाथ पकडण्यात यश आले. पोलिसांनी एकूण २ लाख ५९ हजारांचा मुद्देमाल जप्त केला असून, यामध्ये रोख रक्कम, मोबाईल, दुचाकी व ताशपत्त्यांचा समावेश आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक यांच्या



मार्गदर्शनाखाली झाली असून, डांगरीपुरा परिसरातील गुन्हेगारी प्रवृत्तीवर चांगलाच आळा बसला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डांगरीपुरा भागातील मेश्राम यांच्या घरासमोर सार्वजनिक ठिकाणी लाईटच्या प्रकाशात काही जण जुगार खेळत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. लगेचच कारवाई करत पोलिसांनी दिलीप संतोषराव मानकर (वय ३६, भिमनगर), निलेश महादेव धणे (वय ३६, निरानगर), आकाश हरिदास मेश्राम (वय ३२, डांगरीपुरा), कार्तिक दिलीप☞(पान २ वर)

# ९ वर्षाच्या मुलाला घेऊन निघालेला मनोरुग्ण ताब्यात

**नागपूर/प्रतिनिधीः-** खापरी येथून कारमध्ये ९ वर्षाच्या मुलाला घेऊन निघालेल्या मनोरुग्णाला ११२ पथकाने रिलायन्स पेट्रोलपंप वरुन ताब्यात घेतले. नागपूर जिल्ह्यातील खापरी येथून आपल्या ९ वर्षाच्या लहान मुलाला कार क्रमांक एम एच ४० एच ५६२८ मध्ये बसवून एक मनोरुग्ण नागपूर-हैदराबाद मार्गाने हिंगणघाट जवळील रीमडोह परीसरातील रिलायन्स पेट्रोलपंपवर आला.

यावेळी तो वेड्यासारखा



करीत होता व उडवा उडवीचे उत्तर त्या ठिकाणी देत असल्याने परिसरातील उपस्थितांना यामुळे हा मनोरुग्ण असल्याचे शंका येताच पोलिसांच्या ११२ क्रमांक क्रमांक वर ☞(पान २ वर)

# तिवसा-नेरपिंगळाई मार्गावर कारचा अपघात

## दोन युवक थोडक्यात बचावले

**मोर्शी/प्रतिनिधीः-** तिवसा-नेरपिंगळाई मार्गावर असलेल्या राजुरवाडी वळणाजवळ पुन्हा एकदा अपघाताची घटना घडली. २७ जुलैच्या पहाटे ४ वाजता एका क्रेटा कारचे वळणावर नियंत्रण सुटल्याने ती थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या खोल खाईत कोसळली. मात्र दैव बलवत्तर म्हणून चालकासह एक युवक थोडक्यात बचावला असून कोणतीही जीवितहानी झाली नाही. अपघातात कारचे जवळपास पाच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.




प्राप्त माहितीनुसार, नागपूर येथील कुळकर्णी लेआउटमधून सचिन रवींद्रकुमार अवस्थी (वय ३६) हे आपल्या मित्रासह चिखलद-याकडे निघाले होते. तळेगाव व तिवसा मार्गे प्रवास करत असताना राजुरवाडी टर्निंगजवळ समोरून येणाऱ्या वाहनाचे हेडलाईट डोळ्यात पडल्यामुळे चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले. परिणामी कार खोल खड्ड्यात जाऊन उलटली. सुदैवाने दोघेही किरकोळ जखमी झाले. या घटनेनंतर नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जेसीबीच्या सहाय्याने कार बाहेर काढण्यात आली. याच टर्निंगजवळ २२ जुलै रोजी नागपूरच्या युवकांची स्विफ्ट डिझायर कार कोसळली होती. त्यानंतर एक ट्रकसुद्धा पलटी झाला होता. अपघातांची मालिका लक्षात घेता, या वळणावर अपघात ☞(पान २ वर)